नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

दिवाळी अंक-१९६७

अनुक्रमणिका

राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळपुरस्कृत, विदर्भ साहित्य संघाचे मुखप

युगवाणी



वर्ष २२ अंक ७

दीपावली विशेषांक १९६७

मूल्य १ रुपया

अनुक्रमणिका

या अंकात—

मुखपृष्ठ—श्री. धनंजय नाकाडे.

कविता—**पाऊल** श्रीधर शनवारे; **अनर्थाचा अथर्ववेद** उ. रा. गिरी; **अक्षर :** वसंत डहाके; **ही दिव्यांची ओळ** विश्वास कानडे; **काळ चालला घेऊन हाती** सारंग; **रस्ता :** शंकर विटणकर; **मिणमिण दिव्यांची :** कृष्णा चौधरी; **शीळ सोवळी, शिवी मोकळी** नारायण पेडणेकर; **शब्दप्रभू मी** आनंद प्रभू; **वलयांच्या दालनातून** नागेश खडसे; **हाकाटी** बाबा मोहोड; **जात तुझी** सौ. उषा लिमये; **डोह** सरला भोळे **शूद्र** नरेशकुमार इंगळे; **कढ** श्याम सोनारे; **चढती नजर** भ. मा. परसवाळे; **गोंदण** बजरंग सरोदे; **दोन थेंब** अविनाश बरोकर, **हा बहर माझा नाही** श्रीपाद कावळे; **झुंज** नीलकांत ढोले; **अभंग** मधु जामकर; **जीवनस्फूर्ती** कै. नाना जोग; **उदासपणातल्या कविता** कृष्ण माधव देशमुख; **नव्या सुगीचे गीत** 'यक्ष'


एकांकिका—**वर्फाचे घर पाण्याखाली** वामन इंगळे; **वेडी शकू** प्रभाकर पुराणिक.

कथा—**आम्ही दोघं** कुंदा पारसनीस; **पत्र** प्रभा गणोरकर; **गुलाम** शशिकान्त नारायण केळकर; **उद्रेक** प्रभाकर धोटे; **निरागस पूर्तता** दिनकर नीलकंठ देशपांडे; **चिरूट** Y. B.; **विजन** प्रभाकर [illegible].

एकपात्री निवेदन—**एक होती बुढी** वा[illegible]रघडे.

लेख—**केशवसुतांच्या कल्पसृष्टीचे [illegible]हा अज्ञात उगम** प्रा. म. शं. वावगावकर; **शबरीची बोरे** शबरी **आजच्या नाटकांतील काही प्रमुख प्रवाह** प्रा. म. वा. कुंडले; **आधुनिक कवितेसंबंधी थोडेसे** सौ. शकुंतला खोत.

विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन २७ वे, वर्धा



नियोजित अध्यक्ष
श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब ढवळे | श्री. वसंत वऱ्हाडपांडे
सा. भू. तु. ना. काटकर | श्री. श्रीकान्त राय
श्री. व्यं. नी. पंडित | प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २२] नोव्हेंबर १९६७ [अंक ७

विश्वेशें करुनी दया सकरुणें दुष्काळ वेंत्यावरी
पर्जन्यास्त्र निवारुनी पळविली आहेत दुःखें दुरी
आता मंगल पातले दिवस हे दीपोत्सवाचे भले
गाणे मंगल पाहिजे तर तुवां हे शारदे गायिले.

—केशवसुत

कविता

अनुक्रमणिका

कविता

पाऊल

जाताना उगीच उमटलेले
हे तुझे अस्पष्ट पाऊल
परत येताना, गा निर्विकारा !
तू मिटवून टाकणार आहेस, सहजपणे
हे मला ठाऊक आहे.
पण तू परत केव्हा येणार आहेस ?
मी धुळीतून घेतो आहे चाहुल तुझ्या
परतत्या पदरवांची
काहीसा त्राग्याने
नि बराचसा भीतीने !

—श्रीधर शनवारे

अनर्थाचा अथर्ववेद

: १
डोळे :

आसवांच्या आसपास फितुर झालेला
अनर्थाचा अथर्ववेद नजरबंद
रक्तात धुमसणारे रामायण :
पुन्हा जुनेच अर्धसत्य
वेदनेच्या वनवासात उमगलेले
अखेर आयुष्य तरी काय ?
एक महाभारत —
प्रत्येक पीडेतून नव्याने संभवणारे
निदान हे आकाश असावध आहे तोवर
वासनेचा वसंत गात्रात मालव.

: २ :

अशीच असूदे
अपहृत आसवतीच्या ओसाड घुमटाखाली
सरत्या शिशिरातील कोमल आठवणींची
मंद दिवेलागण. सांज-दाटल्या दिशांच्या
उतरणीवर माझी पावले थकली आहेत
प्राक्तनाचा पाठलाग करताना. तू
पेटवलेला प्रितीचा पटदीप यातनेच्या
यज्ञात विझलेला. आता स्वप्न—काठावर
कोलमडलेल्या कैलासलेण्यात उजळत रहा
नियतीचे निरांजन होऊन निर्हेतुक काळोखासारखी.

: ३ :

पुनर्भेट : एक वांझ साक्षात्कार. पुनर्जन्माइतकाच
संभाव्य. किनाऱ्याचे काम किनाऱ्याने केले आहे.
तू वाहत रहा दिशाहीन प्रवाहाप्रमाणे खडकाच्या
भगदाडातून. इंद्रधनूच्या सप्तरंगात मंतरलेला
दिवस कधीच कोसळला आहे फुटलेल्या
झुंबराप्रमाणे ठिकऱ्या होऊन संध्येच्या वक्षावर.

: ४ :

आकाशगंगेच्या पाण्यातली प्रतिबिंबे होत
आपणही भटकून आलो होतो क्षितिजाच्या
उंबरठ्यावरून. किती जवळ आला होता पूर्ततेचा
चंद्रलोक ! उर्मीचे उधाण प्यालेल्या फिनिक्सप्रमाणे
माझ्या डोळ्यात बुडालेली तू. मी शिरलो होतो
तुझ्या कुशीत आशयात शब्द शिरावा इतका अलगद...

: ५ :

पर्यवसान आधीच कळते तर कशाला
निघालो असतो या अज्ञात वाटेवरून
अनंताच्या प्रवासाला ? तुझ्या आत्मलक्षी
पापण्यात खुपणारे काळाचे काजळ.
वादळाचे वळ जपणारे माझे मन
तुझ्या स्वाधीन केलेले—आज मला
परत हवे आहे समाधीत शिरण्यापूर्वी...

: ६ :

दूरवर मंद होत गेलेली तुझ्या पावलांची
चाहुल. चपापलेली बकुळफुले माझ्या
ओंजळीत. असोशीची अनाकार नक्षी
झालेली एक संदर्भहीन रात्र..
अजुन तेवताहे तू लावलेली
समर्पणाची सांजवात तडकलेल्या तिमिरात.
मी उरलो आहे आता
विझून जाण्यापुरता निखळलेल्या उल्केप्रमाणे

: ७ :

कवितेत फुलपाखरू होण्यापूर्वी हरवलेला
तुझा शब्द. एक घायाळ परवल
घुमलेली प्राणात. पुन्हा अनोळखी.
पाखराचे प्रस्थान'''तुझ्या डोळ्यात पाणी...
कहाणी काळोखाची धमनीत मालवलेली
आर्त ठुमरीसारखी. तरीहि आपण तटस्थ
आणि प्रमाणित व्यवहाराच्या उजेडात.
उभे क्रूसाखाली थिजलेल्या रक्ताच्या थारोळ्यात
थर्थरत...

: ८ :

रात्र संपली म्हणजे दिवस उगवतो
या वैश्विक सत्यावर हक्क दाखवू नकोस.
(निदान आपलीच सोय व्हावी म्हणून !)
काढू नकोस ज्वालामुखीची खपली
जमिनीच्या जखमेवरची. उत्तररात्रीच्या
स्कंधावर माना टाकलेली असहाय्य
तारकाफुले केव्हाच विझली आहेत
चांदण्याचा लाव्हा पाकळ्यात साठवून...
किती जागणार आहेस तू
पुन्हापुन्हा सारे आठवून...

—उ. रा. गिरी

अक्षर

रक्तवाहिन्या आटताहेत या उध्वस्त दिवसाच्या
कोरड्याकरड्या सापळ्यात मी बंदिस्त
मुक्त मी नाही कधीच
पाताळात बांधलेला दगडाला
माझ्याच अज्ञात वासनांच्या

युगयुग त्रस्त जीवाचे
अंधारून आलेय आकाश
तर देवा उजळ रे तम हे

जांभळे पक्षी असतील तुझ्या दारी
नाचत नाच दिव्य अप्सरोगायने
रोग येथे कुरतडताहेत इमारती
रस्ते बागबगीचे

पंख तुटलेला एक गंधर्व
तुटलेल्या वाद्यावर मंजुगीते
नाही नाही आकांत त्रस्त आत्म्याचा
रामरामराम मर कोरडाच
अतृप्त पिशाच्च हो
सुटका नाही कोठेच

नाही एक अक्षर जुळत सरळ

—वसंत आबाजी डहाके

ही दिव्यांची ओळ

ही दिव्यांची ओळ तिथेच सरते
जिथे सरतात माणसांनी बांधून काढलेले रस्ते.
त्यापुढे अंधार आहे.
इथल्या किंकाळ्यांचे पडसाद त्या अंधारावर उमटतात
आणि तो अधिक कंकाळ होतो, कर्कश,
दिव्यांची किरणे बनतात व्यथांचे विषाक्त बाण;
त्यांच्या प्रकाशात वाट पाहण्याचे प्राक्तन
(—किंवा ऐतिहासिक अपरिहार्यता--)
हा शाप, तसेच वरदान,
तू स्वीकार किंवा स्वीकारू नकोस
त्याला फारसा अर्थ नाही.

मी पाहतो आहे एक तारा—कदाचित् खाजगी;
जगून झालेल्यावर आलेला काळाभुरा फेस
कुठेतरी अचानक चमकतो—
वाटतं हाच तो तारा असेल.
या उसळणाऱ्या लाटांच्या आवाहनात

वितळतात दिव्यांच्या ओळी
ओळखी अनोळखी वाटा
आणि जुळलेली संगती काळधाम्ऱ्या फेसाची
आणि विद्ध विकल अंधाराची
कुठेतरी तडकते
एका अपेक्षित लाटेवरती
जी घेते त्या ताऱ्याच्या
एकाच ओझरत्या किरणाचा वेध.

मी थांबू शकतो,
कारण मला वेळ आहे
आणि मी काळवेळ जाणत नाही
घुमणारी पृथ्वी
आणि तिच्या निंदीत
गुंगणारे जीवन
यांच्या चिमूटभर क्षितिजावर जी जाग उमलते आहे
तिच्यावर मी जागा झालो आहे.

—विश्वास कानडे

काळ चालला घेऊन हाती

क्षुद्र भावनेचे हे तिरडे
इथे जळाले सरणावाचून, मरणावाचून जीवन अपुले—

इथे अहिल्या दगड जहाली
इथे आटले गंगेचे जल
भगिरथाचा यत्न खुंटला
कुठली मग गंगेची कल्कल् ?

इथे कुणा उःशाप मिळाला
कधि सफल ते यत्न जाहले.
कधि कुणी या जगात अपुले
साकाराचे स्वप्न पाहिले

इथे संपते, इथे संपले, मरणावाचून जीवन अपुले –

—सारंग

रस्ता

स्वच्छ डांबरी सडक त्यावरी गर्द दुतर्फा झाडे
रस्त्याने मी गात चाललो गीत आपले वेडे.

सावल्यात विणतात कवडसे
सुंदर सुंदर नक्षी
लहर धावली पाण्यावर की
दूर उडाले पक्षी
इवले-इवले मेघ नभावर किलबिल त्यांची उडे
रस्त्याने मी गात चाललो गीत आपले वेडे.

रंगबिरंगी फुले झेलती
उजेड अंगावरी
प्रीतीची हो 'पहाट पहिली
त्यांच्या ओठावरी
हलती पाने कुणास हसती मिचकावित डोळे
रस्त्याने मी गात चाललो गीत आपले वेडे.

मागे पडली वस्ती आणिक
गाव राहिले दूर
वाऱ्याशी मी बोलत बसतो
आळवितो नव सूर
मधेच भटकी वाट एकटी जाई रानाकडे
रस्त्याने मी गात चाललो गीत आपले वेडे
स्वच्छ डांबरी सडक त्यावरी गर्द दुतर्फा झाडे.

—शंकर विटणकर

मिणमिण दिव्यांची...

मिणमिण दिव्यांची कुठवर अधुरी हळवी
का नित्य जळे जर सूर्य इथे अंधारी
अंधार उभा हा पुढे पसरुनी जाळे
मी ओढुनी चिखलत प्रकाशघन जरतारी.

हा असा अनोखा प्रकाश पुढती पुढती
कापित चाललो गहनतिमिरघन वाट
विश्वाचे स्फुरते विचित्र स्पंदन हृदयी
उमलते तयातुन तांबुस गौर पहाट

श्वासांची पखरण वोठीतुनि पाजळते
डोईवर पण का घरंगळत आकाश...
तुडवितो धुंदिने पाट जरी तिमिराचे
मी दिशादिशातुन उधळित दिव्य प्रकाश.

—कृष्णा चौधरी

शीळ सोवळी, शिवी मोकळी !

शीळ सोवळी, शिवी मोकळी, आत गाठ तुटलेली होती
पोटी पुरता गिळुन मवाली ओठांहूनि शिळ उठली होती !
खजील नव्हते पाप मनातील चोळगाठ सुटलेली नव्हती
लख्ख चांदणे कोसळताना शपथ गळ्याची फिटली नव्हती !
असा मवाली अडून होता अटातटी हटमस्ती होती
मनमंनेचा श्वास सोवळा तोवर त्याला छाती होती !
असा मवाली मुडदा झाला, पाय तयाचे राती येती
मनमंनेचे श्वास सोवळे चाहुल घेउन पिटती छाती !
रातभयाच्या छाया झाल्या शीळ ऐकता राने रडती
छाताडातिल डोंगर मोठे रातभयाने खचती पिचती !
शीळ सोवळी, शिवी मोकळी. आतगाठी या तट्तट् तुटती
सरणावरुनी उठे मवाली, शीळ हवी पण ओठ फाटती !

—नारायण रा. पेडणेकर

शब्दप्रभू मी :

दिशाच्या तिरप्या चौकोनाचा वेघ घे
क्षितिजाच्याही पलिकडे दूर कुठे तरी. दुरात
तुला दिसेल माझी चिता जळताना
गगनव्यापी ज्वाला उफाळताना. . .
त्या ज्वालांनी आकाश निथळणार आहे
अंधारालाही हुंदका फुटणार आहे
ह्या सजीव झाडांच्या रांगा गहिवरणार आहेत
केवळ माझ्याच साठी हे झुलणारे कळकाचे बेट
कळवळणार आहे, हळहळणार आहेत हे गर्भशीळ वारे
धुक्यात हरवलेल्या वाटा स्फुंदणार आहेत......
अंकलेस का तू स्पंदन मातीचे...कणाकणात दाटलेले उमाळे
असे हे नाते असीम माझे......
आता तू अशी आभाळासारखी खचू नकोस ढाळू नकोस
अश्रू.. तुला सती–सावित्रीच्या सतित्वाचे वरदान आहे
माझे शब्दसामर्थ्य अफाट आहे...अफाट आहे त्यांची
शक्ती...त्यांच्या डोळयात तळपता सूर्य आहे...ते
डोळयातील प्रखरतेने भस्म करतील तुझ्यावर अन्याय
करणाऱ्यांना..........
शब्दप्रभू मी...शब्दकार मी...माझा एक एक शब्द
तुझ्या प्रतिकारास्तव चवताळून उठेल...

--आनंद प्रभू

वलयांच्या दालनातून

जिवाचे कान
ऐकत होते तान
निनादताना रान
हिरवेगार,
सुनसान कोकिळा कोणी
आलापित होती
राग दीपक
वाणीला शिकवित
तंतु–ज्ञान,
अन्......
वलयांच्या दालनातून
कल्पना गुणगुणत विरली
हरून आपलेच
देहभान !

—नागेश खडसे

हाकाटी

वाहतो आहे मी
माझेच ओझे गा
तुझ्यावरी त्रासा
कसा करू ?
कधीही न केली
शेजाऱ्याची चिंता
आज शरमिंदा
तेवढ्याने.
वाकलेली पाठ
खचलेला धीर
दूर पैलतीर
राहिलेले.
आता एकमेव
तुझाच आधार—
पुढचा सागर
उल्लंघाया.
देण्यासाठी पण
काहीच न गाठी
म्हणून हाकाटी
दारी तुझ्या !

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका

जात तुझी :

विरहाने गारठली
मी दुपार बनते अन्
गळलेल्या पर्णापरि
भिरभिरते रात्रंदिन ॥

आतुरते वेड्यापरि
भरतीची लाट बनुन
भावहीन खडकापरि
तू वेड्या स्थितप्रज्ञ ।।

धरतीच्या श्रद्धेतच
ओढ मला क्षितिजाची
नभ होउन फसवितोस
जात तुझी चकव्याची ।।

— सौ. उषा लिमये

डोह

वेड आहे डोहाला या
सावल्यांचे बिंब घ्यावे
लहरींनी वर्तुळात
सावल्यांचे गीत गावे.

मोहरल्या भावनांच्या
सावल्यांना झालरी.....
कवडश्यांची खडी
छापलेली तीवरी

सांभाळत सावल्यांची
तरंगती स्वप्नशाळा
सुस्तावतो डोह आणि
हसतात काठ त्याला.

हात काठाच्या गळ्यात
घालुनिया सुस्तावल्या
शेवाळाने प्यायल्या
भावनेच्या सावल्या.

—सरला भोळे

शुद्र

रक्तात भिजलेल्या
चिमुकल्या हातांनी
एका अबलेची
अब्रू वाचविली
दूरावलेल्या क्षितिजाने
ही कहाणी
एका डोंगराला
जावून सांगितली
तेव्हा...

'तो गदगदा हसला !'

—नरेशकुमार इंगळे

कढ

किलो किलो मिलो साठी
गाव गाव लोटलेला
रांगारांगांच्या खुंटीला
जीव जीव टांगलेला

हाडाहाडांचा सापळा
उन्हातान्हात तापला
प्राण उडू उडू जाता
त्याच्या कण्ठात दाटला

—असे महात्म्यांचे हाल
पोट झोळीचे खपाटी
परब्रह्माच्या शिक्याला
त्यांची पुरे ना लंगोटी

अश्वत्याम्याला ना दूध
पीठापाण्याची टंचाई
घराघरात बाळाला
आता अफूची अंगाई

पसापसा पोह्यांसाठी
तंडतात दासदासी
कढ अश्रूंचे कृष्णाला
राही सुदामा उपाशी

—श्याम सोनारे

चढती नजर

पिकण्या आधीच
तुटलेले फळ
कोठून रसाळ
असणार

शेवटू दे जरा
चांगली कुऱ्हाड
मग हा पाहाड
फोड की रे

तेही खरे माझी
चढती नजर
कुठलेही स्तर
खुजे वाटे

तरी या नालीत
गंगा समजून
घेऊ दे न्हाऊन
एकदाचे

—भ. मा. परसवाळे

गोंदण

चंद्र ताब्यात ठेऊन
नभ परके जाहले
तरी माझ्या हातावर
थोडे चांदणे थेंबले.

होते क्षितिज हाताशी
तेहि विसरले क्षण
चक्क अंधार सांगतो
त्याचे माझ्यावरी ऋण.

आता आधार चांदणे
त्याची हातावर खूण
पुढे लोटावया काळ
तेच ठेवतो गोंदून.

—बजरंग सरोदे

दोन थेंब

पिसाटवाऱ्याच्या पाउलांना घेऊन...
वारा प्यालेल्या वासराच्या गतीनं
आवर्तात प्रत्यावर्तात...
उन्हात वादळात...
अलगद हरवलेल्या क्षणांना शोधीत
अन् अगतिक ओळींना जुळवित
तापलेल्या धुळीत...
अंतरा छेडीत..
येतो तुझ्या दारात...!
समष्टीच्या सीमारेखा ओलांडून...
आसुसलेल्या रोहिणीच्या थेंबासारखा...!!

एव्हाना तरळला असतो आसवांचा थवा...
तुटलेली पतंग...किरणही नवा...
पाठमोरी पुसटशी...वळते एक रेखा...
ओंजळीतून निखळलेला अर्धवट विळखा...!
आणखी असंच काही...!
मृगजलात जलाचा वास नाही...
तृषार्त 'तू' अन् तृषार्त 'मी'ही...!
थरथरतात ओठ...मुकी वारुणीची व्यथा...
कवेत असुनही विव्हळते क्रौंचाची कातरता..
माझ्या स्वप्नांची सांगता...!
अधरावरती रेंगाळतात काहिसे अस्फूट बोल.
बोलके असुनही अबोल...
माझ्या अनामिक आतुरतेचं मोल...अनमोल...!
वळणावरून वळता वळता...
ओंजळीत उरतात केवळ दोन थेंब...
आरंभापासून अंतापर्यंत...
आसवांच्या सारणीत वाढविलेली...
कोरांटीची गतिहीन स्मृति...
माझी अखेरची सांगाती!!

—अविनाश वरोकर

एक कलंदर आणि त्याची सावली

त्याचे सारेच विलक्षण
अंतरात झेप घेणाऱ्या कृती
अन् वागणे सारेच कलंदरासारखे
एखादे दिवशी स्टोव्हहि पेटत
नसतो त्याच्या घरात
तरीहि मस्त
लाचारी डोळचात नसते त्याच्या...
नोकरी न करता जगायचे वगैरे म्हणजे
हिंमतच हवी...

अमावस्येच्या मध्यरात्री
स्मशानात यायची तयारी असते
माझ्याबरोबर त्याची..
आम्ही दोघेहि शेकणार असतो
आमचे कुडकुडणारे हात
जळणाऱ्या प्रेताच्या
उबदार ज्वालेवर...

अलीकडेच झाला त्याचा प्रेमभंग
(असे किती झाले हे त्याचे
त्यालाहि ठाऊक नाही)
त्या दिवशी तो खूप प्याला
आणि माझ्या उरावर माथे
टेकवून तो खूप रडला...

आमच्या वाटा वेगळ्या
आमची दुःखे वेगळी
तरीहि आम्ही एकमेकांचे सोबती...
मी जर त्याचेबरोबर दिसलो नाही
तर लोक विचारतात त्याला
तुझी सावली कुठाय् म्हणून.

—कुसुमानंद

अनुक्रमणिका

हा बहर माझा नाही

ही फुले माझी नाहीत
मांडव झाकून विसावलेला
गुच्छेदार शुभ्र वेल
सांगत आहे.
हा बहर माझा नाही
ही फुले माझी नाहीत.

स्थिरावले असतील,
थकलेले पाय पांथस्थाचे
कुणा अजाण वृक्षाच्या छायेत
झाडाझुडपातून ऊन झेलीत.
हिंदकळणारा वारा
उन्हाची नजर चुकवून
बिलगला असेल कवेत घेत.

कुणि नकळत बोलून गेला असेल
दोन ओले शब्द
क्षणाचीच सोबत,
क्षुब्ध झाली असेल.
मनातील वावटळ
संचरले असेल अंगात बळ
आणि नकळत चालून आलो इथवर.

नकळत लागले असतील थोरामोठ्याचे हात
ही वास्तू उभारायला.
कुणाच्या सद्भावना आल्या असतील
सावल्या होऊन
आणि अलगद् उकलले गेले असतील.
गळ्याभोवती आवळलेले घट्ट फास
धुक्यात गुंडाळलेल्या धूसर वाटा
धुतल्या गेल्या असतील;

एकट्याने उभवला गेला नाही हा मांडव
हा बहर माझा नाही.
हा उभार उचलायला कित्येक हात
गुंतले असतील, पत्करून वांझ जीवन
ही वास्तु सांगतो आहे
हे वैभव माझे नाही
गुच्छेदार शुभ्र वेल सांगतो आहे
हा बहर माझा नाही.

—श्रीपाद गंगाधर कावळे

झुंज

इथे उदय होता होता दाटला तिमिर
धुंद काळमेघाखाली कोंदला समीर
पुष्प पाकळ्यांच्या जागी पर्णहिन शाखा
वसंतात ये पुन्हा कसा येई हा शिशिर ?

कूस अन्यायाची येथे पुन्हा उजवलेली
जिता भोवताली सारी भुते माजलेली
रक्तमांस काही नुरले सापळे बधिर
आता फक्त अस्थिसाठी झुंज चाललेली.

—नीलकांत ढोले.

अभंग

कुरवाळतो मी
वेचलेले घाव
अंतरात धाव ठेवाळते

चाटल्या जखमा
हावऱ्या तोंडाने
आंधळ्या डोळ्याने पश्चात्ताप

आपलेपणाने
आलो मागे पुढे
माझे मला धडे गिरवाया

हौसेसाठी केल्या
चुका लाखा वरी
मिळाली मजूरी गाढवाची

नावाजलो थोर
जगाच्या बाजारी
कोऱ्या व्यवहारी अमूल्य मी !

—मधु जामकर

जीवनस्फूर्ती

असाच एक कोणी
एके दिवशी, एका क्षणी
गुंडाळून पोटाशी पाय हात मस्तक
बनून हस्तक नियतीचा
मिटल्या डोळ्यांनी
नाही ध्यानी, नाही मनी
अवतरला अवनीवर.

जणू एक गाठोडे
ज्यात किंचित् रक्त, काही हाडे
वगैरे वगैरे थोडे थोडे; कोंबून एका खोकीत
देऊन एक धक्का धुगधुगीचा
चालत्या गाडीच्या खिडकीतून
मानववर्गाच्या गर्दीत
दिले घुसडून एका अदृश्य शक्तीने अंधारात.

एक सजीव कोडेच ते ! —
आणि हा असा एकपक्षी, केवळ सक्तीचा, गुप्तव्यवहार
पडता पार इच्छेनुसार त्या शक्तीच्या
चालत्या गाड्यातला सांगाडा
करू लागला व्यापार अनेक
ज्यांना आधार एकच—
आंधळ्या नियतीच्या गतीच्या नियमांचा.

सर्वस्वी परतंत्र असे हे चिमुकले यंत्र
नवसास पावलेल्या कुठल्या तरी देवाचे
हे विचित्र दान
वाढले अगोदर नवमास जिच्या उदरात
पडताच पदरात तिच्या झाले पवित्र—
स्मरणहीन, संज्ञाहीन, सामर्थ्यहीन, सौंदर्यहीन
असे हे फळ दीनवाणे
करू लागताच चळवळ निर्बळ गात्रांची
बिलगली अढळ ती अर्भकाला
ठरवून तेच स्थळ आपल्या उद्याच्या उमेदीचे ! —
कोणाची मदार कोणावर पहा !
वस्तुतः कोण कोणाचा आधार इथे ?
माता पुत्राचा की पुत्र मातेचा ?
विश्व वस्तुमात्राचा की वस्तुमात्र विश्वाचा ?
क्षेत्र क्षेत्रज्ञाचा की क्षेत्रज्ञ क्षेत्राचा ?
कस्य त्वम् ? वा कस्ते पुत्रः ?
कुत आयातः ?

—पण ह्या समस्या, त्यांचे विश्लेषण
नि उत्तरदायित्व त्यांचे
सोपवून ती यातायात त्या समस्यांकडेच.
करू लागली तपस्या ती एकच
ममतेची, ' मम 'तेची
ममत्वाची जननी ती !

—आणि त्याच क्षणी
जिथे नव्हते कसलेच आत्मविशेषण
त्या ठिकाणी झाला पहिला संस्कार—नव्हे चमत्कार—
अहम्-काराचा.
जिथे घडता आणि घडविता
दोघेहि बेजबाबदार
त्याचेच नाव चमत्कार !

चमकावी वीज अचानक गडद अंधारात
व्हावा गडबडाट निःशब्द कटाहात
थरथरावे एकटेच पान निश्चलतेत
पडताच पाऊस बिंदुमात्राचा
तसे स्फुरले मी-पण नेणतेपणात
सळसळले महत्त्व त्या मासाच्या गोळ्यात
सारा पसारा खगोलाचा
लुकलुकत्या डोळ्यांच्या लोलकांवर
झाला केंद्रित.
नाद-निनाद दिगंतातले
संवादी, विसंवादी
घुमदुमले, घुमले, गजबजले वातावरण—
स्फुरले श्रवण बिंदुमात्र रंध्रात
विश्वातल्या श्वसनाच्या वासातून
उपजताच विश्वास, झाले रोमहर्षण—
जे अधिकरण साऱ्या प्रत्ययांचे
आणि निपजले अंतःकरण.
स्वयंसंज्ञेचे असे हे उद्घाटन होताच
अवघे विराटब्रह्म झाले सस्मित

' अस्मि 'तेच्या जिवणीत
—अखिल ब्रह्मांडाची गवणसणीच जो !

सारे, सारे काही
देणे, घेणे, जगणे, जगवणे, जागवणे
मारणे, मरणे
धर्म–कर्माचे
उत्पत्ति–स्थिति–लयाचे
त्रिखंडातले अखंड आवर्तन
तो सततची, क्रियाप्रतिक्रियांची, अव्याहत साखळी
चिमुकल्या मुठीतल्या अणुस्फोटाची
कार्यमालिका झाली सुरू अभंग.
किती, किती थोर घटना ही !
केवढा जबर चमत्कार !
आणि घडला तरी किती थोडक्यात
किती थोडक्यांतून !

हो ! —अगदीच थोडक्यात घडला खरा
तो सारा चमत्कारच.
सहज स्फुरावी ओवीची एखादी ओळ
आभाळाएवढ्या आशयाची
तसाच झाला हा प्रकार—
पंचमहाभूतांचा अफाट प्रपंच
थाटला गेला इवलाल्या पंचज्ञानेंद्रियात—

अरे ! अरे पण—म्हणूनच की काय
ह्या विसंगतीच्या पाळण्यात टाकून पहिला पाय
झोके घेत—झोके खात
इकडून तिकडे—तिकडून इकडे
खालून वर—वरून खाली
तिथल्या तिथेच
खालीवर होऊ लागले पंचप्राण ?—

अनाहत नाद अनंततला
आला जो वाताहत
तो केवळ करून संचार सूक्ष्म तंतूत ?
सांभाळत तोल कष्टाने
एकेका बोलासाठी
साधावयास जो उत्कर्ष

करू लागला साधना संघर्षाची
आंदोलनात ?—
जो आदि-अंतापलीकडे
ज्याची आकडेमोड होणे नाही कधीही
जरी केली कितीही डोकेफोड
तोच विशाल काल
शिरून अवकाशाच्या आवळलेल्या मानेत
—केवळ आकुंचनापोटी—

होऊन थरकाप— अरेरे !—
बोटे मोडत घेऊन माप एकेका क्षणाचे
बसला मोजत आता आपलाच विस्तार !—
जे मुळी अनादि आणि अमर
त्याच्याच कपाळी पदोपदी
एकेक खिंड सर करण्याचा
आला समर प्रसंग !—
जे जे म्हणून होते अव्यक्तसे
अचिन्त्य आणि अविकार्य
त्याचे झाले हसे
अणुमात्र आकाराचा त्याला जडताच विकार
झाले विचारे संचित !—

अव्यक्तीच्या अशा ह्या अन्तातून
घरोघरी एकाच परीने होणारा
हा असा आरंभ व्यक्तीचा
तोच झाला माझाही
अगदी तसाच
पुजून सटवी संघर्षाची पाचवीला
थोर समारंभाने !—

कै. नाना जोग

['एकाचे झाले एक्कावन, बावन······पंचावन पूर्ती उद्या होणार' ह्या आरंभाने कै. नाना जोग ह्यांच्या अपूर्ण दीर्घ आत्मपर काव्यातील एक उतारा.]

उदासपणातल्या कविता

१.

मी असा वितळतो की,
मेघशिल्पातील शब्दच गळून जातात
फाल्गुनातल्या निष्पर्ण दुःखावर
आता क्षण ढळलेले आहेत
तुझ्या आषाढधारा झेलण्याचे.

२.

पहाटताऱ्याच्या प्रकाशगर्भात
माझी स्वप्ने आकार घेत नाही तोच
तो तुटतो आणि मिसळतो
रक्ताळलेल्या क्षितिजात पुन्हा आकारण्यासाठी
मी मात्र विझत राहतो
व्यथांच्या भावगंधात.

३.

आलीया भोगांचे
        भोगावे अभोग
सांडोनिया रोग
        इंद्रियाचे
येणे गात्रोगात्री
        घडावा संभोग
वासनांचे भोग
        पूरवावे.

—कृष्ण माधव देशमुख

नव्या सुगीचे गीत

वर्तमानची भूतकाळशी हलके पडली मिठी
उजळुन गेली आणिक हरखुन भविष्यकाळची दिठी

फुलून आला वठला चाफा लतिका मोहरली
देठोदेठी किती तरारुन झुलली फुलली खुलली

अचेतनाचे सचेतनाशी अभिमंत्रित नाते
जुळून गेले नव्या सुगीचे गात राहिले गीते

प्रतिभा झाली मुक्त हेरुनी वसंतातली रीती
तिच्या स्वराने प्रकट वर्तली उन्मेषाची प्रीती

ताऱ्यांचे वाऱ्यांना कळले संकताचे अर्थ
किती काढता अर्थ त्यातुनी अर्थापुढती शर्य.

जीर्ण तरूला नवी पालवी नव्या लतेला फुले.
उमजुन घ्यावे आणि ह्यापुढे फुलता फुलतिल मळे

आकाशाच्या कवेत किंवा शिंपलिच्या पण दुनियेत
आढळ त्याचा कुठेहि शोधा आणि तसा पण हृदयात !

'यक्ष'

बर्फाचे घर पाण्याखाली

—वामन इंगळे

१

पडदा उघडतो तेव्हा

[अ किंवा ब सरकारी नोकरश्रेणीला शोभू शकेल असा एक अद्ययावत सजावटीचा हॉल. मुख्य मघल्या खुर्चीवर बसलेला अधिकारी गंभीरपणे फाईली चाळत आहे. त्याचा सभोवती बसलेल्या कोटपॅंटधारी अधिकारी मंडळींच्या चेहऱ्यावर आता काय होणार ही भीती. या सर्वांच्या शेवटी बसलेली तरुण व्यक्ती या विश्वात नसल्यासारखी भिरभिर पहात आहे. त्याची दाढी बरीच वाढली आहे. अंगावर टेरेलिन कोट आहे. परंतु तो घाईत घातल्याप्रमाणे एका बाजूने लांडा आहे. हॉल अगदी शांत आहे. पंख्यांचे पाते आणि फाईलींच्या पानांची फडफड यांचा तेवढा आवाज येत आहे.]

कमिश्नर प्रधान (सुपिरिअर ऑफिसरच्या सुरात) मि. दिघे, मी ही सर्व कागदपत्रं पाहिली आहेत. (दिघेकडे उत्तराच्या अपेक्षेने पहातो.)

दिघे (झोपेतून उठल्याप्रमाणे) अं. . . .

प्रधान : तुम्ही डेप्युटी कलेक्टर आहात याची मी तुम्हास जाणीव करून द्यावयास पाहिजे काय ?

दिघे : (निरपराधीपणे) येस सर.

प्रधान : (गोंधळून) व्हॉट डु यू मीन वाय दॅट ?

घाटपांडे (तर्फेची अनाहूत दिलगिरी दाखवून) ही मिन्स टु से दॅट ही इज डेप्युटी कलेक्टर.

प्रधान : त्यांच्यावरील सर्व गंभीर आरोपांची उत्तरं तुम्ही देणार आहात काय ? (घाटपांडे संकोचतो.) मि. दिघे, तहसीलदार साकोली आणि तहसीदार भिवंडी यांनी दिलेले रिपोर्टस् तुम्हाला मिळाले होते ना ?

दिघे (गोंधळून) येस सर.

प्रधान (उसळून) गावकरी आणि सरपंचांच्या अवर्षणाविषयीच्या तक्रारी आल्या होत्या ? विहिरी, पंप, तलाव योजना या संबंधीच्या मागण्या आल्या होत्या ?

दिघे (नाईलाजाने) येस सर.

प्रधान : मग तुम्ही काय केलं ? वर रिपोर्टस पाठविले ?

दिघे (मोघम मौन)

प्रधान : (चुळबुळ करून) किती माणसं, मुलं, गुरे मेली ठाऊक आहेत ?

दिघे (थंड प्रामाणिकपणे) नाही सर.

प्रधान (गुदमरल्या रागाने) दिघे, व्हॉट इज धीस ? या सर्वाचा ठपका मंत्रालयाने माझ्यावर दिला आहे, आणि तुम्ही चक्क नाही म्हणून सांगता ? तुमच्याच डिव्हिजनमध्ये अवर्षण आणि तुम्हाला याविषयी ठाऊक असून पुन्हा नाही म्हणता ?

दिघे (अर्थ लाऊन) मला तसं म्हणायचं नव्हतं.

प्रधान : (चीड येऊन) तुम्हाला नक्की काय म्हणायचं आहे ते सरळ सरळ कोर्टालाच सांगावं लागणार आहे. बट यु हॅव सिरिअसली पुट द होल रिव्हेन्यु मशिनरी इन टु ग्रेट कनफ्यूजन अँड इनकनव्हिनिएंस. तुम्हाला एखादा चार्ज अमान्य करायचा आहे ?

अनुक्रमणिका

दिघे : (प्रामाणिकपणे) नाही.

प्रधान : वॉज धीस निगलिजंस डेलिबरेट ?

दिघे (नुसता भिरभिर पहातो. सर्वजण त्या-च्याकडे पहात असतात.)

प्रधान : मि. घाटपांडे, हे या दोन महिन्यात ऑफिसला येत होते ?

घाटपांडे : येत होते. पण नुसते स्वस्थ बसून रहात. ते काही मूडमध्ये रहात नसत.

प्रधान : धीस इज नॉट ए प्रॉव्हिन्स ऑफ आर्ट व्हेअर मूडस् अँड मूडीनेस कुड वी टेकन ऑफ सम अॅव्हेल. प्रकृती बरी नव्हती तर सरळ रजेवर जायला पाहिजे होते. अँड द सिरियस डिझास्टर कुड वी अव्हॉईडेड. धीस इज नॉट द ऑरग्युमेंट. मि. कुळकर्णी यांच्या ससपेंशनचे कागद तयार करा आणि उद्यापर्यंत माझ्याकडे पाठवा.

दिघे (कुणा एकाकडे न पाहता) सर, माझं काम झालं असेल तर मी जाऊ शकतो ?

प्रधान : (गुदमरल्या विस्मयाने आणि रागाने) वुई कॅन नॉट से नो.

[दिघे हळूच उठतो. कुणाकडेच न पाहता निघून जातो. सर्वजण त्याच्याकडे पहात राहतात. प्रधान चुळबुळ करतात.]

हाउ कॅन वुई एनफोर्स युवर ओन गुड अपॉन यू ? (तळमळत) इतका एफिशिएंट तरुण माणूस असा कसा कामातून गेला हो ?

घाटपांडे (प्रधानच्या सुरातली सहानुभूती पकडून) या दोन महिन्यात तो फार दुःखी आहे.

प्रधान : (कडाडून) असेल. कुणी पूरपीडित होतो. कुणाचे वडील मरतात. कुणाचा प्रेमभंग होतो. म्हणून व्यवहार असे वाऱ्यावर सोडायचे काय ? तो आज सस्पेंड झाला. उद्या कोर्टातून डिसमिसही होईल. पण माझ्यावर उगाच किटाळ येत आहे त्याचं काय ?

घाटपांडे (नाईलाजाने) मोठी विचित्र स्थिती आहे.

प्रधान : पण त्याला काही कारण विचारालं की नाही ? तो आयुष्यातून उठावा अशी माझीही इच्छा नाही. तुम्ही त्याचे जवळचे मित्र आहात ना ? त्याला घेऊन एखादेवेळी माझ्याकडे या.

घाटपांडे : सर मी नक्की नाही सांगत. पण प्रयत्न मात्र नक्कीच करतोय.

प्रधान : (कुळकर्णीकडे पाहून) पण ते ससपें-शनचे कागद मात्र त्वरित माझ्याकडे यायला पाहिजे आहेत. (उसळून) आपण त्याच्या नशीबाला नशीब घासणे कसे शक्य आहे ? बरं आहे.

[प्रधान जागेवरून उठतात. ते जाऊ लागतात. सर्वजण त्यांच्या पाठीमागे विंगपर्यंत जातात. मोटार निघून गेल्याचा भुर्रऽऽ असा आवाज येतो. रंगमंचावर उरलेल्यांची आपशी कुजबुज सुरू होते. इतक्यात पडदा पडतो.]

२

[काळ दोन महिन्यांपूर्वीचा. वेळ पहाटेची. एका छोट्याशया हॉलमध्ये पडदा उघडतो तेव्हा पन्नास वर्षे वयाची एक प्रौढ स्त्री तानपुरा सुरात लावीत बसली आहे. तिचा रंग गोरा असून याही वयात ती विलक्षण सुंदर आहे. खोलीत दर्शनी-भागी सरस्वतीची मूर्ती आहे. चांदीचे स्वरमंडल. फ्रेम केलेली सर्टिफिकेट्स्. मध्यभागी खांसाहेब गुलामअलींचा मोठा फोटो. नेटके फर्निचर आणि सजावट. तानपुरा मनाजोगा लाऊन झाल्यावर ती आकार लावते. दरबारीतील धैवतावर खर्जा-तील कंपने डौलात येऊ लागतात. आरोह-अवरोह पूर्ण झाल्यावर स्वच्छ तारपडज्. इतक्यात चोवीस पंचवीस वर्षांचा एक देखणा तरुण प्रवेश करतो.]

दिघे (प्रसन्न कलंदरपणे) वा क्या बात है ?

शांताबाई (किंचित हसून) मी तुझीच वाट पहात होते. पण म्हटलं, झोपलाय. झोपू दे. (त्याला मानेनेच तवल्याकडे इशारा करते.)

दिघे (लाडिक रुष्टपणे) हे काय ग ममी ? तुला सांगितलं ना आता रियाझ बंद म्हणून. आता मी डेप्युटी कलेक्टर म्हणून कचेरीत जाणार ना ? आता तुला हे काहीच करायची आवश्यकता नाही. तुझ्या तब्येतीलाही गाणं मानवत नाही.

शांताबाई : (थट्टेने) तू वेडा आहेस झालं. आज कुठं तू नोकरीवर जाणार. अजून पहिला पगारही

यायचाय तुझा. पण पैशाचं नाही रे. मनही नाही लागत. परवाची कानपूरची बैठक तेवडी गाऊ दे. मग विश्रांतीच.

दिघे : माझी शपथ घे पाहू.

शांताबाई : शप्पत रे. (शपथ घेतली म्हणून अकारण डोळे पाणावतात. म्हणून डोळ्यांची बाबरी उघडझाप. तशातच ती त्याला तबल्यावर बसण्याचा इशारा करते. तो हसतो. ती गाते. भो...र...भ...ई तो विलंविताचा सम कायम करतो. धिऽऽऽ धिऽऽऽधाऽ गेऽ... पाच मिनिटं विलक्षण बेहोषीत जातात. मायलेक दोघंही नाते विसरतात. शिल्लक राहते फक्त ती आणि तिचा तो कलावंत साथी. तबियतदार दाद आणि प्रोत्साहन.)

शांताबाई (तानपुरा आडवा ठेऊन साडीच्या पदराने तोंड पुशीत) बैठकी नाही करायच्या. पण घरी तरी गाऊ देशील किनी रे नानू ?

नानू दिघे (खुषीत येऊन) वाय ऑल मिन्स. गाणं ऐकल्याशिवाय मला रहावणारच नाही. (डॉक्टरी सुरात) पण नियमित मेहनत बंद. गाण्याचं बोलावणं आलं नाही तर कसं, ही काळजी बंद. हो...ना ? (उत्तराची वाट न पाहताच घाईत उठतो. त्या गडबडीत तानपुऱ्याला त्याचा पाय लागतो.)

शांताबाई : (एकदम रागाऊन) वेंधळा कुठला ? चल मस्तकी धर त्याला.

नानू (संदर्भ न कळल्यामुळे नुसता आश्चर्याने पहात राहतो.)

शांताबाई अरे तानपुऱ्याला नमस्कार कर. तुझी लाथ लागली त्याला. या सुरांनीच तुला डेप्युटी कलेक्टर केलाय.

नानू (एकदम लक्षात येऊन) खराय (वाकून नमस्कार करतो. तेवढ्यात शांताबाई त्याच्या केसांवरून हात फिरविते. तो तिचे खांदे धरून तिला वळेच उभी करतो.)

शांताबाई : चल मी ब्रेकफास्ट तयार करते. आज तुला लवकर तयार व्हावे लागणार आहे ना ? (चालता चालता ती मध्येच नानूच्या वडिलांच्या फोटोजवळ थांबते.)

नानू (फोटोकडे पाहून) बाबा......आईनं आपलं व्रत पूर्ण केलं आहे. आता तिला विश्रांती घे म्हणतोय. (तिच्याकडे पाहून हसतो.)

शांताबाई (बोलायचा प्रयत्न करते. पण गळचात दाटून आल्याने बोलत नाही. साडीच्या पदराने डोळे टिपते. लगेच आकस्मिकपणे हसून) अरे हो, एक सांगायचं विसरली की.

नानू : काय ग ?

शांताबाई : काल तू घरी नव्हतास तेव्हा सुलभा आली होती. म्हणाली, (मिष्किलपणे) माझा डेप्युटी कलेक्टर कुठं गेला ?

नानू (कृतककोपाने) हे...हे...फार होतंय बरं का मम्मी ! माझाविझा हे सगळं तूच केलयंस.

शांताबाई : (हसून) तिनं तुला आज बोलावलंय घरी. आज संध्याकाळी परतताना तू तिच्याकडनंच ये. जाशील ना ?

नानू : आता तू म्हणतेसच तर जाईन हं. एरव्ही माझी काही...

[शांताबाई अरे लब्बाडा......या आविर्भावात पाहते. दोघंही एकदम हसतात. नानू तिच्या दोन्ही खांद्यांना पाठीमागून हातानी ढकलत ढकलत विंगमध्ये घेऊन जातो. इतक्यात पडदा पडतो.]

३

पडदा उघडतो:—

[संध्याकाळ. सहा वाजताची वेळ. पार्कातील आडोशाच्या जागी काँक्रिटच्या बेंचावर एक तरुणी कुणाची तरी वाट पहात बसली आहे. तिने दोन्ही वेण्यात फुले माळली आहेत. आकाशी रंगाची साडी. इवलेसे घड्याळ. सौंदर्य बेताचेच पण आहे त्यापेक्षा सुंदर दिसण्याचा पद्धतशीर प्रयत्न]

सुलभा (कंटाळून) हा येणार तरी कधी ? तिकडे बाबा घरी वाट पहात असणार. (अस्वस्थपणे घड्याळ पहाते. इतक्यात टेरीकॉटचा सूट घातलेला नानू दिघे रुबाबात येतो.)

दिघे : फार उशीर झाला का ग ?

सुलभा (अकारण चिडून) तू आणखी पाच मिनिटं आला नसतास तर मी निघून गेले असते. (त्याच्याकडे रोखून पहात) कधी शिवला रे हा सूट ? नवीन दिसतोय ?

दिघे (प्रश्न न आवडून) काल तू घरी आली होतीस ?

सुलभा : हूं.

दिघे (मिष्किलपणे) माझा डेप्युटी कलेक्टर म्हणाली होतीस ?

सुलभा छे रे. कुणी सांगितलं ? तुझ्या आईनं ?

दिघे (गोरामोरा होऊन) नाही ग. मीच गंमत केली.

सुलभा (विषय टाळून) पण तू नेमका पार्कात कसा आलास ? मी तर घरी यायचा निरोप दिला होता.

दिघे बायकांना आठवणही एकूण वेताचीच असते म्हणावं लागेल. घरी यायचा निरोप दिला म्हणजे पार्कात भेटायचं–ही तूच सांगितलेली परवल विसरलीस ? आणि मग तूही कशी नेमकी पार्कातच आलीस ?

सुलभा : (नको त्या चिमटीत सापडली म्हणून दुखावते.)

दिघे : पण हे असं पार्कात भेटणं वगैरे बरं नाही दिसत. हे चोरून केल्यासारखं होतंय सगळं. तुला काय वाटतं ?

सुलभा : तू आता डेप्युटी कलेक्टर झालास हे मी विसरूनच गेले की.

दिघे : (शंका येऊन) त्याचा तुला आनंद झाला की नाही ? (ती काहीच बोलत नाही. पुष्कळ वेळापासून उभा म्हणून तो तिच्या शेजारी बसतो. इतक्यात ती काही तरी पाहिल्याच्या कैफात उभी राहते.)

सुलभा : सिंपली वंडरफुल !

दिघे : काय झालं ग ?

सुलभा : काय सुंदर गाडी आहे रे ?

दिघे : कुणाचीय ?

सुलभा कुणास ठाऊक. पण कॅडिलॉकचं नवीन मॉडेल दिसतंय. मासळीसारखी तिची चपटी पाठ तर फारच सुरेख आहे. नेरकरांकडली नवी अँबेसेडर पाहिली का रे ? ट्रंझिस्टर आणि एअर कंडिशंड. साठ हजारांची आहे. किती स्मूथ रन.

दिघे : (तिच्या भलत्या वडवडीला कंटाळून) सुलू, काल आईला सांगून टाकलंय.

सुलभा (दुखावून) काय ?

दिघे की आता दगदग मेहनत बंद. फार सोसलंय तिनं माझ्यासाठी. तुझ्याबद्दल तिला खूप कौतुक वाटायला लागलं आहे.

सुलभा (उत्सुकतेने) ए, एक सांगायचं विसरलेच की.

दिघे काय ?

सुलभा काल बिटल्सची स्वाक्षरी मिळवलीय मी. हाँगकाँगदरून येताना ते इथं रिगलला उतरले होते. तो मवला कि नी रे भलताच गमल्या आहे.

दिघे (न आवरून) मला इथं का बोलावलंस याचं नक्की कारण सांगू शकशील ?

[सुलभा त्याच्या अनपेक्षित रागाने गोंधळते. ती काही बोलणार एवढ्यात लांबून दचकविणारे आवाज ऐकू येतात. दोघंही त्या आवाजाच्या दिशेन पाहतात. गोंगाट वाढत्या सुरात जवळ येऊ लागतो. दोघेही बेंचावरून उठून उभे राहतात. एक माणूस वेगाने धावत येतो. त्याला उद्देशून––]

दिघे : काय झालं हो ?

पहिला माणूस लोंढा आला. (धूम पळतो. लगेच दुसरा येतो.)

दिघे कशाचा लोंढा आला हो ?

दुसरा माणूस : पुराचा लोंढा. पर्वतीएवढ्या उंचीचा पाण्याचा लोंढा. फार भयंकर. मी डोळ्यांनी पाहिला. पळा. (पळतो. इतक्यात दाढी वाढलेला वेडा येतो.)

वेडा (सुलूकडे पाहून) पळू नका. मी लोंढा पाहिलाय. (शास्त्रज्ञाच्या ठसक्यात) पाणी––H_2O, एच. टु. ओ. चा लोंढा आला ····· (हसतो···सुलभा दचकते. ती दिघेजवळ जाऊन त्याचा हात धरते. वेडा तशीच बडबड करीत विकट हसत निघून जातो. आपण दिघेचा हात धरला आहे हे सुलभेच्या लक्षात येते. ती गोरीमोरी होते. दिघे हसत राहतो. गोंगाट जास्तच जवळ येतो. मोटारींची घर्घर. लाऊडस्पीकरवरून जोरात घोषणा ऐकू येतात. 'पानशेत आणि खडकवासला ही दोन्ही धरणे फुटली आहेत. नागरिकांनी सावध असावे.' दिघे आणि सुलभाची चमत्कारिक नजरानजर होते.)

सुलभा : बाबा घरी एकटेच आहेत.

दिघे : अग, ते पाणी काय तुझ्या माझ्या घरापर्यंत येणार आहे ?

सुलभा : पण मला भीती वाटायला लागली आहे. (ती त्याच्याजवळ येते. तो हात पुढे करतो. पण ती हात देत नाही.) मला घरी पोचवून देशील ?

दिघे (थंडपणे) चल.

[गोंगाट जास्तच वाढतो. ते दोघेही विलक्षण घाईने निघून जातात. इतक्यात पडदा.]

४

[वेळ–रात्रीची. पडदा उघडतो. नानू दिघेचं घर. शांताबाईची रियाझीची खोली. पुराच्या पाण्यामुळे भिंतींचा रंग धुऊन निघाला आहे. भिंती चिखलामुळे काळचा झाल्या आहेत. शांताबाई गाळात मरून उपडी पडली आहे. तिच्या कवेत तानपुरा तसाच आहे. चांदीचे स्वरमंडळ, डग्गा गाळात रुतून बसले आहेत. जिकडे तिकडे भीषण नासधूस. नानू दिघे प्रवेश करतो. त्याची पँट पूर्ण ओली आहे. कोटावर चिखलाचे डाग पडले आहेत. केस अस्ताव्यस्त आहेत. पार्श्वभूमीतून जोगियाच्या मिंडी हळूहळू ऐकू येत आहेत.]

नानू दिघे (प्रवेश करून भीतीने किंकाळी फोडतो. ममी···म्हणण्याऐवजी म··मा···ई असे होते.) मा ई···आ · ई···

(ती काहीच हालचाल करीत नाही असे पाहून धावत सुटतो आणि तिच्या मृत देहाला मिठी मारतो.)

आ··ई· आ···ई ··(तिच्या पाठीत मान घुसळतो.) काय केलंस हे···? (त्याचा हात अचानक तानपुऱ्याच्या तारांवर पडून ध्रो···प···असा वेसूर आवाज येतो. तो दचकतो.) तू खरंच शेवटची बैठक गायलीस ग ? आ···ई···आ···ई···

[जोगियाचे स्वर अचानक थांबतात. मधूनच आजूबाजूच्या लोकांचे दचकविणारे आवाज येतात. शिडी आणा···दोर फेका··· इथंही गाळात प्रेत रुतून बसलं आहे···ही पुस्तकं घ्या···बाबुराव अजून कुठं काही दिसत नाही··ते प्रेत त्यांचंच तर नाही. जरा ओळख पटवा···हा देव्हारा सापडला···ही मिर्च्यांच्या पुडेची बरणी ··

आवाज वाढतच जातात. नानू दिघे या कल्लोळाकडे मान वर करून लक्ष देत आहे. पुन्हा आईच्या पाठीत मान खुपसतो. जोगियाच्या मिंडी पुन्हा हलके हलके सुरू होतात. इतक्यात घाटपांडे प्रवेश करतो.]

घाटपांडे : (विंगमधून हाक मारतो.) नानू··· ए नानू··· (नानू हुंदके देतो.)

[घाटपांडे अर्ध्या स्टेजमध्ये येतो. त्याचाही अवतार नानूसारखाच आहे. तो नानूजवळ जातो. त्याच्या पाठीवरून पुष्कळ वेळ हात फिरवीत राहतो. तो पुन्हा विंगमध्ये परत जातो. दोन मिनिटात पुन्हा परततो. त्याच्यावरोबर मिलिटरीतील काही माणसं असतात. पुन्हा मघाचेच आवाज इथंही सुरू होतात. ही खुर्ची घ्या···हा डग्गा घ्या··· हा तंबोरा उचला···परंतु नानू तरीही निपचित पडून असतो. इतक्यात पडदा पडतो.]

५

[पडदा उघडतो तेव्हा—संपूर्ण स्टेजचे एका अरुंद पार्टिशनद्वारे दोन भाग केले आहेत. अरुंद पार्टिशनच्या आतून इकडून तिकडे जाण्याचा रस्ता आहे. नानू दिघे उजवीकडील रंगमंचाच्या विंगजवळ उभा राहून शून्य नजरेने आकाशाकडे पाहात आहे. त्याचे कपडे मळके असून केस विस्कटलेले आहेत. आपण नेमके सुलभेच्या घराजवळ उभे आहोत याचे त्याला भान नाही. पार्टिशनमधील दारातून सुलभा आणि एक नवाच तरुण बाहेर येतात. तिची नानूवर दृष्टी पडते.]

सुलभा (संकोचून.) कोण ? नानू···?

नानू दिघे (दचकून तिच्याकडे आणि त्या तरुणाकडे अपरिचित भावाने पाहू लागतो.)

सुलभा (गोरीमोरी होऊन. जवळ जाऊन) आई गेल्याचं कळलं. मी येणार होते. पण कामामुळे येणं झालं नाही. (यावेळी नानू त्या तरुणाकडे पहात असतो.)

अनुक्रमणिका

सुलभा : अरे हो विसरलेच की. हे माझे मित्र वसंत नेरकर. (तो तरुण नमस्कार करतो. नानूही नमस्कार करतो.) सॉरी हं···पुन्हा कधीतरी ये. आम्ही आता पिक्चरला जात आहोत. आत जा ना. बाबा आहेत. (त्याच्या वेंधळेपणाकडे निग्रहाने दुर्लक्ष करून ती त्या तरुणाला चलण्याची खूण करते. नानू त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पहात पुष्कळ वेळ उभा राहतो. नंतर तो यांत्रिकपणे पार्टिशनच्या दारातून आत जातो. आत गोल केस कापलेला उग्र चेहऱ्याचा एक पेंशनर बसला आहे.)

पेंशनर : या या नानूराव. वसा. तुमची आई गेल्याचं कळलं. फार वाईट झालं. तुमच्या ससपेंशनची ही नवीन भानगड काय आहे हो ?

नानू (वसता वसता उठून) अं···काय म्हणालात ?

पेंशनर : तुमच्या ससपेंशनविषयी बोलत होतो मी.

नानू : कुणास ठाऊक !

पेंशनर (खांदे उडवून) नवल आहे.

नानू : (झोपेतून उठल्यासारखा) अं···

पेंशनर (संशयाने) तुमची प्रकृती वरी आहे ना ?

नानू : अं···

पेंशनर (चिडून) असं काय करताहात ? शुद्धीवर आहात कि नी ? (शहाणपणाने) असं करा नानूराव, तुम्ही लग्न करून टाका. माझ्या जवळच्या नातेवाईकांची एक मुलगी आहे. सुन्दर आहे.

नानू (स्वप्नात असल्यासारखा) सुलू····

पेंशनर : (चिडून) नॉनसेन्स. ती बाहेर गेली आहे. पुन्हा कधीतरी या. (दोन मिनिटं वाट पाहून) मला गणपतीला जायचं आहे. (नानू उठतो आणि हळूहळू चालत बाहेर जातो. पेंशनर त्याच्याकडे वेड्यासारखा पाहात राहतो. नानू बाहेर येतो. तिकडून घाटपांडे येतो.)

घाटपांडे : (कपाळावर हात मारून) राजश्री, तुम्ही तर इथं आहात ?

नानू (त्याला ओळखून) तू कुठून आलास ?

घाटपांडे अरे राजा···तुलाच शोधत आहे एका तासापासून. डॉक्टरांकडे जायची वेळ झाली आहे ना ?

नानू : डॉक्टर ? आपण रोज जात असतो तिथं ?

घाटपांडे : हं···चल ना. (त्याचा हात धरून त्याला नेऊ लागतो.)

[इतक्यात पडदा.]

६

[पडदा उघडतो. वेळ रात्रीची. स्थळ—डॉ. नाथ यांचे मानसोपचारप्रयोग थिएटर. डॉ. नाथ प्रौढ वयाची एक कलंदर व्यक्ती. अंगावर ग्रे क्वाड्राचा संपूर्ण सूट. गळ्याला निळ्या रंगाचा बो. हातात काळे मोजे. तोंडात पाईप. संपूर्ण थिएटरात निळसर रंगाचा प्रकाश पसरला आहे. त्या प्रकाशात तपासणी टेबल, वेगवेगळ्या नळ्या आणि उपकरणे चकाकत आहेत. डॉ. नाथांजवळ कमिश्नर प्रधान आणि घाटपांडे वसले आहेत. ते सगळे जण खालच्या सुरात काही तरी कुजबुज करीत आहेत. मधूनच त्यांचे आवाज मोठे होतात आणि प्रेक्षकांना दिघेची आई, मृत्यू···अवर्षण···सुलभा··· नेरकर ··ससपेंशन···असे शब्द ऐकू येतात. कुजबुज वाढतच जाते. तसे डॉ. नाथांच्या पाईपातील धुरांचे लोटही वाढत जातात. डॉ. नाथ काही वेळ अतिशय विचारात गढून जातात. तेव्हा प्रधान आणि घाटपांडे हे दोघेही अतिशय चिंताग्रस्त बनत जातात.]

डॉ. नाथ : घाटपांडे, त्यांना आणा वरं. पाहू आज काही क्ल्यू मिळतो का ते.

[घाटपांडे उठून विंगमध्ये जातो. दोन क्षणात एक नर्स, दिघे आणि घाटपांडे परत येतात. डॉ. नाथ दिघेकडे अतिशय सहानुभूतीने पहात राहातात. लगेच ते नर्सला उद्देशून टेबलाकडे बोट दाखवितात. नर्स दिघेला टेबलावर बसविते. ती त्याच्या डोक्याशी हातांचा काहीतरी विलक्षण स्पर्श करते. अगदी बारीक सुईची सिरींज त्याच्या मानेखाली टोचते. दिघेचा क्षीण चेहरा आता बदलू लागतो. तोपर्यंत डॉ. नाथ आपल्या अंगावर निळा गाऊन चढवितात. हात लांबवून थिएटरमध्ये पूर्ण

अंधार करतात. पण त्याच वेळी फक्त दिघेंच्या चेहऱ्यावर निळसर प्रकाशाचा मोठा कवडसा पडतो. डॉ. नाथ त्याच्या चेहऱ्याला हळूहळू स्पर्श करतात. दिघे डोळे बंद करतो. त्याचा चेहरा अतिशय ताजातवाना दिसू लागतो. तो हळूहळू खाली कलंडतो. डॉ. नाथ त्याच्या मानेखाली हात देऊन मान हवेच्या मोठ्या उशीवर ठेवतात. कपाळाला स्पर्श सुरूच. पाच मिनिटं विलक्षण शांतता…]

डॉ. नाथ : (विलक्षण हुकमी आवाजात) तू नानू दिघे आहेस… (प्रतिक्रिया नाही असे पाहून.) …तू नानू दिघे आहेस….

दिघे : (क्षीण आवाजात) मी नानू दिघे आहे.

डॉ. नाथ : (उत्तेजित होऊन) हत्तीएवढी एक उंच लाट आली….

दिघे पर्वतीएवढी एक उंच लाट आली.

डॉ. नाथ (थांबून…आश्चर्याने) खोलीत आई उपडी पडली होती.

दिघे : (रीळ उकलल्यासारखे) आणि आई-जवळ तानपुरा होता. ट्रों…ग…बेसूर…! ममीला बेसूर आवडायचं नाही. या सुरांनीच तर डेप्युटी कलेक्टर केलाय. आई पुराच्या पाण्यात गेली. तिची वाफ झाली. अ व र्ष ण…H_2O आले…H_2O आलेच नाही.

डॉ. नाथ : आई पाण्यानंच नेली होती. मुलं पाण्यानंच मेली. गुरं पाण्यानंच मेली. खूप समाधान. आनंद… (डॉ. नाथ खिशातून एक पांढरे पीस काढून त्याच्या गालावरून फिरवितात. दिघेंच्या चेहऱ्यावरून समाधानाचे लोट वाहताना दिसतात.)

डॉ. नाथ : पण हे समाधान बोलून दाखविता येत नव्हते.

दिघे : नाही. रडू येऊ पहायचं. पाऊस पडतच नव्हता. थेंब जमिनीवर पडतच नव्हते. ढगात गेलेली आई रडतच नव्हती. आ…ई रडतच नव्हती …आ…… (आवाज क्षीण होत जातो.)

डॉ. नाथ (धावरून) नर्स.

[नर्स दिघेजवळ जाऊन त्याच्या दंडात, हातात तयार असलेली सिरिंज टोचते. त्याला कपातून मिश्रण पाजते. डॉ. नाथ त्याची स्टेथेसकोपने छाती तपासतात. डॉ. नाथ बटन दाबतात. थिएटरमधील दिवे येतात. दिघे हळूहळू उठून बसतो. बावरल्यासारखा इकडे तिकडे पाहतो. नर्स त्याला विंगमध्ये घेऊन जाते. प्रधान, घाटपांडे मंडळी अस्वस्थ होऊन घाम पुसतात.]

डॉ. नाथ (निळा गाऊन अंगावरून काढीत.) यु हॅव आय विटनेस्ड द कंडिशनस्. दिघे दोन महिन्यात पूर्ण बरे होऊ शकतील. पण…

प्रधान (उत्सुकतेने) पण काय डॉक्टर ?

डॉ. नाथ पण मला त्यांच्या हार्टविषयी चिंता आहे. मी डॉक्टर दावरांना पत्र देतो. त्यांची हार्ट ट्रीटमेंट सुरू ठेवा. आणि वॅ. दासांची आणि माझी भेटीची वेळ ठरवा.

घाटपांडे (आनंदाने) ओ येस, डॉक्टर.

प्रधान : प्रामाणिक माणसावर परमेश्वर कशी संकटं आणतो, डॉक्टर !

डॉ. नाथ ईश्वर नव्हे प्रधानसाहेब, आपणच. धिस नटोरियस वर्ल्ड. आंधळी नियति. ईश्वराचं दर्शन तर तुम्हाला मी मघाशीच घडवलंय.

प्रधान घाटपांडे (दोघंही एकदम आश्चर्याने) ते कसं काय डॉक्टर ?

प्रधान : डॉक्टर, कोड्यात नका टाकू, प्लीज.

डॉ. नाथ (कलंदरपणे हसून) मग मघाशी काय पाहिलंय ? ईश्वर त्यापेक्षा वेगळा नाही. काय क्रिस्टल क्लिअर पोरभाव आहे. या पोरभावापेक्षा, या कनफेशनपेक्षा ईश्वर वेगळा कुठला ?

घाटपांडे : पण फ्राईड तर याला सेक्स कॉम्प्लेक्स म्हणतोय म्हणून केवढं वादळ.

डॉ. नाथ (जगाची कीव करीत) लोक कॉम्प्लेक्स, सेक्स शब्दांनाच दचकतात, दुसरं काय ? खरं म्हणजे तेच सेक्स ऑबसेस्ड असतात. ते एखाद्याचा राजकीय मृत्यू सहज घडवून आणतात. पण केवढं सत्कृत्य केल्याचं समाधान. पुन्हा देशसेवा त्यांच्या मदतीला धावून येतेच. इथं तसं नाही. पाणी आलं. पाणी आलं नाही. हा कॉंपलेक्स. पुन्हा मृतांविषयी आकस नाही. त्याला जे समाधान झालं त्यातही दुष्टावा नाही. पण ती प्रतिक्रिया टाळणं हे त्याच्या आवाक्याबाहेरचं फिजिकली अँड मेंटली…असं होतं आता फ्राईडविषयी म्हणाल तर गोष्ट वेगळी आहे.

(थांबून) आपलं काय होतंय···आपण सत्याचे प्रकार पाडतो. हे देशी सत्य. हे विदेशी सत्य. मग हे आपल्याचकडे फार आधी फार प्रमाणात पिकलं···· वगैरे. ही सगळी वादळं माझ्या मते एका कॉंपलेक्स-मधूनच निर्माण होतात. पण हा विषय वेगळाच आहे.

घाटपांडे (निर्विकार आशाळभूतपणे) पण डॉक्टर, सुलभाविषयी काही ?

डॉ. नाथ (हसून) घाटपांडे, ही एक्सरे मशीन नव्हे सगळंच दिसायला. त्यासाठीही प्रयत्न करावा लागेल. पण फोटोग्राफीसारखं सगळंच विश्वसनीय नाही मानता येणार. शिवाय हे प्रयोग वारंवार नाही करता येणार. मघाशी त्याचा पल्सरेट कमी झाल्याबरोबर मध्येच थांबावं लागलं.

[इतक्यात प्रधान खिशातून शंभराची एक नोट काढून डॉक्टरांना देऊ लागतो.]

प्रधान : युवर फी डॉक्टर !

डॉ. नाथ अजून पेशंट दुरुस्त व्हायचाय. दिघे-सारख्या तरुणाचं आयुष्य मी वाचवू शकलो तर माझी फी मला मिळून जाईल.

प्रधान (भारावून) थँक यु डॉक्टर. आता पुन्हा भेट कधी ?

डॉ. नाथ कम टुमॉरो विथ दिघे.

प्रधान, घाटपांडे : अच्छा. थँक यु डॉक्टर.

डॉ. नाथ : नो मेंशन प्लीज (हात वर करून) वराय ! (दोघे विंगमध्ये निघून जातात. डॉ. नाथ पाईपला काडी लाऊन धुराचा भपकारा सोडतात. इतक्यात पडदा.

७

[पडदा उघडतो तेव्हा. सेशन्स कोर्ट बसले आहे. कारकून इकडच्या फाईली तिकडे करीत आहे. डॉ. नाथ साक्षीदाराच्या पिंजऱ्यात खुर्चीवर बसले आहेत. बॅ. दास आणि प्रॉसिक्युटर कायद्याची थोरली पुस्तके चाळत आहेत. कमिश्नर, प्रधान, घाटपांडे आणि इतर उत्सुक लोकांनी कोर्ट खच्चून भरले आहे.]

सेशन्स कोर्ट ऑर्डर ऑर्डर ! (डॉ. नाथांना उद्देशून) डॉक्टर, तुमचे पेशंट श्री. दिघे यांनी आपल्या कामाची हयगय केल्याची आणि त्यामुळे अवर्षणात झालेल्या सर्व हानींची जबाबदारी स्वीकारल्याची लेखी जबानी बॅ. दासांमार्फत पाठविली आहे. त्यांची प्रकृती कोर्टात हजर राहण्याइतपत चांगली नाही असं डॉक्टर दावरांचे सर्टिफिकेटही आहे. या प्रकरणात तुमचा सल्ला घ्यावा म्हणून तुम्हाला मुद्दाम बोलावण्यात आले आहे. श्री. दिघे हे वेडे झाले असं तुम्ही म्हणू शकता काय ?

डॉ. नाथ : नाही, युवर ऑनर. ते वेडे असते तर ही केस आहे त्यापेक्षा किती तरी सरळ झाली असती. मे आय कंटिन्यु युवर ऑनर ?

सेशन्स कोर्ट : ओ येस. तुम्हाला या बाबतीत जे काही सांगायचं असेल ते सांगून टाका.

डॉ. नाथ : श्री. दिघे हे वेडे आहेत असं सांगता आलं असतं तर कदाचित त्यांची कायद्यापासूनच्या सुटकेची बाब सुलभ होऊ शकली असती. परंतु डॉक्टर आणि शास्त्रज्ञ या नात्यानं मला तसं सांगता येत नाही. अँड नो डॉक्टर वुड सर्टिफाय हिम टु बी ए ल्युनाटिक.

सेशन्स कोर्ट : मग एखादा स्पेसिफिक असा शारीरिक डॅमेज दाखवून देता येईल ?

डॉ. नाथ : नाही, युवर ऑनर. त्यांच्या हार्टची गंभीर अवस्था सोडून दिली, तर तसं काही दाखवून देता येणार नाही. परंतु तरी दिघेंची स्थिती एखाद्या दृश्य व्याधीपेक्षाही भयंकर आहे. त्यांच्या आईच्या पुरातील मृत्यूमुळे त्यांच्या जागृत मनाला विलक्षण धक्का दिला आहे. त्यात पुन्हा अवर्षणाच्या न आलेल्या पाण्याचा त्यांच्या सबकॉंशन्समध्ये एका विचित्र असो-सिएशनमुळे गुंता निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या जागृत मनापैकी तीन चतुर्थांश मन निकामी झाले आहे. बन फोर्थ जे धक्क्यातून वाचले आहे, त्याचा उपयोग वस्तु ओळखणे, आपले नाव सांगणे, आरोप कबूल करणे...एवढ्यापुरताच राहिला आहे. परंतु त्या पाठीमागील 'जाणीव' ही संपूर्ण सबकॉंशन्समध्ये केंद्रित झाली आहे. त्यामुळे दिघेंची स्थिती ही त्या योद्धयाच्या पत्नीप्रमाणे झाली आहे, द वाईफ ऑफ ए वॉरियर हू डिड नॉट रिटर्न फ्रॉम द बॅटलफिल्ड. एका आत्मस्वातंत्र्य, वील टु अॅक्ट, गमावलेल्या व्यक्तीच्या कमिटमेंटस् या कायद्याच्या कक्षेत येऊ शकतात काय हा प्रश्न आहे. (संपवीत) थँक यु युवर ऑनर दॅट इज व्हॉट आय वॉंटेड टु से.

सेशन्स कोर्ट : मि. प्रॉसिक्युटर; तुम्हाला यांना काही विचारायचं आहे ?

प्रॉसिक्युटर : नो मिलॉर्ड. डॉ. नाथांना यापेक्षा काही विचारायचं नाही. ही कॅन टेक हिज सीट... (डॉ. नाथ पिंजऱ्यातून उठून खालच्या खुर्चीवर जाऊन बसतात) परंतु तरीही त्यांच्या साक्षीचा उपयोग आरोपीला वाचविण्याकरिता केला जाऊ शकत नाही. कोणताही डॉक्टर दिघेंना वेडे म्हणू शकत नाही हे डॉक्टरांनीच सांगितले आहे. त्यामुळे अवर्षणांचे रिपोर्टस् येऊनही त्यांची दखल न घेण्यात दिघेंचा वाईट हेतू नव्हता असे काही सिद्ध होऊ शकले नाही. वाईट हेतू नव्हता असं डॉक्टरांच्या ज्या उपपत्तीवरून म्हणता येऊ शकेल, ती कायद्याच्या दृष्टीनं उपयोगाची नाही. कारण कायद्याला व्यक्तीच्या उघड वर्तनाशी जास्त कर्तव्य आहे. डॉक्टरांच्या उपपत्तीविषयी मला अनादर दाखवायचा नाही. परंतु कॉंशन्स सबकॉंशन्स ह्या गोष्टी आत्म्याप्रमाणेच न दिसणाऱ्या आहेत; ॲट लीस्ट दे कॅन नॉट बी ट्रेसड् बाय एक्सरे ॲंड अदर मीन्स. दिघेंच्या वागण्यात वाईट हेतू नसेलही–डॉक्टरांच्या सिद्धांताप्रमाणे, पण हेतूच नव्हता हे मात्र सिद्ध होत नाही.

बॅ. दास : आय हॅव ऑबजेक्शन युवर ऑनर.

सेशन्स कोर्ट : येस.

बॅ. दास : श्री. दिघेंच्या हेतूत, हेतू आणि वाईट हेतू असा निष्कारणच फरक माझे मित्र करीत आहे. या केसमध्ये वाईट हेतू नसेल म्हणजे हेतू नसेल असेच गृहित धरावयास पाहिजे. एरव्ही कोणता वाईट हेतू होता हे सांगण्याची जबाबदारी माझ्या प्रज्ञावान मित्रावर येऊन पडेल.

सेशन्स कोर्ट : फुकट पगार घेता यावा, आरामशीर जगता यावे म्हणून जबाबदारी झटकणे हा हेतू, आणि त्याला मग डॉक्टरसाहेबांची साक्ष पुन्हा छेद देईल. इट विकमस् ए बॅड सर्कल; यु सी···बॅ. दास.

बॅ. दास (उसळून) युवर ऑनर; ज्या माणसानं आपलं कमिटमेंटचं स्वातंत्र्यच गमावलं असेल, ज्याच्या हेतूविहीन कृत्याचं मूळ, समुद्रातील एखाद्या हिमनगाचे सागराच्या खोलीत असतं, तसं त्याच्या मनोव्यापारातील खोल गुंतागुंतीत असेल. ए मॅन, वन हू डज नॉट ॲक्ट ॲट ऑल, ते वर्तन कायद्याच्या कक्षेत येऊ शकते काय ?

प्रॉसिक्युटर : (उपरोधाने) मग माझे मित्र त्यांच्या बचावासाठी आरोपीला वेडा म्हणून का सांगत नाही ? सर्टिफिकेटस् कुड बी मेड ॲव्हेलेबल···

सेशन्सकोर्ट (कडक शब्दात) सत्याचा सोयीशी सौदा करण्याची ही जागा नव्हे. ॲंड द प्रॉसिक्युटर यु आर सच पुटिंग इट···? (प्रॉसिक्युटर खजिल होतो···)

प्रॉसिक्युटर (नरम शब्दात···) मला हे म्हणायचं होतं की···ऑल अदर केसीस ऑन द सेम ग्राऊंड कुड बी ॲक्विटेड बाय लुकिंग डीप इनटु देअर कांशन्स ॲंड सब कांशन्स.

सेशन्सकोर्ट : नॉट ॲक्चुअली दॅट. पण बॅ. दास ही एक विशिष्ट केस डील करण्याऐवजी संपूर्ण कायद्याच्या निर्मितीची व्यर्थता सांगू पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. मला या केसविषयी सहानुभूती असूनही श्री. दिघेसाठी काही करता येईल किंवा नाही याची शंका आहे. कारण आय. पी. सी. च्या सेक्शन ३३६, ३३७ प्रमाणे···(इतक्यात फोनची घंटा खणखणते. कोर्ट फोन उचलते. विचित्र आवाजात) आं ? ओ ! सिंपली शॉकिंग.

बॅ. प्रॉ व्हॉटस् द मॅटर युवर ऑनर ?

कोर्ट (जड सुरात) मि. दिघेंना पाचच मिनिटापूर्वी देवाज्ञा झाल्याचं डॉ. दावरांनी हॉस्पिटलमधून कळवलं आहे. ज्याच्या अपराधाबद्दल कोणती शिक्षा योग्य होईल याची चर्चा आपण करीत होतो त्या व्यक्तीची दयामय परमेश्वराने अशी सुटका केली. दिघ्यांची केस पाहिल्यानंतर वाटतं की जे दिसतं अथवा प्रकट असतं तेवढ्याशीच कायद्याला नव्हे तर सर्व मानवी व्यवहारांना कर्तव्य असतं. पण जे प्रकटतं ते अप्रकटाचा केवळ अंशमात्र असतं. व्हॉट ए ब्लाईंड ट्रॅव्हेल ? (हुश्श करीत) ॲम आय राईट डॉ. नाथ ?

डॉ. नाथ : दिघ्यांच्या मनात खरोखर काय होतं हे आता कळायला काहीच मार्ग नाही. बट व्हॉट यु सेड इज क्वाईट करेक्ट. बर्फाचं घर पाण्याखाली···

[सर्वजण एक मिनिट अधोमुख होऊन उभे राहतात. घड्याळाची टिकटिक वाढते. आतून जोगियाच्या मिंडी ऐकू येतात. इतक्यात पडदा.]

[प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. —लेखक.]

[आकाशवाणी, नागपूरच्या सौजन्यान]

आम्ही दोघं—

—कुंदा पारसनीस

दोन म्हातारे. एकमेकांच्या डोळ्यांशी स्पर्धा करणारे भेदक डोळे–पण आता विझत चाललेले. एकमेकांकडे मघापासून बघताहेत. बोलावं म्हणून ओठ स्फुरताहेत. पण त्या ओठांना हट्टीपणाची मुरड आहे. पूर्वीसारखी कडकडून मिठी मारावी अशी भावना उफाळते आहे. पण वर्षाची, प्रसंगांची भिंत आड येते आहे.

शेवटी राहवत नाही. सर्वांगातून आवेगानं फुटून ती बाहेर येते. आम्हा दोघा मित्रांची भेट होते.

तशी भेट नियमित वर्षांनी होत होती, नाही असं नाही. दर तीनचार वर्षांनी मोहनरावांची भारतात फेरी व्हायची. प्रथम दुरून दुरून चौकशी; नंतर समेट. पहिली भेट झाली ती पत्रानं. मालिनी गेल्याचं कळल्यावर मोहनरावांनी लिहिलं होतं, "वहिनी गेल्याचं कळून मन सुन्न झालं. आता मी पुरता त्यांच्या मायेला पारखा झालो. त्या प्रसंगामुळे आपल्यात दुरावा निर्माण झाला होता तरीही मला आशा होती की केव्हातरी मी माझ्या वहिनीच्या सैंपाकघरात बसेन, चहा पिईन, त्यांचं प्रेमळ रागावणं ऐकेन, त्यांचे आशीर्वाद घेऊन धन्य होईन. पण संपलं, सारंच संपलं ! तुमच्यावर तर वज्राघात झाला आहे..." मीही उत्तर पाठवलं, समझोता झाला. झालं गेलं विसरून जाऊ. दोघंही म्हणालो. पण मनं पहिल्यासारखी एक झाली नाहीत ती नाहीतच. चिकटवलं, अगदी बेमालूम चिकटवलं, तरी तो मधला अतिसूक्ष्म थर, स्टिकोप्लास्टसारखा, परकाच—सांध्याची खूण दाखविणारा. एक जीव होत नाही, नुस्ता भास होतो. दुसऱ्यांना स्वत:लाही.

जेव्हा माझं ललिताशी लग्न झालं तेव्हा मुद्दाम रजा काढून मोहनराव आले होते. "ललिता तुझ्याशी लग्न करतीय् ही भाग्याची गोष्ट आहे. अतिशय हुशार, गुणी मुलगी आहे ही ! मालिनीवहिनींची जागा नक्की भरून काढील. वसंतराव ! तुम्ही भाग्यवान—"

म्हटले, "बाबारे प्रेम, लाभे प्रेमळाला—तुम्ही संधीच दिली नाहीत हे कळून घ्यायला."

मोहनराव आक्रसून म्हणाले, हे पहा. त्या विषयावर बोलायचं नाही. त्यावर पडदा पडलाय्."

पडदा ! खरं आहे—नाही; पुसूनच टाकलंय ते. मालिनीही पुसून गेली. ती आणि तिची स्वप्नं !

अमला तिला म्हणाली होती, "वहिनी, तुम्ही नि वसंतराव यासारखा प्रेमी संसार हवा. करा ना काही. तुमच्या घरी मोहन भेटला हा शुभशकुनच म्हणायचा ?"

शुभ की अशुभ ? कुणास ठाऊक !

आमच्याच घरी तर साऱ्या गोष्टी घडल्या. आमच्याच घरी अमलाही पुसून गेली.

"......तुम्ही अगदी भलता अर्थ काढलात वसंतराव ! मला अमला आवडते. पण आपण सगळे मित्र तशी ती एक. असं प्रेम नाही. माझ्यापुढे ध्येय आहे. ब्रिस्टलला जायचंय. डॉक्टरेट मिळवायची आहे. खूप काम करायचं आहे. आयुष्यात लग्न एवढीच महत्त्वाची गोष्ट आहे का ? संसारात पडायला मी एवढ्यात तयार नाही."

" मोहनराव, तुमचं वागणं प्रेमाचं नव्हतं ? आम्हा सर्वांचीच दिशाभूल झाली ? अमलेला काय वाटेल ? तिच्या मनाशी तुम्ही खेळलात···"

" तिला काही वाटायचं नाही. ती भक्कम मनाची मुलगी आहे. विचारी आहे. "

स्वप्नवह्यांना मालिनीनं त्यांना फिरायला पाठवलं होतं. तेलखेडीवरून दोघं फिरून आले. गप्पगप्प, मृत्यूचा वास गडद झाला. सावडलेली राख गुदमरवू लागली.

" अहो, काही विचारा ना अमलेला. काहीच सांगत नाही. "

तिला काय विचारायचं अन् ती काय उत्तर देणार ! चोळामोळा झालेल्या गुलाबासारखी ती दिसत होती. वाकड्या, मुडपलेल्या पाकळ्या, मधले, उघडे पडलेले पिवळट, चॉकोलेटी ठिपके—हृदयातल्या आटून गेलेल्या, साकळून गेलेल्या रक्ताचे.

त्या दिवशीच अमला गावी निघून गेली.

" मोहनराव, आपण दूरच बरे. तुमच्या आयुष्याचं तुम्ही काय वाटेल ते करा. मला मालीला जपलं पाहिजे. (म्हणजे जपायचं तिचं मन. देहाचं काय—डॉक्टरांनी सांगितलंच आहे, नुसतं बघत बसायचं !)"

" वसंतराव, असे तापता का ? अमलेमुळे आपल्या स्नेहात बाध का म्हणून—"

" जा ! जा तुम्ही ! "

तापू नको तर काय करू ? मालिनीचा ताप वाढत होता. त्यात ती निराशेची ठिणगी. चिता प्रज्वलित करायला अशा एकेक ठिणग्या कामी आल्या होत्या.

" मला पहिला मुलगा झाला पाहिजे " हातावरच्या टचटचलेल्या शिरा, निस्तेज डोळे. करीत होती; सारखी करीत होती; आत्याबाईंचं, क्षयी वंडूचं. आत्याबाई तिच्या हाती लंगड्या बाळकृष्णाची सुंदर मूर्ती देऊन गेल्या पण तो घरभर कधी रांगलाच नाही.

" मेलं माझ्या हातालाच अपयश आहे. अमलेचं तसं झालं. आत्याबाई गेल्या. वंडू गेला. आता आपलं बाळ तरी—"

नाही ग नाही माले ! तुझ्या हाताला नाही—मीच करंटा. मी तुझी हौस पुरवू शकलो नाही. मृत्यूचा वास घरात भरलेला होता. बाळंतिणीच्या खोलीत तो केव्हापासूनच वाट पाहात उभा होता. सगळं माहीत होतं. पण तुझ्या स्वप्नांमधे मलाही रंग भरावा लागत होता. तुझ्या विझत्या डोळ्यांमधे सूर्यकिरण खेळवायला. खऱ्या प्रेमानं खोटं हसत ! अमला, मोहन, इतर जग—कशाकशाचं भान नव्हतं. फक्त एकच ! जे काही थोडे दिवस आहेत ते सोनेरी, मुलायम बनवायचे. एकच ! शेवटचा दीस गोड व्हावा—

पण शेवट कडूशार—

शेवटी, अगदी अखेरच्या क्षणी मी दूरच—माले, तू मला हाक मारलीस का ? मला काही म्हणालीस का ? ते कधीच—कळायचं नाही !

तुझं हेही स्वप्न अपुरंच ! पोटी मुलगा होता. वीट वीट लांब जावळ, पापण्यांचे दाट केस—पण—पण—त्याला घेऊन मी आणि पद्मनाभ गेलो. माझं पहिलंच मूल. पोटच्या पोराचा मृत्यूही पहिलाच. लौकर परतायला हवं—She is fast sinking–कानातल्या सूंऽकुई आवाजाचा भेद करून कोरडे प्रश्न — दाखला, पास असेच कशाबद्दल. " आता काय ! " इतका वेळ कवटाळलेली शक्तीच गेली ! समोरच्या टेबलावर आधारासाठी तसेच हात टेकवले. तो माणूस भयंकर रागावला. हे तुम्ही काय चालवले आहे ? उचला ते गाठोडे ! तुम्हाला काही रीतीभाती ... "

गाठोडे ? अरे देवा ! नाही नाही ! मला तसं काही करायचं नव्हतं. किती ठिकाणाहून हे आसुडाचे फटकारे ! अजाणता घडलेल्या कृती, मनात वाईट नसता झालेल्या गोष्टी —.

घरी आलो — माली जग सोडून गेली होती. हातात कृष्णाची मूर्ती चेहऱ्यावर हासू ! — आणि ओठावर काय होतं ? माझं नाव ? काय ? काय ?

ललिताच्या आणि माझ्या लग्नानंतर मोहनरावांच्या भेटी अनेकदा झाल्या होत्या. मालिनीचं नाव मी पुसलं—अमलेचं त्यांनी—मनोहरराव एक मोठा माणूस. पीएच्. डी. झाला; ब्रिस्टल, कोपनहेगनला राहून केवढं संशोधन केलं ! " अरे, कामात बुडून गेलं की मनाला कसली म्हणून पीडा नाही ! "

" मोहनराव, ऐकलंत ? अमला कॅन्सर होऊन गेली. हूं ! काय मिळालं तिला आयुष्यात ?"

" का वरं ? पाँडिचेरीला समाधानात होती. पहिल्यापासून तिचा कल होताच. "

" पण मग हा जीव कुरतडणारा कॅन्सर ? तिनं मनात दुःखच केलं असणार. " (उरी दुःख सलत राहिलं तिच्या. जिथल्या गाठीतून पान्हा यायचा तिथनं नुसत्या वेदना झरझरल्या.)

" तिनं असं छातीशी दुःख जपायला नको होतं. मी कसं विणून टाकलं आयुष्यात ! अरे सतत काम—new fields to conquer—

निस्संशय मोठा माणूस ! लहान मनाला न पेलणारा. ही लहान मनं वैयक्तिक सुखदुःखंच जाणणारी. नाजूक भावनांना जपणारी. मृत्यूच्या वासात प्रीतीचा श्वास मिसळवणारी. वैश्विक झेप त्यांना एक माहिती. विश्वात विलीन होणारी—मृत्यूची.

मालिनी आणि अमला.

आणि मी ?

दार ठोठावून परत आलेलो. जीवावरच्या दुखण्यातून उठलो म्हणून मोहनराव भेटायला आले आहेत. " Buck up, old boy ! अजून तुम्हाला किती लिहायचंय. पुन्हा फॉर्मात आला आहात ! "

" होय ! अजून वरंच लिहायचं आहे. अजून ललिताला, मुलांना माझी फार जरुर आहे. मधेच जाता नये—ते दुःख मला माहिती आहे. "

···पुसून गेलेली मालिनी आणि तिची स्वप्नं...

" मोहनराव, आता आपण दोघंही वृद्ध झालोत. आयुष्य आता पाठीमागे आहे. मनातलं सांगायला हरकत नाही. अमलेबद्दल खरंच तुम्हाला काही वाटत नव्हतं ?"

भावनावेग एकदम संकोचला. स्नेहाचे tentacles आत ओढले गेले. खिडकीला पाठमोरे मोहनराव बसले होते. चेहऱ्यावर अंधारच होता. " मोहनराव, बोला ना—" येवढ्यात ललिता म्हणाली, " का आता पूर्वीचं काढता ? अमला गेली, संपलं सारं ! आपण संपण्यापूर्वी जवळच राहू या. "

पुन्हा ओठ थरथरतात. डोळे उजळतात. सर्वांगातून स्नेह उफाळतो. मिठी पडते. पण ती सांध्याची खूण कायमच असते.

येते नाट्यसंमेलन गोव्यात

मराठी नाट्य परिषदेतर्फे भरणारे येते ४९ वे नाट्यसंमेलन, दिनांत १०,११ व १२ फेब्रुवारी १९६८ रोजी गोव्यात म्हापसे येथे भरणार आहे. गोमांतकातील विविध नाट्यसंस्थांतर्फे हे नाट्य-संमेलन भरविण्यात येत असून, स्वागताध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कलावंत वसंतराव सावकार ह्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नाट्यसंमेलन यशस्वी व्हावे म्हणून गोव्यातील अनेक संमेलन—कार्यकर्ते कार्यमग्न झाले आहेत. ह्या नाट्यसंमेलनासाठी ज्या व्यक्तींना यावयाचे असेल, त्यांनी दि. १ नोव्हेंबर ६७ पूर्वी, कार्याध्यक्ष, मराठी नाट्य परिषद, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४ ह्यांना लेखी कळवून, तशी कल्पना द्यावी. नाट्यसंमेलनास उपस्थित राहाणाऱ्या प्रतिनिधींचा अंदाज यावा व शक्य तो गैरसोय होऊ नये म्हणून प्रतिनिधींकडून कृपया पूर्वकल्पना मिळावी असे म. ना. परिषदेचे कार्याध्यक्ष भालचंद्र पेंढारकर कळवितात.

-'प त्र-'

—प्रभा गणोरकर

तुला माझं हे पत्र बघून आश्चर्य वाटेल. कदाचित हे नुसतं पाह्यल्यावरोबर तू ते जाळून टाकशील. कारण तुझ्या मनात माझ्याविषयी काठोकाठ तिरस्कार आहे. आपण कधीतरी सर्वस्वानं एक-मेकांची होतो हे तुला एखाद्या दु:स्वप्नासारखं वाटतंय. तो सुमारे वर्षाचा काळ तुला एखाद्या सडलेल्या तुकड्यासारखा वाटतो आहे आणि आयुष्यात फार थोडं जरतारी सुख पण फार मोठा छळ देऊन गेलेला तो काळ जर कापून अलग फेकून देता आला तर तेही तुला हवं आहे. नव्हे. तू तसं केलंच आहेस. ते जुनं सारं तू विसरून गेलायस. प्रयत्नपूर्वक. मनाची असलीनसली ताकद एकवटून साऱ्या अंगभर पसरलेल्या माझ्या आठवणींच्या मुळ्या तू उपटून काढल्या आहेस. हे सारं सारं मला ठाऊक आहे आणि तरी मी आज भरून आलेलं हे असं लिहिते आहे. तू वाचलं नाहीस— वाचणार नाहीस तरी लिहिणार आहे. आणि हे पोस्टात टाकण्यापूर्वी दहादा विचार करणार आहे. कदाचित तुला हे मिळणारच नाही.—कुणीतरी मधेच गडप करील. पण तसं होऊ नये. निदान हे तुझ्या हाती पडावं. तू वाच. न वाच. मी लिहिणार आहे.

मी हे लिहिते आहे ही वेळ संध्याकाळची. दिवे लागण. अभ्रांकित आभाळ निळ्या तेजस्वी संधि-प्रकाशानं उजळून गेलं आहे. आणि रेडियोवर हेमंतचं ते गाणं—जे आपण दोघं एकदा जगलो. जे एकटीनं ऐकताना मी तुडुंब व्याकुळते—माझे डोळे भरून येतात— तुला भेटण्याची अदम्य, अनावर ओढ मला लागते आणि अंगभर धावणाऱ्या कळा आणि गळ्यात दाटलेला हुंदका जिरवताना मला वेदना होतात—ते गाणं—सुन जा दिल की दास्ताँ— लागलेलं आहे. तुला हे खोटं वाटेल कदाचित—पण खोटं नाही. खोटं असतं तर मला असं सारं सरसरून लिहिताच आलं नसतं—पण मला हे गाणं ऐकताना एकदम–एकदम वाटलं–की याक्षणी तू फार फार एकटा आहेस. कदाचित कुणा मित्रांवरोबर आहेस–सिनेमा बघतोयस–टेनिस खेळतो आहेस. रूममध्ये स्वस्थ पडून आहेस—[खर सांगू का–? तू आजारी आहेस आणि रूममध्ये एकटा पडलेला आहेस. दुरून ट्रान्झिस्टरवरचे या गाण्याचे सूर तुला ऐकू येतायत–] आणि तरीसुद्धा मनात फार फार एकटा आहेस. हे गाणं जर तू या क्षणी ऐकत असशील तर तूही फार फार व्याकुळला आहेस– तुझाही जीव कोण्या अनावर ओढीनं उचंबळला आहे. हेही खरं आहे की तुझ्या मनात माझ्याविषयी तिरस्कार आहे–तीव्र धारदार संताप आहे. तू जर माझ्याकडे पाहशील तर माझा दगड होईल इतकी भयानक अलिप्तता आहे–तरीसुद्धा तू जर या क्षणी हे गाणं ऐकत असशील तर उचंबळून आला असशील. याचं तुझं तुला आश्चर्य वाटेल. पण त्यात आश्चर्य करण्याजोगं काही नाही. हे बघ. तुझ्या मनात माझ्याविषयी तिरस्कार आहे–पण हे गाणं तू ज्याक्षणी गायलस–ती रात्र–तो भरारणारा वारा–ती त्या क्षणीची मी–मी आपले हातात हात आणि स्थळकाळ विसरून हिंडणं–याची जी आठवण आहे–तिच्याविषयी तिरस्कार कुठे आहे ? मी वाईट असेन पण तो क्षण तर सुंदर, पवित्र आहे. दोन मनं ज्याक्षणी एकमेकांच्या आत्यंतिक निकट आहेत तो क्षण वाईट कसा असेल–त्या क्षणाची आठवण तिरस्कर-णीय कशी असेल ?—आणि तू व्याकुळ झाला आहेस. म्हणून तुझेही डोळे भरून आले आहेत...

हे सारं तू वाचतो आहेस की नाही, ठाऊक नाही. पण वाचत असशील तर तुला कदाचित आश्चर्य वाटेल. कदाचित आश्चर्य वाटणार नाही. तू तिकडे कोणत्या क्षणी एकटा आहेस–कोणत्या क्षणी तुला आर्तपणे माझी आठवण येते–हे मला इकडे वरोबर कळते कसे ? अरे, वरोबर कळते. याउलट तुला मी कुठल्या क्षणी व्याकुळ आहे–हे कसे कळणार ! याचं कारण सांगू ? थांब, सांगते. हे डोळयांत आलेलं पाणी जरा पुसून घेते.

[अक्षरं दिसेनाशी झाली आहेत, वाकडंतिकडं घाणेरडं लिहिलेलं तुला मनापासून आवडत नाही. आणि तू चटकन नापसंतीची सूक्ष्म रेषा चेहेऱ्यावर नाहीतर तुझ्या त्या पिंगट डोळ्यात आणतोस–मला दिसते ती.] हे बघ. दोन निकट आलेल्या मनांमध्ये संदेश चाललेले असतात–हे तुला ठाऊक आहे. आपली जुनी लाडकी थिअरी आहे ही. आहे म्हणजे, होती एकमेकांची आठवण झाली की आपापल्या ठिकाणावरून मनातल्या मनात चक्रवाकासारखी हाक मारायची की बरोबर दुसरीकडून 'ओ' येत असे. एखादवेळी लटकं भांडणसुद्धा होई. 'काल तुझं मुळी लक्षच नव्हतं. मी किती हाका मारल्या–पण 'ओ' कुठे दिलीस–पण ते खोटं असे. साद मनापासून असली की बरोबर प्रतिसाद येई. तेव्हा दोन्ही मनं अशी सूक्ष्म अन् अदृश्य धाग्यांनी जुळलेली असत. आज ते धागे तुटले आहेत. तुझं माझ्यावरचं प्रेम मरून गेलं आहे. तू आपल्याकडून तुझ्याकडचा धागा तोडून घेतला आहेस. पण, तुला पुन्हा हे खोटं वाटेल. पण, माझ्याकडचा धागा अजून शिल्लक आहे. हातावर घाव घातला की तुटलेला भाग वेगळा होतो, पण एखादा मासाचा सूक्ष्म धागा लोंबत राहतो, तसा एक सूक्ष्म रक्ताळलेला धागा अजून चिकटून थरथरतो आहे. आणि म्हणून तू तिकडे आत्यंतिक व्याकुळ झालास–एखाद्या वेड्या क्षणी माझी अनावर याद केलीस की मला ते तावडतोब कळतं. पटलं का तुला हे ? थांब. जुना पण माझ्या आठवणीत हिऱ्यासारखा जपून ठेवलेला एक क्षण तुला आठवून देते. डिसेंबरची कडाक्याची थंडी होती अन् मी शहरातल्या संगीताच्या कार्यक्रमाला आले होते. तू त्यावेळी माझ्याशी दूरत्वानं वागत होतास. नुसतं बघतसुद्धा नव्हतास. पण तरी मला ठाऊक होतं. तू गाण्याला येशील. तिथं मी तुला पाह्यलं. दुरून खूण केली, पण तू दुर्लक्ष केलंस—सबंध कार्यक्रम ऐकणं मला अशक्य झालं–तुझी दुरावलेली नजर सारखी टोचू लागली. मी भयंकर अस्वस्थ झाले नि अंगावरची शाल सावरत वाट काढीत बाहेर पडले. थंडी मी म्हणत होती. रात्र उताराला लागली होती. पण मला काही सुचलं नाही. कळलं नाही. मी कशीवशी रिक्षा करून परत आले. दुःखाच्या आणि तू दुरावल्याच्या उमाळ्यानं फुटून रडले. आणि तशीच पडून राहिले. जरा वेळानं फाटक वाजलं. मला मनोमन कळलं की तू आलास. आणि तू आत आलास. मी चकित झाले.

"कसा आलास ?" "राहवलं नाही."–किती तरी वेळ तू शांत उभा होतास. न बोलता. "निघालास ?" "हो. चलतेस ? मला तिथवर पोचवून दे"–आणि लॅबर्नमच्या अन् शिरीषाच्या दुतर्फा झाडांच्या रस्त्यावर मी तुला निरोप देऊ लागले. 'निघू मी ?'—' जपून हं–' आणि त्या मावळत्या चंद्रप्रकाशात तू एकदम अनावर झालास. तुझ्या आवेगाच्या एका सशरीर लाटेनं मला सगळी वेढून घेतली आणि तुझ्या त्या अनोळखी वर्षावानं—त्या चंद्रप्रकाशातल्या स्वप्नानं—सुखाच्या चांदण्यानं मी आश्चर्यचकित झाले—भिजून गेले—तुझ्यात विरून गेले—आणखी एक सुन्दर साक्षात्कार मला त्या क्षणी झाला—तू मला जितका हवा होतास—तितकीच तुला मी. त्या आधीच्या तुझ्या कधीकधी जाणवणाऱ्या दुराव्यामुळं मला वाटे, माझं प्रेम मी ह्याच्यावर लादतेय का ? मी फक्त क्षणिक शारीरिक ऊर्मी फक्त ह्याच्यात निर्माण करू शकते—त्या पलीकडे याचं माझं मनाचं नातं नाही ? या विचारानं मी अस्वस्थ होई. मला अपराधी वाटे. पण त्या देदीप्यमान क्षणी कळलं की तू मनाच्या अनावर ओढीनं त्या थंडीत माझ्याकडे धावत आलास —मला मनोमन खात्री होती—ती खरी ठरली होती. मी अस्वस्थ होऊन गाणं—अभोगी कानडा—अर्धा सोडून परतले. त्यानं तूही अस्वस्थ झालास. माझं दुःख तू जाणलंस—तूही दुःखी झालास—याचा मला सुखद प्रत्यय आला होता—[अर्थात हे मी तुला सारं आज सांगते आहे. त्यावेळी तुझा पुरुषी अहंकार दुखावला असता.] माझं दुःख तुला कळणार आहे हे मला आधीच कळलं होतं. असे किती प्रसंग सांगता येतील. —पण जाऊ दे. हे जुनं सारं पुन्हा आठवताना मला असह्य यातना होतात—तुला जरी काही वाटलं नाही तरी मला सोसवत नाही. दुर्दैवाच्या कोणत्या तरी अकल्पित संकेतानं आपण असे अमाप ओढीनं जवळ आलो—जन्मोजन्मी एकत्र राह्यचं ठरवलं आणि तू कसा तुटलास ' मला हे सहन होत नाही रे. आणि म्हणून मी असा अज्ञातवास पत्करलाय. तिथं असते तर मला तुला रोज भेटावंसं वाटलं असतं. आणि तुला ते नको होतं—मीच नको होते. अन् म्हणून मी या परक्या अनोळखी गावात येऊन राहिले आहे··· तुला रात्रंदिवस आठवते आहे—हेमंतचं गाणं—जे तू मला एका रात्री नकळत गाऊन दाखवलंस—ते

ऐकताना नुसती भरून येते आहे. कुठलेही सूर, कुठलंही सौदर्य बघताना जीव नुसना भळभळतो···तो शांत करते आहे.

कित्ती दिवसात मी तुला पाहिलं नाही. गेल्या महिन्यात—इथं येण्यापूर्वी मी ' पाथेरपांचाली 'ला गेले होते. फाटकाजवळ विजूची वाट बघत होते. तेवढ्यात मोहू दिसला. मुद्दाम जवळ आला. हॅलो. कसं काय ?—त्या तुझ्या खास मित्राजवळ बोलताना मला संकोच वाटत होता. तुझा उल्लेख होऊ देणं मी टाळलं—पण त्यानंच तू गावाहून परतल्याचं आणि आज पाथेरपांचालीला आल्याचं सांगितलं. एकदम वाटलं—तुला भेटावं. डोळे भरून बघावं. दोन महिन्यांपूर्वी जिवावरच्या दुखण्यातून उठलास तो कसा दिसतोहेस बघावं—पण आवरलं-–रिक्षातूत उतरणाऱ्या विजूला म्हटलं—चल लवकर—पिक्चर सुरू झालं आहे. आणि ते तीन तास मी अस्वस्थ होते—त्यातली सतार, ते मडक्यातलं मांजराचं पिलू आणि आणि तो पाऊस. अहाहा—मला एकदम वाटलं—तू वसलाहेस तिथं यावं—म्हणावं—" बघ. बघ. पाऊस. चल. पुन्हा या पावसात जाऊ. मागं एकदा दोन तास वाट चुकून धो धो पाऊस अंगावर घेत भटकलो होतो तसे भटकू पुन्हा. " विजूनं पुन्हा पुन्हा विचारलं, " अग, अशी अस्वस्थ काय आहेस ? "—काही नाही. भूक लागल्येय खूप. "—मी थोडक्यात उत्तरले. आणि पिक्चर संपल्यावर तडक घरी आले. मनानं नुसता आकांत मांडला होता. तुला भेटले नाही. तुला पाहृलं सुद्धा नाही. पण हे आता जन्मभर सोसावं लागणार आहे. तुझ्या मनातला तिरस्कार संपणारा नाही. मला ठाऊक आहे. तिरस्कार ही देखील प्रेमाइतकीच, कदाचित प्रेमाहून जास्त तीव्र भावना आहे आणि माझ्याविषयी तुला वाटणारा हा कडूजहर तिरस्कार तुला आतून नुसता पोखरून काढत असेल. अनन्वित छळ केलाय ना मी तुझा–? मी तुला काय दिलं–? सतत दु:ख. वेदना. मनस्ताप. जळणं.–तू मला काय दिलंस ? प्रेम. नुसतं प्रेम. ज्या प्रेमाच्या नुसत्या आठवणींनी मी इथं आनंदानं जगू शकते—तू जवळ आहेसच अशी कल्पना करून माझा दिवस भर्कन उडून जातो. असंच आयुष्यही जाईल. सहज. या माझ्या स्वार्थीपणाबद्दल मात्र तू मला माफ कर. अन् एक कर. मला विसरून जा. पूर्ण. अगदी पूर्ण.

मघाशी आभाळात तुरळक दिसणारे ढग आता चहुबाजूंनी दाटून आले आहेत. आणि मंद्र सप्तकात, संथ लयीत पाऊस झरतो आहे. मी बसले आहे त्या टेबलजवळच्या खिडकीतून समोरचा हिरवा गुल्मोहोर विजेच्या दिव्याच्या प्रकाशात चमकतो आहे. वाऱ्याची बारीक झुळुक आली की गुल्मोहोराची हातांसारखी पसरलेली पानं आंधळी चाळवाचाळव करतात. अंगभर एक हिरवा थरथरता शहारा धावत जातो. खिडक्यांचे पडदे तरारून फुगतात. शिडांसारखे, मला क्षणभर वाटते–खोलीचे जहाज झाले आहे. त्यात बसून तुझ्याकडे यावे, या कल्पनेने माझे मलाच खिन्न हसू येते. कसे माझे मन अजून तुझ्या भेटीसाठी अनावर होते–का व्हावे ? अंगणात मोगरीचे वेल आहेत. फुले उगवली आहेत. वाऱ्याच्या झुळुकीवरोवर एक सुगंधाचा लोट अंगावर झेपावला आहे. माझे मन हा सुगंध पिंजून काढते आणि त्यातले विविध गंध सुटे करते. हा मोगरीचा, हा हिरव्या रानगवताचा–हा ओल्या मातीचा–हा माझ्याच केसांच्या शिकेकाईचा–हा तू वापरणाऱ्या सेंटचा...(हा इथे कसा आला–?) हा माझ्या अंगोवांगी भिनलेल्या तुझ्या श्वासांचा... पाहिलेस ना–? असे चालले आहे. तुझ्या अदृश्य अस्तित्वाचा दरवळ माझ्याभोवती घमघमत असतो. मी अधिकाधिक व्याकुळ होत आहे. साऱ्या अंगभर उधळलेल्या कळा थोपवीत बसले आहे. कानाला शिंपला लावून तासनतास समुद्र ऐकत बसून राहावे तसे इथे खिडकीशी बसून जन्मभर तुझे प्रत्यक्ष डोळ्यांना न दिसणारे पण भासणारे अस्तित्व अनुभवीत जगणार आहे–हो. जन्मभर.

केशवसुतांच्या कल्पसृष्टीचे काही अज्ञात उगम

(फ्रेंच रोमँटिसिझम् आणि केशवसुत)

——प्रा. म. शं. वाबगावकर

केशवसुतांच्या काव्यप्रेरणांचा मूलस्रोत पाश्चिमात्य काव्यांच्या वाचनात आहे हे सत्य आता सर्वमान्य झालेले आहे. रोमॅन्टिक प्रवृत्तींचे स्फुल्लिंग त्यांच्या हृदयात मुळातच होते. त्यांना फक्त चेतविण्याचे कार्य इंग्रजी कवितेच्या वाचनाने केले.[1] त्यांचे इंग्रजी कवितेचे वाचन हैमकोशापलीकडे नव्हते हे म्हणणे कसे बरोबर नाही ते प्रा. रा. श्री. जोग ह्यांनी दाखविले आहेच.[2] पो, लाँगफेलो, इमर्सन इत्यादी अमेरिकन् कवींच्या 'हैमकोशा'त न सापडणाऱ्या कवितांची रूपांतरे केशवसुतांनी केलेली आहेत. "A Thousand and One Gems of English Poetry" ह्या अमेरिकन कवींच्या कवितांचा अंतर्भाव असलेल्या मॅकेच्या संग्रहाचा निर्देश करून या संदर्भात प्रा. जोग पुढे लिहितात, — "तरुलता दत्त हिच्या ('हिचे' पाहिजे–लेखक) A Sbeaf Gleaned in the French Fields हे पुस्तक यांना मिळाले असावे. म्हणूनच दोन फ्रेंच कवितांची रूपांतरे त्यांना करिता आली असतील." "अहा पक्षी हे! चित्र पक्ष यांचे" ह्या केशवसुतांच्या कवितेसंबंधी फ्रेंच कवी थिओफील गोत्ये याच्या एका कवितेच्या तरुलता दत्त कृत इंग्रजी भाषांतराचा हा अनुवाद आहे." अशी माहिती जोगांनी नमूद केली आहे.[3] आणि 'दोन वाजी' ह्या केशवसुतांच्या कवितेच्या संदर्भात "व्हिक्टर ह्यूगो या प्रसिद्ध फ्रेंच कवि आणि कादंबरीकार याच्या Napoleon le petit या कवितेचे ... तरुलता दत्त या वंग कवयित्रीने केलेले इंग्रजी भाषान्तर केशवसुतांस उपलब्ध झाले असावे व त्यावरून दोन वाजी लिहिण्याची कल्पना त्यांना सुचली असावी" असा संभव जोगांनी सुचविला आहे.[4] प्रा. रा. श्री. जोग अथवा केशवसुतांचे दुसरे समर्थ आलोचक प्रा. भ. श्री. पंडित ह्या दोघांनीही तोरुलता दत्त हिचे मूळ पुस्तक पाहिलेले दिसत नाही. कारण प्रा. पंडित ह्यांनी "अहा पक्षी हे! चित्र पक्ष यांचे" ह्या कवितेसंबंधी लिहिले आहे की,[5] — "ही कविता तोरुलता दत्तच्या A sheaf gleaned in French Fields या कवितासंग्रहातील The butterflies as white as snow या कवितेचे भाषांतर आहे." परंतु तोरुच्या मूळ संग्रहात या कवितेचे शीर्षक The butterflies as white as snow असे नसून ते Pantoum असे आहे.[6] मात्र

१. वादसंवाद — प्रा. श्री. के. क्षीरसागर, पा. १२८.

२. केशवसुत (काव्यदर्शन) — प्रा. रा. श्री. जोग, १९४७, पृ. १४.

३. केशवसुत (काव्यदर्शन) — रा. श्री. जोग, १९४७, पृ. २०१

४. तत्रैव — पृ. २०५

५. समग्र केशवसुत — प्रा. भ. श्री. पंडित, १९६४, पृ. ३११, ३१२

६. A Sheaf Gleaned in the French Fields — Torulata Dutt, 1876, p. 95

प्रा. पंडित ह्यांनी ह्यासंबंधी अधिक माहिती पुरविली आहे, की "ही कविता फेब्रुवारी १८९० च्या 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिके'त आली होती. कुलकर्णी, गोखले आणि मंडळीने चालविलेल्या या मासिकाशी गोविंद वासुदेव कानिटकर व हरि नारायण आपटे यांचा लेखक म्हणून घनिष्ठ संबंध होता. या दोघांनाही तोरुलता दत्तची कविता प्रिय होती. केशवसुतांना ती त्यांच्याकडून मिळाली असावी. वरील मासिकात तोरुलतेवर एक लेख असून कानिटकरांनी केलेली तिच्या कवितांची भाषान्तरे प्रसिद्ध झाली आहेत."[७] अलीकडे केशवसुतांचे समकालीन व केशवसुतांप्रमाणेच गुजरातीत नव्या प्रवृत्तीचे काव्य लिहून गुजराती काव्याचे स्वरूप एकदम पालटून टाकणारे प्रसिद्ध गुजराती कवी प्रो. बलवंतराय ठाकोर व केशवसुत यांच्या परस्परसंबंधाची प्रो. ठाकोर यांनी स्वतः लिहून ठेविलेली नवी माहिती प्रकाशात आली आहे.[८] प्रो. ठाकोर लिहितात की, "मराठी सुनीतरचनेला प्रारंभ करणारा कवी जन्मभर खडेंघाशी करणारा विनम्र सर्जक, प्रेरणा आणि कलासूचनेसाठी नव्या गुजराती कवितेचा अभ्यासक होता. १८९०–९५ या काळात मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात तो मला मोठ्या उत्साहाने भेटत असे आणि छंद, यती, प्रास, मुक्तछंद, मायकेल मधुसूदन दत्त, वॉल्ट् व्हिटमन्, वर्स लायवर इत्यादि वेगवेगळे काव्यविषय आणि कवी यांवर नेहमी चर्चा करीत असू."[९] यावरून असे दिसते की तोरु दत्तचे A Sheaf Gleaned in the French Fields हे पुस्तक मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात केशवसुतांनी वाचले असले पाहिजे. केशवसुतांच्या कित्येक कवितांतील कल्पसृष्टीची, विचारानुभवाची व भावानुभवाची मूळ बीजे तोरुलता दत्त हिच्या ह्या संग्रहातील कवितांमध्ये स्पष्टपणाने दाखविता येतात. किंबहुना हेमकोशापेक्षाही तोरूच्या ह्या संग्रहाचा परिणाम केशवसुतांच्या कल्पसृष्टीवर काकणभर अधिक कसा आहे हेच प्रस्तुत स्थली साधार व सविस्तर दाखवावयाचे आहे.

श्री. गोविंदचंद्र दत्त यांची ही तीन मुले. पहिला अब्जचंद्र (१८ ऑक्टोबर १८५१ ते ९ जुलै १८६५) नंतर अरू (१३ सप्टेंबर १८५४ ते २३ जुलै १८७४) आणि मग तोरु (४ मे १८५६ ते ३० ऑगस्ट १८७७). १८६३ मध्ये ही तीनही मुले वापाबरोबर जहाजाने मुंबईला आली होती आणि एक वर्ष राहून कलकत्त्याला परतली होती. पुढे अरू व तोरू ह्या बहिणींचे नोव्हेंबर १८६९ ते नोव्हेंबर १८७३ या काळात वडिलांबरोबर इंग्लंडात वास्तव्य झाले. फ्रान्समध्येही काही महिने त्यांचे शिक्षण झाले. दोघींच्याही प्रवासाच्या दैनंदिन्या आपल्यापाशी आहेत असे गोविंदचंद्र दत्त ह्यांनी 'शीफ'ला जोडलेल्या आपल्या प्रास्ताविक संस्मरणात म्हटले आहे. तोरूने कादंबरी लिहावी व अरूने तिच्यातली चित्रे काढावी अशी संयुक्त निर्मिती करण्याचा दोघींचा संकल्प होता. त्याप्रमाणे एका फ्रेंच स्त्रीच्या दैनंदिनीच्या रूपात तोरूने कादंबरी लिहिलीही. हिंदुस्थानात परतल्यावर तोरूने वडिलांसह एक वर्षपर्यंत संस्कृतचा अभ्यास केला व कलकत्ता रिव्ह्यू व बंगाल मॅगेझीन् या मासिकांमध्ये विष्णुपुराणाच्या अंशाची मूळ संस्कृतावरून तिने इंग्रजीत केलेली The Royal Ascetic and the Hind – From the Vishnu Purana, Book II, Chapter XIII आणि The Legend of Dhruva from Vishnu Purana B. I, C. XI ही काव्यरूपांतरे प्रसिद्ध झाली. Ancient Ballads and Legends of Hindustan तिच्या (तोरूच्या) मृत्यूनंतर १८८२ साली प्रसिद्ध झाले. Mademoiselle Clarisse Bader ह्या फ्रेंच लेखिकेच्या "La Femme dans L' Inde Antique"चा लेखिकेच्या संमतीने तोरू अनुवाद करीत होती. त्यातच ती आजारी झाली व वारली. म्हणून हा अनुवाद अपूर्ण राहिला. मॅडम बाडेरशी झालेला तोरूचा फ्रेंच पत्रव्यवहार 'शीफ'मध्ये तिच्या वडिलांनी आपल्या प्रास्ताविक संस्मरणात छापला आहे.

---

७. समग्र केशवसुत — प्रा. पंडित, १९६४, पृ. ३१२.

८. सत्यकथा, ऑगस्ट १९६७, प. ५८ ते ६२ — केशवसुत आणि प्रो. ठाकोर—प्रकाश महेता, सुरेंद्र गावसकर.

९. तत्रैव—पृ. ६०

' ए शीफ लीन्ड् इन दि फ्रेंच फील्ड्स् 'मध्ये अरूची आरंभीच Dedicace म्हणून Madame Govin C. Dutt वर म्हणजे आपल्या आईवर फ्रेंच कविता दिली आहे व Concluding Sonnet म्हणून शेवटची कविता तिचीच छापली आहे. फ्रेंच रोमँटिक भावकाव्यांच्या ह्या इंग्रजी अनुवादसंग्रहात अरूने अनुवादिलेल्या कविता कमी आहेत. तरी त्यातील Morning Serenade वाचून एडमंड गॉस् आश्चर्याने व आनंदातिरेकाने मुग्ध झाला होता. ह्या संग्रहामागील मुख्य प्रेरणा तोरूचीच होती आणि मुखपृष्ठावर तिचे एकटीचेच नाव आहे. अरूचे नाही. आज इतकी वर्षे झाली तरी एच्. ए. एल्. फिशर यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे इंग्रजी कवींच्या श्रेष्ठ मालिकेत तोरूचे स्थान निरंतर राहील. ह्या काव्यानुवादांवर तोरूने शेवटी टीपा दिल्या आहेत. त्याही माहितीपूर्ण व मार्मिक आणि फ्रेंच न जाणणाऱ्या वाचकाला त्या त्या कवीच्या फ्रेंच साहित्यातील कर्तृत्वाची व स्थानाची अचूक कल्पना देणाऱ्या आहेत.

" अहा पक्षी हे ! चित्र पक्ष यांचे " ह्या केशवसुतांच्या कवितेचे मूळ ' शीफ 'मधील ज्या (Theophile Gautier) थिओफील गोतियच्या पृ. ९५ वरील Pantoum नावाच्या कवितेत आहे, त्याच गोतियच्या ह्या अनुवाद संग्रहात Chinoiserie, The Doves, The Chimney Corner, What the swallows say, Christmas इत्यादी कविता आहेत. ह्यांपैकी केशवसुतांच्या ' दिवाळी 'चे बीज गोतियच्या ' ख्रिस्मस् 'मध्ये आहे. ह्यापैकी Pantoum वरील टीपेत तोरूने म्हटले आहे की "This ir a miserable little piece to cite from so great a poet as Theophil Gautier . . (सदर, पा. २६५) गोतियची What the swallows say ही कविता व तिच्यातील विशेषत: पुढील ओळी आणि केशवसुतांच्या भृंग, पुष्पाप्रत व फुलपाखरू ह्या तीन कवितांतील आशय तुलनेने पाहण्यासारखे आहेत.

All they say I understand,
For the poet is a bird,
Captive, broken-winged and banned,
Struggling still, though oft unheard.

Oh ! For wings, for wings,
for wings !
As sings Ruckert in his song,
To fly with the birds and the
springs'
Whereever the sun shines long.
(पा १७०).

(To fly with the birds. . इ.)

भृंगा ! दंग अहा ! होसी,
गुंगत धाव वनीं घेसी;
तुजमागुनि वाटे यावें,
गोड फुलें चुंबित गावें ! —भृंग.

येतें मनात तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें ! —भृंग.

रम्य धुक्यांची अद्भुत सृष्टि,
तींत उघडिसी अपुली दृष्टि;
मग तो भास्वान् तुजवरि करितो
—तेजाची वृष्टि— पुष्पाप्रत.

(Wherever the sun shines long. . इ.)

निर्वेधपणें इकडेतिकडे
वनश्रींतुनी अहा ! वागडे;
त्याचा हेवा हृदयीं उपजुनि मन होई वेडें !

तिमिरीं आम्ही नित्य रखडणें,
विवंचनांतचि जिणें कंठणें,
पुष्पपतंग स्थिति ही कोठुनि आम्हांला मिळणें ?
—फुलपांखरूं

" An artist, sir, should live in art " असे टेनिसन्‌ने म्हटले आहे. शीफमध्ये Auguste Vacquerie ची Advice to a young poet ही कविता आहे; (पा. १८९)

ती अशी—

Friend, care for art, and care
not for success
It matters not if fools insult
or bless. . . .
...Thou, therefore, heedless of
the senseless crowd.

(स्वप्नीं त्या गुंगुनी मी गद्यग्रथित जग मुळी लोटिलें तुच्छतेला—शब्दांनो मागुते या—केशवसुत)

(मी संध्यासमयीं खुशाल गिरणा तीरावरी वैसुनी कालक्षेप करीन उन्मन असा--दिवाळी—केशवसुत)

and to thy goal steer proud;
..And with thy sweat and
blood achieve thy task,

(बलि दिला ज्वालेस त्या मी किती
तें माते कळले पुरें —दिव्य ठिणगी (केशवसुत)

आणि

मज्जेची निज जो फुले पसरितो आयुष्यमार्गावरी,
आहे अद्‌भुतरम्य का अधिक तें याहून कांही तरी ?
—कवी केशवसुत.

which brings its own reward-no other ask.

(येथे कवी आनंदीरमण यांना केशवसुतांनी धारवाडहून पाठविलेल्या दि. ९ फेब्रुवारी १९०५ च्या पत्रातील पुढील ओळी तुलनेने अवश्य पहाव्या.

··"कविता म्हणजे आकाशाची वीज आहे. ती घरू पाहणारे शेंकडा ९९ आपणांस होरपळून मात्र घेतात. मी अशा ९९ वा पंकींच आहे. स्वानंद हे कवीचें उत्तम पारितोषक होय. of which birngs its own reward)

"...Thou too shalt have at last,
The mob's acclaim,
Longer though later....."

("तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे घातील ती प्राशुनी"
—के. सु. 'दुर्मुखलेला.'

येथे 'तो' म्हणजे कवीच्या मुखातून पुढे निघणार असलेला सुन्दर व सरस वाङ्निष्यंद.) या मूळ कवितेवरील आपल्य टीपेत तोरू म्हणते (पा. २५६)—A. V. is a very pure poet, pure both in his life and his works. Like Wordsworth he thinks that a poet's life must confirm to his works, otherwise those works can never be sincere; and he is right. येथे कवी आनंदीरमण यांना ९ फेब्रुवारी १९०५ रोजी केशवसुतांनी पाठविलेल्या पत्रातील "तुम्हास जगाच्या असेल तर तुमचे हृदय उललेले आहे काय ? फाटले आहे काय म्हणून मी विचारतो···वाणी ही फार मोठी देवता आहे. सामान्य देवतांच्या आराधनास सुद्धा फार जपावे लागते. मग या देवतेच्या आराधनास किती जपावे लागेल बरे !" ही वाक्ये तुलनेने पाहण्यासारखी आहेत.

'शीफ'मधील Gensoul ची My village (पा. ४०) आणि Joachim du bellay ची Sonnet ह्या दोन कविता व केशवसुतांची 'एक खेडे' ह्यातील साम्यही असेही विस्मयकारक आहे. 'माझे खेडे'मधील पुढील ओळी पहा—

Too common is the error sad
My reason that betrayed,
I dreamt of fortune and a name,
And from my country strayed;
By sad experience wiser grown,
With softer heart today,
My own dear village now I seek.

येथे केशवसुतांच्या 'एक खेडे' कवितेतील

"अहा ! अज्ञात स्थळी अशा माते
एक गवतारू खोप रहायाते,
शेतवाडी एक ती खपायाला
लाधती, तर किती सौख्य मन्मनाला ! १०

तरी नसतो मी दरिद्री धनाने
तरी नसतो मी क्षुद्र शिक्षणाने,
तरी होती ती स्वर्गसुखे थोडी
तरी नसती कीर्तिची मला चाडी ! ११

कीर्ति म्हणजे काय हो ? एक शिंग
प्रिय प्राणांही आपुलिया फुंक,
रखाडीला जा मिळूनिया वेगे
शिंगनादही जाईल मरुनि मागे ! १२

कीर्ति म्हणजे कायरे ? एक पीस
शिरी लोकांच्या त्यास चढायास
घरे पडती पक्ष्यास खावयास;
मागुनी ते गळणार—हेहि खास. १३

तरी, स्वपथा जातात सोडुनीया
कुणी तारे तेजस्वि फार व्हाया,
तधी तेजाचा लोळ दिसे साचा,
परी अग्नी तो त्यांचिया चितेचा ! १९ "

ह्या ओळी स्मरतात.

'जो आकिम द् वेले'च्या सानेटातील ओळी अशा—

Happy is he, who like the
Ithacan sage,
Or the brave hero of the
golden fleece,
Having far travelled,
Finds his troubles cease,
Amidst his own, in ripe
experienced age.
When shall I turn again to
life's first page ?

(मज वय विसरूं दे, मुग्ध मधुवाल्यीं उतरूं दे!
—के. सु.
तान्हा वाळचि राहतों तर किती तें
गोड होतें असें !—के. सु.)

From the world's tumult when
obtain release ?
And greet the village, and the
home of Peace
Where sweet affection quell
each passion's rage ?

(लहानग्या त्या गावांत झोपड्यांत
भले कुणवी लोक ते राहतात,
खपोनीया ते सदा सुखें शेतीं,
सरळ अपुला संसार चालवीती.
वीर विजयांच्या दिव्य वर्तमानीं,
कृष्णकदनें पाहतों न त्या स्थानीं,
भास्कराच्या तेजाळपणीं मातें,
डाग काळे दिसते न मुळीं तेथे !
—एक खेडें)

'शीफ'मध्ये Le Comte F. De Gramont चे Poesy नावाचे इटॅलियन पद्धतीचे सुनीत आहे; ते व केशवसुतांचे 'प्रतिभा' नामक सुनीत हीही तुल्य आहेत. केशवसुतांचे प्रतिभा देखील इटॅलियन् पद्धतीचेच आहे. 'पोएसी' मधील पुढील ओळी—

Thou canst not die,
my foolish fears are vain,
O Muse ! O Poesy ! My love
for aye !
...Long as the Spirit makes the
heart its fane,
and homewards Godwards,
lifts our eyes, *thy ray*
Shall light our path. .

(शीफ, पा. २२४)

आणि केशवसुतांच्या "प्रतिभे"तील ती अत्यद्भुत गूढ शक्ती सहसा संचारतां अंतरीं । मुक्तात्मा गगनीं उडे..." व "**स्वान्तीं मण्डल जें हिरण्मय तधी दिव्य प्रभा विस्तरी**" इत्यादी ओळी पहा.

ह्या ग्रॅमाँविषयी टीपांत तोरु लिहिते—

"(He) is one of the best of the modern poets of France. He has written many sonnets in Italian. (ग्रॅमाँला इटालियन् येत होते. त्याचे पोएसी हे इटॅलियन् पद्धतीचे सुनीत आहे व केशवसुतांचे प्रतिभाही इटॅलियन् पद्धतीचे आहे हे वर दाखविलेच.) The poems of Le Comte de Gramont have a *masculine vigour*, a loftiness of rhythm and tone and an austere beauty. (पा. २३५)

ही सर्व लक्षणे केशवसुतांच्या एकूण काव्यालाही लागू पडतात. विशेषत: ग्रॅमाँमधले masculine vigour व केशवसुतांमधले ओज ("नुसते ओजस् परंतु अमर्याद ओजस् महाराष्ट्रीयांपुढे घेऊन उभी राहणारी ही एवढीच कवितावधू" हा रे. टिळकांचा अभिप्राय येथे आठवावा) यांतील साम्य लक्षणीय आहे. पुढे तोरु ग्रॅमाँविषयी म्हणते— "Some of his sonnets have almost the trumpet note of Milton." (पृ. २५५) या संग्रहांत अरु दत्तचे Concluding Sonnet शेवटची कविता म्हणून छापले आहे. त्यातील काही भाग असा—

The flowers look loveliest in their native soil
Amid their kindred branches; *plucked, they fade,*
And lose the Colours Nature on them laid,
Though bound in garlands with assiduous toil......

नेमका हाच आशय ' फुलपांखरू ' ह्या वाळचा व ताई ह्यांच्या संवादस्वरूप कवितेत केशवसुतात आढळतो. वाळचा म्हणतो, " ताई ! मला तें धरून दे ग फुल-पांखरू ! ... मला खेळायला ते धरून दे ! " त्यावर ताई म्हणते, " त्याला खपणार नाही आपल्या खेळाचा चाळा ! त्याचा होइल चोळामोळा ! ... मजा पाह्यला रे, त्या पांखरामागून वेलींमधून तुला नेतें ! ! मग झालें ना ?— " सौंदर्यवस्तूचे दर्शन व आस्वाद दुरूनच घ्यावयाचा असतो हा भाव.

' शीफ 'मध्ये व्हिक्टर ह्यूगोची केशवसुतांच्या ' दोन वाजी 'च्या निर्मितीला कारणीभूत अशी Napoleon Le Petit ही कविता पा. १०२ वर आहे, शिवाय इतरहि कविता आहेत. त्यांपैकी Soleil Couchant मधील पुढील ओळी

.... And
The face of the waters, the brow of the mountains,
Deep scarred but not shrivelled, and the woods tufted green,
Their youth shall renew; and the rocks to the fountains
Shall still yield what these yield to the ocean their queen,
But I, day after day, bending lower my head,
Pass, chilled in the sunlight, and soon, soon, shall have cast,
In the height of the banquet, my lot with the dead,

पुष्पाप्रत कवितेत केशवसुतांनी **' चिरतरुणारे !** चिर-हचिरा रे! तुजसन्निध तो वास वरा रे ! तुजमजमध्ये परी केवढी—आहे दंद दरा रे !' हे उद्गार काढले आहेत. वरच्या कवितेतील Their youth shall renew ही कल्पना अथवा Flowers, flowers last always हे ह्यूगोनेच इतरत्र काढलेले उद्गार या संदर्भात ध्यानी घ्यावे. ' असे सुंदरता अढळ जरी कोठे ! तर करी ती सृष्टींत मात्र वास ' म्हणजे अढळ सौंदर्य सृष्टीतच असते. अमरता, पूर्णता निसर्गात असते; माणसांचे जग मात्र मर्त्य व अपूर्ण आहे हा विचार केशवसुतांनी अनेक ठिकाणी मांडला आहे. वरच्या कवितेत मी लवकरच मृतांमध्ये जमा होईन असे ह्यूगो म्हणतो तर वर तुल्य स्थळ म्हणून उद्धृत केलेल्या ' पुष्पाप्रत 'मध्ये पुष्पाला चिरतरुण संबोधल्यानंतर तुलनेने आजच आपण पिशाच्चवत् झालो आहोत (' पिशाच माझे भटकत आहे ') असे केशवसुत सांगतात. या संग्रहात Patria नावाची ह्यूगोची कविता आहे. बीथोव्हन्च्या संगीतावर बसवलेले हे Song म्हणजे गीत आहे असे टीपेत तोरु लिहिते. केशवसुतांमध्येहि गीतरचनेचा प्रयोग ' प्रीति ' कवितेत (' प्रीति मिळेल का हो बाजारी ? ' इ.) आणि साभिनय म्हणावयाच्या मुक्तगीतसदृश संवादात्मक रचनेचा प्रयोग वाळचा व ताई यांच्या संवादस्वरूप पूर्वोल्लिखित ' फुलपांखरू ' कवितेत व साभिनय मुक्तगीतसदृश रचनाप्रयोग (' टिप् फुले टिप् ! माझे गडे ग ! टिप् फुले टिप् ! पहा फुलांची पखरण झिप् ! ' इ. ह्या) ' फुलांची पखरण ' कवितेत दिसतो. त्याचे मूळ ह्यूगोच्या गीतरचनेत असावे. आणि व्हिक्टर ह्यूगो हा फ्रेंच कवितेत रचनाविषयक नवप्रयोग करणारा बंडखोर कवी होता ही गोष्ट या संदर्भात ध्यानात घेतली पाहिजे. तोरुनेही आपल्या टीपांत ह्यूगोच्या काव्य-क्षेत्रातील बंडखोरीचा आवर्जून उल्लेख केला आहे !

विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की केशवसुतांनी १३ नोव्हेंबर १८९२ रोजी लिहिलेल्या मराठीतील पहिल्यावहिल्या तंत्रशुद्ध सुनीताचे म्हणजे ' मयूरासन आणि ताजमहाल 'चे मूळही ' शीफ 'मध्ये आहे. प्रो. बलवंतराय ठाकोर यांनी आपल्या स्वतःच्या " गुजराती सुनीतावरूनच मराठीतील पहिले सुनीत लिहिलें गेले " असे म्हटले आहे. (भणकार, १९५१, पृ. १९४–९५) " केशवसुतांच्या सुनीतरचनेला आपली प्रेरणा आहे, " असा ठाकोरांचा दावा आहे आणि तो त्यांनी आपल्या

लेखनातून त्रिवार मांडला आहे.[१०] हे सांगून श्री. प्रकाश मेहता व सुरेंद्र गावसकर पुढे आपले मत असे नमूद करतात की, " बलवंतराय ठाकोर यांच्या काव्य-रचनेचा प्रभाव केशवसुतांच्या कवितेवर पडला आहे काय ? दोघांच्या कवितांचे विहंगमावलोकन केले तर उत्तर नकारार्थी मिळते…त्यांच्या कवितेचा ठसा केशवसुतांच्या कवितेवर आहे असा काव्यांतर्गत पुरावा उपलब्ध नाही. "[११] 'शीफ 'मध्ये Josephin Soulary चे Sonnet या शीर्षकाखाली पुढील सुनीत आहे (पा. १९५)—

For days, weeks, months and long wearisome years,
The sculptor has used his art on the clay,
Touched and re-touched the shape—toil thrown away !
Heavy, stiff, awkward, still, still it appears.
A young apprentice who a vexed mien fears,
Laughing in secret, dares at last to say,
" A toy's my forte,—oh, let me try, sir, pray,
I bave a knack. '—Content the master hears.
The boy takes up the tool, O strange surprise !
Sudden the figure in the sculptor's view
Takes lines of beauty; gleams the glorious eyes,
And heaves the breast ! " It lives now sir; adieu !
My name is Love,—remember me a little,
And guard your treasure, for though fair 'tis brittle. '

---

१० सत्यकथा, ऑगस्ट १९६७, पा. ५९.

११ तत्रैव, पा. ६०, ६१.

कितीही प्रयत्न केला तरी मनाजोगते शिल्प शिल्प-काराला घडविता आले नाही. एक शिकाऊ मुला-सारखा दिसणारा शिल्पकार आला अन् त्याने आधीच्या शिल्पकाराच्या मनात होते तसे सजीव सुंदर शिल्प तत्काळ निर्मून दाखविले. जाताना तो म्हणाला " माझे नाव 'प्रेम' आहे, माझे स्मरण ठेवा. "

'मयूरासन आणि ताजमहाल' ह्या केशव-सुतांच्या कवितेत शहाजहानने स्वार्थापोटी मयूरासन घडविले ते चोरांनी पळविले. पण प्रेमभावनेच्या पोटी त्याने निर्मिलेले ताजमहालाचे शिल्प अजून आहे; म्हणून " काडी एकच गंधयुक्त, नमुनी प्रीतीस तू लाव ती। तीचा वास सदा जगी पसरुनी देईल तो तुप्तिला ! " हा आशय आहे. प्रेम समूर्त होऊन आले व त्याने त्या शिल्पकाराला करता येत नसलेले शिल्प तत्काळ घडवून दिले. ह्या दोन्ही कवितांच्या बीजकोपातील सूक्ष्म साम्य विचारांती निश्चित पटते. केशवसुतांचे आद्य सुनीत ह्या सलरीच्या सुनीताचे भाषांतर नव्हे. पण 'प्रेरणा' ह्या सुनीतापुरती तरी बलवंतराय ठाकोरांमध्ये नसून सलरीत आहे. सलरीचे हे सुनीत मिल्टॉनिक् आहे आणि केशवसुतांचे हे आद्य सुनीत मिल्टॉनिक्च आहे. किंबहुना हे पहिले तंत्र–शुद्ध सुनीत लिहिले जाण्यापूर्वी सुनीतनिर्मितीच्या दिशेने केशवसुतांनी बरेच दिवस प्रयत्न चालविले होते हे दाखविणाऱ्या सुनीतसदृश दहाबारा कविता केशव-सुतांच्या संग्रहात आहेत. पण शेक्सपियरच्या पद्धतीचा आदर्श पुढे ठेवल्याने तंत्रशुद्ध सुनीत त्यांना जमेना. " शेक्सपियरच्या सुनीताचा छंद सोडून मिल्टनी सुनीताची रचना स्वीकारल्याने 'मयूरासन आणि ताजमहाल' हे पहिले तंत्रशुद्ध सुनीत त्यांना लिहिता आले. " (पहा–हरपले श्रेय—प्रा. रा. श्री. जोग, पा. ७२) किंबहुना त्यांच्या नऊ तंत्रशुद्ध सुनीतांमध्ये मिल्टॉनिक् ऊर्फ पेट्रार्कन् पद्धतीची सुनीतेच संख्येने जास्त आहेत. सलरीविषयी टीपेत तोरू म्हणते की सलरीला फ्रान्सचा पेट्रार्क असे अन्वर्थकपणे म्हणतात. J. Soulary's sonnets are among the best in the language. They are elaborated with great care. Each is a pastoral picture or a little drama of exquisite

beauty. He has been called and deservedly the Petrarch of France. (पा. २३५) पुढे पृ. २७८ वर ह्याच सलरीबद्दल टीपांत तोरू M. Leon De Wailly ने मुळात लिहिलेल्या व तोरूने Bengal Magazine मध्ये अनुवादिलेल्या आपल्या लेखातील अवतरण देऊन त्यात म्हणते—" He is not abundant. Praised be the heavens, M. Soulary's verses do not flow as from a mountain. That which flows, flows as from a fountain is only clear water, whereas his verses are impregnated with thought. (cf—पहा. केशवसुत आनंदीरमणांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात—"पुष्कळ अशुद्ध पद्ये लिहिण्यापेक्षा मोजकीच शुद्ध पद्यें लिहिणे उत्तम ".) There is not a word which has not its value,—and which has not been carefully and curiously searched until happily it has almost always been found." या ठिकाणी शब्दांमधल्या शक्तिगर्भतेची केशवसुतांच्या ठिकाणी असणारी जाणीव व शब्दांच्या अचूक निवडीबाबतचा त्यांचा कटाक्ष वातचक्र, विद्यार्थ्यांप्रत, शब्दांनो ! मागुते या, इत्यादी त्यांच्या कवितांमध्ये कसा दिसतो हे अभ्यासकाला सहजच जाणवते. शब्दांमधले अंगभूत तेज माणसाने त्यांचा अयोग्य वापर करून मळविले आहे. (नरें मळविले अहह ! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत ! —वातचक्र अथवा

" स्नायूमध्ये पुष्कळ आहे शक्ति,
नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती;
परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी ! '
—विद्यार्थ्यां प्रत इ.)

हैमकोशापलीकडे इंग्रजीचे केशवसुतांचे वाचन अथवा ज्ञान नव्हते हे म्हणणे प्रो. ठाकोर यांच्या लेखनावरून आता आपोआपच खंडित झाले आहे. परंतु केशवसुतांच्या काव्यप्रेरणेची उगमस्थले हैमकोशाइतकीच किंवहुना त्यांहून काकणभर अधिकच ह्या A sheaf gleaned in the French fields मध्ये आढळतात. फ्रेंच रोमँटिक काव्यांचा हा संग्रह व केशवसुतांची कविता यांच्यात सहजगत्या ठळक ठळक साम्यस्थळे जी जाणवली ती येथे नमूद केली आहेत. पण ह्या संग्रहातील एकूण एक कविता व केशवसुतांची समग्र कविता ह्यांचे वारकाईने तौलनिक अध्ययन केले तर वहुधा हे स्पष्ट होईल की इंग्रजी काव्यातील रोमँटिसिझम्ने केशवसुतांची कल्पसृष्टी जितकी संस्कारित झाली आहे त्यापेक्षाही फ्रेंच काव्यातील रोमँटिसिझम्चा संस्कार (अर्थात् इंग्रजी अनुवादाच्या द्वारा) तिच्यावर काहीसा अधिकच आहे. व्हिक्टर ह्यूगोविषयी एका इंग्रज कवीने म्हटल्याप्रमाणे केशवसुतांविषयीही मराठी कवी हेच म्हणतील की—

"Thou art chief of us, and lord;
Thy song is as a sword
Keen-edged and scented in the blade from flowers.
Thou art lord and king; but we
Lift younger eyes and see
Less of high hopes, less light on wandering hours;
Hours that have borne men down so long,
Seen the right fail, and watched uplift the wrong"

फ्रेंच रोमँटिसिझम्ची स्वरूपलक्षणे व त्यात अंतर्भूत होणाऱ्या प्रवृत्ती यांची व्यंजनाही ह्या ओळींतून आपोआपच प्रकट होऊन गेली आहे !

शबरीची बोरें

३ जानेवारी १८९८

प्रिय—

आपल्या पत्रात काही विशेष महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. ह्या एका लहानशा पत्रात त्यांना सविस्तर उत्तर देता येणे शक्य नाही. तथापि त्यांचे थोडेसे विवेचन मी येथे करतो.

कोणी मोठा ऋषी अथवा मुनी असला अथवा प्रत्यक्ष परमेश्वर झाला तरी समाजावर कोणताही निर्बंध त्याला जबरीने लादता येणे शक्य नाही. परिस्थितीच्या निकडीमुळे स्वसंरक्षणार्थ समाज काही चाली निर्माण करतो. या चालींचे टाचण तयार करण्याचे काम ऋषी करतात. कित्येक वेळी तात्पुरत्या जरूरीकरिता एखादा मनुष्य ज्याप्रमाणे एखादी वाईट गोष्टही करतो त्याचप्रमाणे समाजही पुष्कळ वेळा एखाद्या आगंतुक जरूरीसाठी एखाद्या गोष्टीला अनुसरतो. या आगंतुक चालीने त्या वेळेपुरते त्याचे संरक्षण केले असले तरी तीच पुढे अधिक काळ चालू राहिली तर ती समाजाच्या नाशाला कारणीभूत होते.

उदाहरणार्थ, विधवांनी पुनर्विवाह करू नये असा निर्बंध आपल्या समाजात आहे. ऋषींनी अथवा दुसऱ्या कोणी दुष्ट मनुष्यांनी हा कायदा समाजावर लादला असे समजण्याचे कारण नाही. स्त्रियांना आपल्या ताब्यात पूर्णपणे ठेवावे अशी पुरुषांची इच्छा होती; तथापि त्या काळच्या समाजाच्या मदतीशिवाय कोणत्याही प्रकारचे निर्बंध अस्तित्वात आणणे त्यास शक्य नव्हते. तशा कायद्यांची जरूर समाजाला भासत असल्याशिवाय त्याने तशा कायद्यांस आपली संमती कधीच दिली नसती. विधवाविवाहासंबंधी दोन मुद्दे लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

१. हलक्या वर्गातील समाजात विधवांचे विवाह रूढ आहेत.

२. उच्च वर्गीयांत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या अधिक आहे.

आता प्रत्येक मुलीचे लग्न झालेच पाहिजे असे म्हटले तर प्रत्येक मुलीला नवरा मिळणे कठिण होऊन बसेल; मग अशा स्थितीत एका मुलीला दोन तीन नवरे कोठून मिळतील? याकरिता स्त्री आणि पुरुष या दोन पक्षांपैकी एका पक्षाची तंगडमोड करून ठेवणे समाजाला भाग पडले. एकदा लग्न झाल्यानंतर स्त्रीने पुन्हा लग्न करू नये असा निर्बंध समाजाने घातला. विधवांची लग्ने पुन्हा होऊ लागली तर समाजात कुमारिकांची संख्या अधिक वाढेल. उलटपक्षी ज्या समाजात पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा अधिक आहे. तेथे पुनर्विवाहाची चाल रूढ आहे. कारण, वर सांगितलेला आक्षेप त्या समाजाच्या स्थितीत उत्पन्न होण्यासारखा नाही. पाश्चात्य देशांतही पुष्कळ स्त्रिया नवरा न मिळाल्यामुळे जन्मभर कुमारिका राहात आहेत.

जातिभेद आणि इतर सामाजिक निर्बंध यांचीही स्थिती अशीच आहे.

याकरिता कोणतीही सामाजिक रीत बदलायची म्हटले तर तसे करण्याची आवश्यकता कोठे आहे हे प्रथम निश्चित केले पाहिजे. तेथे मुळातच बदल केला म्हणजे ती चाल निरुपयोगी होऊन आपोआपच मरून जाईल. समाजाला नुसत्या शिव्या देत बसल्याने अथवा त्याची नुसती स्तुती केल्याने कोणताही कार्यभाग होणार नाही.

आता सामाजिक निर्बंध घातलेले असतात ते सामान्य समाजाच्या बऱ्यासाठी असतात की काय आणि

समाज निर्माण होतो तो सामान्य मनुष्यांच्या बऱ्यासाठी होतो की काय असे प्रश्न उपस्थित होतात. काही लोक या प्रश्नाला होय असे उत्तर देतात आणि दुसऱ्या कित्येकांचे उत्तर नास्तिपक्षी असते. समाजातील कित्येक लोकांच्या हातात इतरांहून अधिक सत्ता असते आणि तिच्या जोरावर इतरांना ते आपल्या अमलाखाली आणतात व युक्तीने, सामर्थ्याने किंवा चलाखीने आपले हेतू हे लोक सिद्धीस नेत असतात असेही काहींचे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे असेल तर अज्ञ जनांस स्वातंत्र्य देऊ नये आणि तसे करणे धोक्याचे आहे या मताची वाट काय ? तसेच, स्वातंत्र्य म्हणजे तरी काय ?

मला किंवा तुम्हाला कोणाचेही घर लुटण्याची परवानगी मिळाली तर आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असे खास म्हणता येणार नाही. दुसऱ्या कोणासही उपद्रव न करता आपल्या शरीराचा, बुद्धीचा अथवा पैशाचा आपल्या मनाप्रमाणे व्यय करता यावा हा आपल्या सर्वांचा स्वाभाविक आणि जन्मसिद्ध हक्क आहे आणि समाजाच्या सर्व घटकांस शिक्षण, ज्ञान अथवा पैसा ही मिळविण्याची संधी सारख्या प्रमाणाने मिळणे अवश्य आहे. आता कित्येक लोक असे म्हणतात की गरीब आणि अज्ञ लोकांस अशी संधी मिळाली आणि ती पिढ्यानुपिढ्या मिळत गेली तर ते लोक बिघडून उन्मत्त होतील असेही कित्येकांचे मत आहे. हे मत ते प्रतिपादित असतात त्या वेळी एकंदर समाजाच्या कल्याणाचा विचार ते करीत असतात की केवळ स्वार्थाने अंध होऊन बोलत असतात हे कोणी सांगावे ? " खालच्या वर्गाला शिक्षण मिळाले तर आमची सेवा कोण करील ? " ही भाषा मी इंग्लंडात सुद्धा ऐकली आहे.

मूठभर श्रीमंत लोकांची चैन चालावी म्हणून कोटयवधी स्त्रीपुरुषांनी अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या गर्तेत लोळत पडावे हे युक्त आहे काय ? त्यांना शिक्षण मिळाले तर समाज उलथापालथा होईल हे म्हणणे किती विचित्र दिसते !

समाज म्हणजे काय ?

समाज म्हणजे तुम्ही एकच व्यक्ती की बाकीचे लक्षावधी लोक ? केवळ वरचा वर्ग एवढाच समाज म्हटला तर तेवढ्या थोड्यांशा वरच्या लोकांस इतरांच्या डोक्यावर सदोदित बसून राहण्याचा ताम्रपट परमेश्वराने दिला आहे काय ? आपण समाजाचे नेते आहोत हा पोकळ डौल ते कोणत्या आधारावर मिळवितात ? त्यांस सर्वसाक्षित्व प्राप्त झाले आहे काय ?

' उद्धरेदात्मनात्मानं ' हे वचन सर्व ठिकाणी सारखेच लागू पडते. आपल्या मुक्तीचा मार्ग प्रत्येकाने स्वत:च शोधला पाहिजे. स्वत: कायिक मानसिक आणि आत्मिक मुक्ती मिळवून इतरांस तसे करण्यात मदत करणे हे प्रत्येक मनुष्याचे उच्चतम कर्तव्य होय. अशा स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात जे जे सामाजिक निर्बंध येत असतील ते समाजाला घातक असल्यामुळे त्यांचे निर्मूलन झाले पाहिजे; आणि जे निर्बंध मुक्तीच्या मार्गाकडे नेणारे असतील त्यांचे संवर्धन झाले पाहिजे.

इच्छाशक्तीबद्दल आपण विचारलेला प्रश्न फार मनोवेधक आहे. हा विषय समजावून घेणे फार अगत्याचे आहे. वासनाक्षय हे सर्व धर्मांचे आदितत्त्व आहे. आणि वासनाक्षय म्हटला की त्याबरोबर इच्छाशक्तीचाही क्षय होणारच. वासना आणि इच्छा ही एकाच अर्थाची दोन नावे आहेत. हे जग का निर्माण झाले ? अथवा परोक्ष इच्छाशक्ती प्रत्यक्षत्वास का आली ? दुष्ट इच्छा नाहीशी करून सदिच्छेची वाढ करावी असे कित्येक धर्म म्हणतात. त्याचप्रमाणे, येथे इच्छा भागवून ठेवली तर परलोकी सुख होईल असेही कित्येक म्हणतात. पण असल्या मतांनी शहाण्यांचे समाधान अर्थातच होणार नाही. उलटपक्षी वासना ही सर्व दु:खांचे मूळ असल्यामुळे तिचे निर्मूलन करणेच युक्त आहे असे बौद्ध मत आहे. पण या मताचा त्यांनी शेवटी इतका अतिरेक केला की वासनाक्षयाबरोबर ते आत्मक्षयही स्वीकारून बसले. एखाद्या मनुष्याच्या मानेवर डास बसला तर त्याला मारण्याकरता त्या मनुष्याची मान कापून काढण्याचीच ही युक्ती आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की ज्या वस्तूला इच्छाशक्ती असे नाव आपण देतो ते उच्चतर वस्तूचे एक हलक्या प्रतीचे स्वरूप आहे. वासनाक्षय म्हणजे ह्या हलक्या स्वरूपाच्या इच्छाशक्तीचा क्षय होऊन त्या

ठिकाणी ती उच्चतर वस्तू प्रविष्ट होणे. ही स्थिती मनाने आणि बुद्धीने आणता येत नाही. ती त्या दोहों-पलीकडची स्थिती आहे.

आपण कलेच्या स्वरूपासंबंधीही प्रश्न विचारला आहे.

अत्यंत बारीकसारीक तपशिलातही प्रकृतीचे अनुकरण करणे हा ग्रीक कलेचा विशेष होय. त्याच-प्रमाणे अत्युच्च साध्य स्पष्ट करणे हा हिंदी कलेचा विशेष होय. एखादा ग्रीक चितारी मांसाच्या तुकड्याचे चित्र काढूं लागला तर ते इतके अस्सलाबरहुकूम काढील की त्यामुळे एखादा कुत्रासुद्धा फसून जाऊन त्यास ढास मारावयास लागेल. अशा रीतीने केवळ प्रकृतीचे अनुकरण करणे यात विशेष ते काय ? त्या कुत्र्यापुढे खऱ्या मांसाचा तुकडाच का ठेवू नये ?

उलटपक्षी, आपले काल्पनिक साध्य–प्रेक्षकांपुढे ठेवायचे असा हिंदु चितान्याचा कल असतो. जे आपल्या इंद्रियांच्या आटोक्यात येऊ शकत नाही अशा आपल्या ध्येयाचे अथवा साध्याचे प्रत्यक्ष चित्र काढण्याच्या नादी पडून हिंदू चित्रकार अखेरीस विचित्र आणि ओबड-धोबड मूर्ती रंगवू लागेल. खऱ्या कलेचे साम्य दाखवा-वयाचे म्हटले तर ते कमळाशी दाखविता येईल. कमळ जमिनीतून वर येते. जमिनीतूनच त्याचे पोपण होते. तथापि जमिनीपासून वर अधांत्री ते राहते. अशीच कलेचीही गोष्ट असली पाहिजे. प्रकृतीशी असलेला तिचा संबंध तुटू नये; तिचा प्रकृतीशी संबंध तुटला तर तिचे अधःपतन होते. ह्यासाठी प्रकृतीशी तिचा संबंध अवश्य असावा. पण असा संबंध असतानाही प्रकृतीपासून ती उच्च ठिकाणी असावी.

सौंदर्याचे प्रत्यक्ष दर्शन जी करविते ती कला. प्रत्येक गोष्टीत कला असली पाहिजे.

बांधकामाची कला आणि इमारत यांतील फरक हा आहे की बांधकाम काल्पनिक साध्य दाखवीत असते आणि इमारत ही केवळ काटकसरीच्या दृष्टीने बांध-लेले बांधकाम होय. कोणत्याही जड वस्तूला जी वास्तविक किंमत असते ती एकाच बाबीवर अवलंबून असते. कोणतेही साध्य अथवा कोणतीही कल्पना चित्तात भरुन देण्याचे सामर्थ्य ज्या मानाने जड वस्तूत असेल त्या मानाने तिची किंमत किंवा तिचे महत्त्व असते.

भाषेसंबंधी तुम्ही विचारलेल्या प्रश्नाला माझे उत्तर असे. साधेपणा हे भाषेचे रहस्य होय. माझे सद्गुरू जी भाषा वापरीत ती खरोखरच नमुनेदार होती. माझ्या दृष्टीने ती अत्युच्च प्रतीची भाषा होय. सामान्य लोक जी भाषा बोलत तीच ते वापरीत. तथापि तीत उच्च प्रतीचे अर्थसौष्ठव असे. जो विचार लोकांच्या मनात ठसवावा अशी त्यांची इच्छा असे तो विचार त्यांची भाषा उत्कृष्ट रीतीने व्यक्त करी.

आपला

[काही सामाजिक प्रश्न, थोडी कलाविषयक आणि भाषाविषयक मते ह्यांची चर्चा असलेले हे एक पत्र शबरीला अचानकपणे गवसले. ' युगवाणी 'च्या वाचकांनीही त्याचा आस्वाद घ्यावा ह्या बुद्धीने ते वर उद्धृत केले आहे.

—शबरी]

आजच्या नाट्यवाङ्मयातील काही प्रमुख प्रवाह

—प्रा. म. बा. कुंडले

सर्वप्रथम आजचे नाट्यवाङ्मय म्हणजे कोणते हे स्पष्ट करावे लागेल. एका अर्थाने आज रंगभूमीवर गाजत असलेली नाटके असे म्हणता येईल. परंतु यांतील काही नाटके ही जुन्या कालखंडातीलही आहेत. 'स्वयंवर', 'एकच प्याला', 'लग्नाची बेडी' याही नाटकांचे प्रयोग होत आहेतच. या नाटकांचा अर्थातच मी विचार करणार नाही. म्हणून आजचे नाट्यवाङ्मय असे म्हणताना माझ्या डोळ्यांसमोर साधारण गेल्या १०–१२ वर्षांत निर्माण झालेली व आजही निर्माण होत असलेली नाटके आहेत. यालाच आपल्याला नाट्यनिकेतनच्या कालखंडानंतरचा कालखंड असे म्हणता येईल. या कालखंडातील प्रमुख नाटककारांचा निर्देश केला तर माझ्या विवेचनाची व्याप्ती व मर्यादा अधिक चांगल्या तऱ्हेने स्पष्ट होऊ शकतील. हे नाटककार म्हणजे पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, वि. वा. शिरवाडकर, बाळ कोल्हटकर, मधुसूदन कालेलकर, विजय तेंडुलकर, शं. गो. साठे, सरिता पदकी, तारा वनारसे, रत्नाकर मतकरी, पुरुषोत्तम दारव्हेकर, मधुकर आष्टीकर, विद्याधर गोखले इत्यादी! या नाटककारांचा म्हणजेच त्यांनी निर्माण केलेल्या नाटकांचा मी प्रामुख्याने विचार करणार आहे. वरील यादीतून काही नावे अनवधानाने गळलीही असतील. परंतु त्यांच्या लक्षणीय नाट्यकृतींचा उल्लेख विवेचनाच्या ओघात येईलच. दुसरे असे, कोणत्याही नाटककाराचा वा कोणत्याही नाट्यकृतीचा सविस्तर व सर्वांगीण परामर्ष मी घेणार नाही, घेणे शक्यही नाही. हे प्रमुख नाटककार व त्यांनी निर्माण केलेले नाट्यवाङ्मय यांतून डोकावणारे काही प्रमुख प्रवाह व त्यांची ठळक वैशिष्ट्ये यांचे दर्शन घडविणे एवढेच माझ्या लेखाचे उद्दिष्ट आहे.

कौटुंबिक नाटके

आजच्या नाट्यवाङ्मयातील एक प्रवाह आहे कौटुंबिक नाटकांचा. या प्रवाहाचे प्रमुख जनक म्हणा किंवा पुरस्कर्ते म्हणा आहेत—श्री. बाळ कोल्हटकर व श्री. मधुसूदन कालेलकर. यांची प्रमुख नाटके— 'वेगळं व्हायचंय मला', 'वाहतो ही दुर्वांची जुडी' ही कोल्हटकरांची व 'दिल्या घरी तू सुखी रहा', 'दिवा जळू दे सारी रात', 'अपराध मीच केला' ही कालेलकरांची. कालेलकरांनी नाट्यलेखनव्यवसायात कोल्हटकरांच्या मानाने बराच उशीरा प्रवेश केला. परंतु त्यांनी आपले बस्तान चांगलेच बसविले असून त्यांची नाटके फारच लोकप्रिय ठरत आहेत. या प्रवाहाची वैशिष्ट्ये काय हे आपण पाहू. ही नाटके संपूर्णपणे कौटुंबिक व घरगुती स्वरूपाची आहेत. त्यांतील कथानक, समस्या, वातावरण—सर्व काही घरगुती व कौटुंबिक जिव्हाळ्याने ओथंबलेले! तुमच्या-आमच्या संसाराचेच प्रतिबिंब त्यांत आपल्याला पहायला मिळते. हृदयस्पर्शी व भावनोत्कट विशेषतः करुणोत्कट प्रसंगांचा भरणा! समाजातील काही विकृत व हास्यास्पद पद्धतींचे विडंबन! कौटुंबिक निष्ठांचा, नैतिक मूल्यांचा, परंपरेचा, संस्कृतीचा प्रभावी पुरस्कार! यांच्या जोडीलाच प्रासादिक भाषा,

चटपटीत व खमंग संवाद, टाळ्या घेणारी सुभाषित-वजा वाक्ये व विनोद ! या सर्व गुणविशेषांमुळे ही नाटके विलक्षण लोकप्रिय होत आहेत. सर्वसामान्य माणसांवर विशेषतः स्त्रियांवर या नाटकांचा विलक्षण परिणाम होताना दिसतो. करुण प्रसंगांच्या वेळी अर्धा अधिक प्रेक्षकवर्ग रुमालाने डोळे पुसत असतो. विनोदी वाक्यांना सगळे प्रेक्षक हसून थिएटर डोक्यावर घेतात, तर सुभाषितवजा वाक्यांना टाळ्यांनी प्रतिसाद देतात. सर्वसामान्य प्रेक्षकांना ही नाटके विलक्षण प्रत्ययकारी वाटतात, आवडतात. म्हणूनच या नाटकांचे शतक-महोत्सवीच नव्हे, त्रिशतकमहोत्सवी प्रयोग होत आहेत.

चिकित्सक दृष्टीने विचार केल्यास या नाटकां-मध्ये नवे असे काहीच नाही. जे आहे ते नित्यपरिचित. रचनेची सफाई असली तरी मानवी मनाचे अगर जीवनाचे नवे दर्शन त्यात नाही, नाटच असले तरी ते स्थूल, भडक, अतिरंजित. या लेखकांनी प्रेक्षकांची नाडी ओळखून--ते कोठे हसतील, कशाला रडतील हे सर्व लक्षात घेऊन तशा प्रसंगांची नाटकात बुद्धिपुरस्सर योजना केली आहे. हास्य व करुण या रसांचा आलटून पालटून मुक्त वापर ! अश्रू व हास्य ही यांची प्रमुख शस्त्रे, प्रेक्षकांना रड-विण्याच्या सामर्थ्यामुळे या नाटकांना 'अश्रुनाटय' म्हणावे असे मला वाटते. हमखास यशस्वी करण्याचा एक साचा, एक तंत्र आत्मसात केले आहे व थोडाफार तपशिलात वदल करून प्रत्येक नाटकात ते या तंत्राचा अवलंब करीत आहेत. कालेलकरांच्या नाटकातील मामा ('दिल्या घरी तू सुखी रहा), गुप्ते काका (दिवा जळू दे सारी रात), 'गोळे मास्तर' (अपराध मीच केला) या पात्रांचा तोंडावळा, त्यांचे विचार व विचार-प्रगटीकरणपद्धती सारखीच ! एवढेच नव्हे तर प्रत्येक नाटकात अशा तऱ्हेचे हे पात्र अंतर्भूत करण्याच्या मागील भूमिकाही एकच. वस्तुतः 'अपराध मीच केला' हे नाटक उपरिनिर्दिष्ट इतर नाटकांप्रमाणे कौटुंबिक नाटक नव्हे, त्याचा 'टाईप' जरा वेगळा आहे. तरी देखील लोकप्रियतेच्या मोहाने नाटककाराने ठराविक साच्यातील मास्तरची भूमिका त्यात घालून परंपरागत सांस्कृतिक व नैतिक पुरस्काराचा 'टच' दिलाच आहे. दारव्हेकरांचे 'वऱ्हाडी मानसं' व मो. दा. देशमुखांचे 'देव्हारा' ही नाटके देखील काही प्रमाणात या साच्यात शोभून जातात. नव्हे या 'टेक्नि-क'चाच दारव्हेकरांनी समर्थपणे उपयोग केल्यामुळेच त्यांचे 'वऱ्हाडी मानसं' अत्यंत लोकप्रिय ठरले आहे.

या कौटुंबिक नाटकांच्या काही मर्यादा व नव-टीकाकारांकडून त्यांवर घेण्यात येणारे आक्षेप जमेस धरूनही या नाटकांचे सामर्थ्य, सामान्य जनतेवरील त्यांची पकड ही आपल्याला कदापी अमान्य करता येणार नाही. तुम्ही आम्ही उथळ, 'मेलोड्रॅमॅटिक' इत्यादी विशेषणांनी त्यांची भलेही कुचेष्टा करो, लोक त्यांना डोक्यावर घेऊन नाचणार, त्यांचे प्रयोग अधिकाधिक होतच जाणार. लोकरंजनाचे, उद्बोधनाचे जे फार मोठे कार्य या नाटकांमुळे होत आहे त्याची उपेक्षा करता येणार नाही. प्रयोगदृष्ट्या ही नाटके प्रयोगक्षम तर आहेतच, शिवाय प्रयोगसुलभ आहेत. त्यांच्या प्रयो-गाची यशस्विता निश्चित आहे. दिग्दर्शन व अभि-नयादी निर्मितीची बाजू दुबळी असली तरी त्यांचे प्रयोग साधारणतः यशस्वी होऊन जातात.

तात्त्विक, वैचारिक परंतु समन्वयवादी नाटके

दुसरा प्रवाह हा तात्त्विक, वैचारिक परंतु समन्वयवादी नाटकांचा. या प्रकारात श्री. पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, वि. वा. शिरवाडकर यांची नाटके प्रामुख्याने येतात. 'तुझे आहे तुजपाशी' (देशपांडे); 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'मत्स्यगंधा', 'अश्रूंची झाली फुले' (कानेटकर); 'दूरचे दिवे', 'ययाती व देवयानी', 'दुसरा पेशवा' (शिरवाडकर) या नाटकांचा या संदर्भात आपल्याला उल्लेख करावा लागेल. पहिल्या प्रकारातील नाटकांचे जर भावनोत्कट अशा शब्दात आपण वर्णन केले तर या नाटकांना वैचारिक असे विशेषण लावणे योग्य होईल. कारण या नाटकांना एक निश्चित वैचारिक अधिष्ठान आहे. त्यात लेखकाच्या विशिष्ट तात्त्विक भूमिकेचे प्रतिपादन आहे. सामाजिक विचारप्रणालीचे किंवा संकेतांचे, ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तींचे पुनर्मूल्यन आहे. त्यांची नव्या दृष्टिकोनातून मीमांसा केली आहे, जुन्याच गोष्टींवर नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या नाटकांचे स्वरूप जसे तात्त्विक आहे तसेच ते संशोधनात्मकही

आहे. मूल्यमापनात्मकही आहे. या दृष्टीने ही नाटके पहिल्या प्रकारातील नाटकांपेक्षा अधिक विचारप्रवण आहेत, आशयसमृद्ध आहेत. लेखकाची भूमिका, त्याचा दृष्टिकोण, त्याचे मूल्यमापन सर्वांना पटेलच असे नाही. परंतु त्यात नाविन्य आहे व मौलिकता आहे हे निर्विवाद. 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकात भरपूर विनोद आहे व या विडंबनात्मक व उपहासात्मक विनोदामुळे या नाटकाचे देखील शेकड्याने प्रयोग झाले आहेत, अजूनही लोकप्रिय ठरत आहेत. तरीही या नाटकालाही एक तात्त्विक बाजू आहे व तिचा विचार या नाटकाच्या विवेचनाच्या संदर्भात आवश्यकच नव्हे, तर अपरिहार्य असतो. 'आमचं नांव बाबूराव' (शिरवाडकर) 'प्रेमा तुझा रंग कसा' (कानेटकर) या नाटकांनाही कमी अधिक प्रमाणात हेच विधान लागू पडते. ही नाटके विनोदी असली तरी 'फार्सिकल' नाहीत, व त्यांतील विनोदाची पातळी पूर्वीच्या नाटकांमधील विनोदापेक्षा अधिक बुद्धिनिष्ठ व वाङ्मयीन आहे हेही सहज लक्षात येऊ शकेल. अत्र्यांच्या 'तो मी नव्हेच' या नाटकाचाही आपल्याला याच प्रकारात अंतर्भाव करता येईल.

ही नाटके तात्त्विक असली तरी भावनोत्कटतेचा त्यात अभाव नाही. प्रेक्षकांच्या भावनांना आवाहन करणारे प्रसंगही त्यात कुशलतेने गुंफले असल्यामुळे नाटके शुष्क किंवा रसहीन वाटत नाहीत. विचारप्रवर्तनाबरोबरच रसोत्कर्ष साधण्याचाही प्रयत्न या नाटकांमध्ये नाटककारांनी केला आहे. म्हणून ही नाटके जशी वैचारिक आहेत तशीच भावरमणीयही झाली आहेत. कौटुंबिक नाटकांइतका या नाटकांमधील आशय, संघर्ष, नाट्य ढोबळ, स्थूल व भडक नसले तरी ते आकलनीय आहे. हृदयस्पर्शी आहे. सर्वसामान्य प्रेक्षक, विशेषतः बायाबापड्या व केवळ करमणुकीसाठी नाटक पहायला जाणारे यांना कदाचित ही नाटके जरा जड वाटतील, कौटुंबिक नाटकांइतकी रोचक व पचनीय वाटणार नाहीत. परंतु सुशिक्षित, विचारी माणसांना ती निश्चित आवडतात. आशयाचे मूल्य कायम राखून, पातळी खालावू न देताही प्रयोग यशस्वी कसा होईल याचा विचार करून तदनुरूप मांडणी, रचना, प्रसंगांची निवड, भाषा या सर्व घटकांकडे नाटककारांनी काळजीपूर्वक लक्ष दिले आहे. नाटक हे अगदी बाळबोध स्वरूपाचे नसले, त्यात mass–appeal नसले तरी ते सुबुद्ध का होईना परंतु प्रेक्षकांसाठीच आहे व त्याचा प्रयोग यशस्वी झाला पाहिजे या जाणीवेने नाटककारांनी लेखन केले आहे. लोकाभिरुचीच्या आहारी जाऊन प्रयोगाच्या यशासाठी ठराविक 'फार्म्युल्या'चा अवलंब यांनी केला नाही. लोकांना एक तर हसविणे अगर रडविणे एवढेच यांच्या लेखनाचे उद्दिष्ट नाही. तरी स्वतःच्या आशयाशी व अनुभूतीशी प्रामाणिक राहूनही नाटक हे अखेर प्रयोगासाठी आहे, लोकांसाठी आहे या लोकाभिमुख वृत्तीने लेखन करणाऱ्या या नाटककारांच्या नाट्यलेखनाला समन्वयवादी प्रवाह असे मी म्हटले आहे. ही नाटके देखील लोकप्रिय ठरली आहेत. कौटुंबिक नाटकांइतके जरी नसले तरी त्यांचे प्रयोग होत आहेत, गाजत आहेत व याचे प्रमुख कारण म्हणजे नाटककारांनी आपला वैचारिक व तात्त्विक आशय आणि लोकाभिरुची व प्रयोगक्षमता या दोन गोष्टींचा आपल्या नाटकात साधलेला समन्वय.

नवनाट्य

तिसरा प्रवाह हा नवनाट्याचा. या प्रवाहाचे प्रमुख अध्वर्यू म्हणजे श्री. विजय तेंडुलकर. त्यांच्या जोडीला शं. गो. साठे, रत्नाकर मतकरी हेही आहेतच. 'श्रीमंत', 'मधल्या भिंती', 'माणूस नावाचे बेट', 'चिमणीचं घर होतं मेणाचं', 'मी जिंकलो, मी हरलो', 'एक हट्टी मुलगी' (विजय तेंडुलकर), 'ससा आणि कासव', 'स्वप्नीचे हे धन' (शं. गो. साठे), 'गारंबीचा बापू' (पेंडसे) ही या प्रवाहातील प्रमुख नाटके. या नाटकांचे वाचन केल्यानंतर सर्वप्रथम व एकदम कोणती गोष्ट लक्षात येत असेल तर ती म्हणजे पूर्वीच्या नाटकांपासून त्यांचे वेगळेपण! हे वेगळेपण आशय व अभिव्यक्ती या दोन्ही बाबतींत ठळकपणे जाणवते. आशयाच्या दृष्टीने विचार केल्यास काय दिसते? या नाटकांमधील विषय व आशय पूर्वपरंपरेला धरून नाही, परिचित नाही, सामान्य माणसालाच काय

पण बुद्धिमंतांना देखील सहजासहजी दिसणारा, जाणवणारा, समजणारा असा नाही. हा आशय, हे नाट्य अतिशय खोल आहे, सूक्ष्म आहे, तरल आहे. मानवी जीवनाचा, मानवी मनाचा, त्यातील अंतःप्रवृत्तींचा शोध घेण्याची त्यात धडपड आहे. मनाच्या दृश्य प्रवृत्तींऐवजी अचेतन व उपचेतन मनातील विविध प्रवृत्तींचे, स्वभावच्छटांचे अंतर्मनातील संघर्षाचे दर्शन घडविण्याचा त्यात प्रयत्न आहे. ही नाटके ढोबळ दृष्टीने वास्तववादी वाटत नसली तरी ती वास्तववादीच आहेत. बदलत्या परिस्थितीत आज मानवी मन जी नवी नवी परिमाणे धारण करीत आहे, त्या विविध पातळींवरील संघर्षाचा अविष्कार करणे; आंतरमनातील अनेकविध पापुद्रे उलगडून त्याखालील समस्यांचे दर्शन घडविणे हे या नाटककारांचे उद्दिष्ट आहे. तसेच ही नाटके बरीच बुद्धिनिष्ठ आहेत, बुद्धिग्राह्य आहेत. त्या मानाने त्यात भावनाप्रधानता कमी आहे. स्थूल, भडक, उत्कट, ठसठशीत चित्रणाचा त्यात अभाव आहे. सूचकतेवर या लेखकांचा अधिक विश्वास आहे. प्रत्येक समस्या समजावून सांगण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. त्यामुळे ही नाटके सामान्य प्रेक्षकांना दुर्बोध वाटतात. सुबुद्ध व सुजाण प्रेक्षकांना ती तितकी अनाकलनीय वाटली नाहीत तरी रोचक–हृद्य वाटत नाहीत. कारण ती पाहतांना मनावर बराच ताण पडतो. या नाटकांमधील आशयाचे रसग्रहण करायला, त्यातील नाट्य पकडायला बुद्धी व मन तेवढे संवेदनक्षम, तरल व कल्पक हवे. दुर्दैवाने प्रत्येक गोष्ट समजावून सांगण्याच्याच पद्धतीची सवय आजवरच्या नाटककारांनी प्रेक्षकांना लावल्यामुळे ते या नाटकांचा आस्वाद घेण्यास असमर्थ ठरत आहेत.

प्रेक्षकांच्या दृष्टीने या नाटकांची परिणामकारकता कमी असण्याचे आणखी एक कारण आहे. व ते म्हणजे आशयाच्या अभिव्यक्तीची शैली–विशेषतः भाषा. कालेलकर ,कोल्हटकर, देशपांडे, कानेटकर, शिरवाडकर यांची नाटके व तेंडुलकरांची नाटके काळजीपूर्वक वाचल्यास हा फरक सहज लक्षात येतो. नवनाट्यामध्ये आपल्याला तत्पूर्वीच्या नाटकांसारखी प्रासयुक्त,ओघवती, पल्लेदार, भावनेने ओथंबलेली, वक्तृत्वपूर्ण, सुभाषितवजा अशी भाषा आढळणार नाही. आपली नाट्याभिरुची ही अशा भाषेवर आजवर पोसली गेली आहे. आमचे श्रेष्ठ नाटककार हे भाषाप्रभू होते. व ज्या नाटकांमध्ये ओज लालित्य, वक्तृत्व, किंवा अन्य प्रकारेही भाषेची चमक, भाषेचा फुलोरा, भाषेचा विलास असतो त्या नाटकांचा आमच्या मनावर अधिक प्रभाव पडतो. नाट्याभिव्यक्तीसाठी 'शब्द' या साधनावर आजवरच्या नाटकांमध्ये अतिरिक्त भर देण्यात आला. नेमका याच वैशिष्ट्यावर नवनाटककारांचा आक्षेप आहे. नाट्यांतर्गत आशयाला भाषेने सजविणे, नटविणे त्यांना मान्य नाही. शब्दाव्यतिरिक्त रंगभूमीवरील इतर दृश्य शक्तींचा अधिकाधिक उपयोग केला पाहिजे; शब्द हे एक माध्यम जरूर आहे, परंतु आवश्यक व अपरिहार्य तेवढाच त्याचा उपयोग करावा हा त्यांचा नाट्यलेखनाविषयीचा दृष्टिकोण आहे. म्हणून नवनाटककारांनी आपल्या नाट्यलेखनाच्या बाबतीत भाषा–प्रसाधनाला मुळीच प्राधान्य दिले नाही. भाषेचे अवडंबर त्यांनी झुगारून दिले आहे. मूळ नाट्यवस्तूचे अतिशय सूक्ष्म, तरल, गूढ, शब्दात पकडण्यास कठिण, त्यातच भाषेबद्दलची अशी उदासीनता याचा परिणाम म्हणून सामान्य वाचक–प्रेक्षकांच्या दृष्टीने नवनाट्य अधिक दुर्बोध न झाले तरच नवल.

नवनाट्यांचा तिसरा विशेष म्हणजे—ही नाटके प्रयोगशील आहेत. त्यातून प्रेक्षकांना काही नवे सांगण्याचा, नवी अनुभूती, नवी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. साहजिकच अभिव्यक्तीसाठीही लेखनातही नवे प्रयोग, नव्या पद्धती, नवे तंत्र यांची योजना लेखकांना करावी लागते. काही नाटकांची नावेही प्रतीकात्मक आहेत. तसेच ही नाटके प्रयोजित करण्यासाठी प्रकाशयोजना, नेपथ्य, ध्वनी इत्यादी विविध प्रकारच्या तांत्रिक साधनांचाही अवलंब निर्मात्याला करणे भाग पडते. कारण त्याशिवाय हा आशय प्रेक्षकांपर्यंत पोचविणे हे अशक्यप्राय असते. अशी नाटके–असे प्रयोग पाहण्याचा सराव नसल्यामुळे प्रेक्षकांना ही नाटके समजत नाहीत, समजली तरी हृदयाला जाऊन भिडत नाहीत. जसजशी प्रेक्षकांची अभिरुची, कल्पकता व ग्रहणशीलता या दिशेने विकसित होत

जाईल तसतशी ही नाटके व त्यांचे प्रयोग यशस्वी व लोकप्रिय होत जातील.

या नाट्यप्रवाहाचा आणखी एक विशेष नमूद करणे उल्लेखनीयच नव्हे तर उद्‌बोधक ठरेल. हे नवे नाटककार प्रचलित लोकाभिरुचीशी वा प्रेक्षकांशी कसलीही तडजोड करायला तयार नाहीत. त्यांना जे जाणवले, जे पटले तेच ते लिहितात, त्याच पद्धतीने लिहितात. प्रेक्षकांना हे समजेल की नाही, कसे समजेल, किंवा त्यांना काय आवडते, आवडेल, नाटक अधिक लोकप्रिय कसे होईल, या गोष्टींचा ते विचार करीत नाहीत. प्रेक्षकांनी त्यांची भूमिका व त्यांचे लेखन समजून घ्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. कानेटकर, देशपांडे इत्यादी लेखकांनीही आपल्या उत्तमोत्तम नाटकांमध्ये लोकाभिरुचीला आवाहन करण्यासाठी, अगर नाटक लोकप्रिय करण्याच्या मोहाला बळी पडून काही ठिकाणी 'सस्त्या इनोदी मसाल्या'चा वापर करून ही तडजोड केली आहे. उदा. 'अश्रूंची झाली फुले' मधील प्राध्यापकांची लाचारी व त्यांच्या हास्यास्पद माकडचेष्टा; 'तुझे आहे तुजपाशी' मधील अतिविशाल महिला; 'सुंदर मी होणार' मधील मेनका इत्यादी. परंतु विजय तेंडुलकरकरांसारखा लेखक अशा प्रकारची कसलीही तडजोड न करता अव्यभिचारी निष्ठेने व सातत्याने लेखन करीत आहे हे नवनाटककारांचे एक महान वैशिष्ट्य मानावे लागेल.

प्रेक्षकांनी या नाटकांना विचकून न जाता ती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. टीकाकारांनीही नवनाट्याला केवळ नाके न मुरडता या नाटकांची समीक्षा करून ती प्रेक्षकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातील मर्म व आशय त्यांना स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मानसशास्त्रीय नाटके

या तीन प्रवाहांवरोबरच मानसशास्त्रीय अगर मनोविश्लेषणात्मक नाटकांचा एक स्वतंत्र प्रवाह म्हणून विचार केला पाहिजे. त्याशिवाय आजच्या नाटकांचा सर्वांगीण विचार होणार नाही. आज शिक्षण, साहित्य कला, वैद्यक इत्यादी अनेक क्षेत्रांवर मानसशास्त्राचा प्रभाव पडला आहे, पडत आहे. तो कसा, याचे विवेचन येथे करण्याचे कारण नाही. नाट्य हाही साहित्याचा एक प्रकार. तेव्हा त्यावरही मानसशास्त्राचा परिणाम होणे स्वाभाविकच आहे. अशी नाटके म्हणजे 'वेड्याचं घर उन्हात', 'रायगडला जेव्हा जाग येते' (कानेटकर), 'बाधा' (सरिता पदकी), 'कक्षा' (तारा वनारसे), 'वर्तुळाचे दुसरे टोक' (रत्नाकर मतकरी), 'चंद्र नभीचा ढळला' 'वऱ्हाडी मान्सं' (दारव्हेकर) 'ज्योत्स्ना व ज्योती' (गंगाधर गाडगीळ) इत्यादी होत. एका दृष्टीने या नाटकांचा नवनाट्यातच अंतर्भाव करायला हवा. कारण ह्या नाटकांमधील आशय सर्वस्वी नवा आहे, नाटके प्रयोगशील आहेत व मानसशास्त्रीय मीमांसेमुळे ती दुर्बोधही बनली आहेत. परंतु यांचा वेगळा वर्ग कल्पिणे हे विवेचनाच्या दृष्टीने अधिक सोयीचे आहे.

'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात संभाजीच्या व्यक्तिमत्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण विकासाला त्याच्या बालपणीचे अनुभव, त्याला मिळालेली वागणूक व वातावरण कसे कारणीभूत झाले याची मानसशास्त्रीय कारणमीमांसा आहे. 'वेड्याचे घर उन्हात' 'वर्तुळाचे दुसरे टोक' 'वऱ्हाडी मान्सं' या नाटकांत व्यक्तीच्या अज्ञात मनात आपण अपराध केला आहे असा गंड (Guilt complex) निर्माण झाल्यामुळे वागण्यात जी विकृती निर्माण होते. त्यांना जे, आभास होतात त्यांचे दर्शन घडविले आहे. 'वर्तुळाचे दुसरे टोक' हे तर संपूर्णपणे भासचित्रच आहे. 'बाधा'मध्ये कामप्रवृत्तीच्या दडपणामुळे खोट्या समाधानासाठी व्यक्ती प्रक्षेपण (projection) या मानसिक यंत्रणेचा (Mental mechanism) आधार कसा घेते हे दर्शविले आहे. 'चंद्र नभींचा ढळला'मध्ये सकृद्दर्शनी मनोविकृत व विक्षिप्त वाटणाऱ्या व्यक्तीचे दर्शन आहे, तर 'ज्योत्स्ना व ज्योती'मध्ये खोट्या कल्पनांच्या आहारी जाऊन व्यक्ती आपलीच आत्मवंचना कशी करून घेते हे दाखविण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात नाना जोगांच्या 'भारती' नाटकाचा निर्देश करणे अत्यावश्यक आहे, मनोविकृती-तिची कारणमीमांसा व तिच्यावरील उपचार थोडक्यात मानसिक विकृती, चेतन वा उपचेतन मनातील गंडांचा अविष्कार,

माणसाच्या वागण्यातील अनाकलनीय विसंगती, वर्तणुकीची मानसशास्त्रीय मीमांसा इत्यादी विषय आजकाल नाटकांमध्ये हाताळले जातात. हा मानसशास्त्राचाच परिणाम होय.

सामान्य प्रेक्षकाला मानसशास्त्राचे फारसे ज्ञान नसते. त्यामुळे नाटकांमधील अशी मानसशास्त्रीय समस्या त्याला आकलन होत नाही. वरे, अशी नाटके प्रयोजित करताना प्रकाशयोजना आदी तांत्रिक साधनांचा अवलंब अपरिहार्य असतो. भासचित्रे, स्वप्न, उपचेतन, मनातील विकार–कल्पना इत्यादींच्या दर्शनासाठी तांत्रिक साधनांची मदत घेतल्याशिवाय प्रयोग सादर करताच येणार नाही. पुष्कळदा साधनांचा अवलंब करूनही या कल्पना प्रेक्षकांना समजू शकत नाहीत. या अडचणींमुळे अशी नाटके व त्यांचे प्रयोग प्रेक्षकांना दुर्बोध वाटतात. प्रयोग लोकप्रिय होत नाहीत. तरीही त्यांचे महत्त्व व मूल्य आपल्याला मान्य केलेच पाहिजे.। नाटकांना व त्यांच्या प्रयोगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. एवढेच नव्हे तर लोभाभिरुचीवर देखील नवनाट्याच्या आस्वादाला आवश्यक व परिपोषक असे संस्कार करण्याचा जाणत्या लोकांकडून सातत्याने प्रयत्न झाला पाहिजे.

'या नवनाट्याचे यशापयश उत्कृष्ट प्रयोगनिर्मितीवरच फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. निर्मात्यांना ते एक फार मोठे आव्हान आहे.'

न–नाट्य

।नाट्यचर्चेमध्ये अत्याधुनिक व अत्यंत वादग्रस्त असा हा प्रकार. याचे मूळ पाश्चात्य रंगभूमीवर जी नाट्यविषयक क्रांती घडून येत आहे त्यात आहे. रूढ व पारंपरिक नाट्य ज्या नाटकात नाही ते न–नाट्य. इंग्रजीत याला 'Anti–theatre' किंवा 'Theatre of the Absurd' अशी नामाभिधाने आहेत. आयनेस्को, बेकेट, काम, सार्त्र इत्यादी पाश्चात्य नाटककार हे या संप्रदायाचे पुरस्कर्ते. जीवन किती अर्थशून्य बनले आहे, ते किती नकली व बनावट आहे, माणूस किती विफलतेने, निराशेने ग्रासला आहे, तो किती श्रद्धाहीन, तुच्छ, घृणास्पद बनला आहे यांचे चित्रण या नाटकांमधून केले जाते. अर्थात या अर्थशून्य जीवनाची अभिव्यक्ती देखील अर्थशून्य व विक्षिप्त पद्धतीनेच केली जाते, तरच या निरर्थकतेची प्रतीती प्रेक्षकांना येणार म्हणून नाटकात व प्रयोगातही अर्थहीन, विसंगत, परस्परविरोधी व विक्षिप्त अशा घटना, व्यक्ती, त्यांचे वागणे–बोलणे दाखविल्या जातात. त्यामुळे हे नाट्यप्रयोग पराकाष्ठेचे दुर्बोध, कंटाळवाणे व नीरस वाटतात. ही या संप्रदायाची भूमिका. परंतु आपल्या रंगभूमीवर या प्रवाहाने अजून मूळ धरले नाही. अशा पद्धतीचे रंगभूमीवर आलेले नाटक एकच व ते म्हणजे खानोलकरांचे 'एक शून्य बाजीराव'– ज्यात रंगभूमीवरील एका कलावंताच्या अंतर्मनातील झगडा व त्याचे द्विधा व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन घडविले आहे. 'खुर्च्या' वगैरेसारखे काही अनुवादित प्रयोगही सादर करण्यात आलेत. परंतु न–नाट्य हा प्रकार मराठी रंगभूमीच्या प्रेक्षकांना अजून अपरिचितच आहे.। म्हणून त्याचा येथे अधिक विचार करण्याची मला आवश्यकता वाटत नाही.

तरी येथे एक मुद्दा मात्र आवर्जून स्पष्ट करावासा वाटतो व तो असा. 'नवनाट्य व न–नाट्य हे प्रकार एकरूप मानणे' माझ्या मते बरोबर नाही.। नवनाट्य या प्रकारात ज्या नाटकांचा मी उल्लेख केला आहे ती नाटके अर्थशून्य, 'absurd', किंवा दुर्बोध व विक्षिप्त नाहीत. त्यामुळे न–नाट्यावर घेण्यात आलेले किंवा घेतले जाणारे आक्षेप नवनाट्याला गैरलागू आहेत. आमच्या रंगभूमीवर नवनाट्याला स्थैर्य व प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. न–नाट्य अजून रुजायचेच आहे. नवनाट्य व न–नाट्य यांच्यात गल्लत करणे श्रेयस्कर नाही.

फार्स

।नाट्यक्षेत्रात गाजलेला आणखी एक प्रकार म्हणजे फार्स. तसे म्हटले तर फार्स हा जुनाच प्रकार आहे. पूर्वी गंभीर नाटकांच्या प्रयोगाचे वेळी प्रेक्षकांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी रुचिपालट म्हणून फार्सचा उपयोग करीत. परंतु आधुनिक फार्स पाश्चात्य फार्सचे अनुकरण आहे. या प्रकाराला रंगभूमीवर रूढ

व लोकप्रिय करण्याचे श्रेय लेखक म्हणून श्री. बबन प्रभू विदग्दर्शक म्हणून श्री. आत्माराम भेंडे यांना आहे. 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'चोरावर मोर' 'माकड व पाचर' ही काही प्रमुख उदाहरणे. आप्टीकरांचीही काही नाटके फार्स नसली तरी फार्सिकल आहेत. फार्समध्ये कथानक, स्वभावचित्रण, तर्कशुद्धता, सुसंगती यांना मुळीच महत्त्व नाही. विनोद, गंमत, गोंधळ, धमाल धांगडधिंगा हे फार्सचे वैशिष्ट्य ! असंभाव्यता, अतिशयोक्ती हा त्यांचा स्थायीभाव ! जीवनातील व मानवी स्वभावातील प्रातिनिधिक व्यंगे व विसंगती यांचे भडक व अतिरेकी दर्शन हे यांचे विषय ! फार्सला वाङमयीन महत्त्व अगदी बेतावाताचेच ! त्यामुळे संविधानक, संवाद, भाषा, व्यक्तिदर्शन इत्यादी वाङमयीन कसोटयांच्या निकपावर फार्सचे मूल्यमापन करणे गैर आहे. विनोदी नाटके व फार्स यांमध्येही फरक आहे. विनोदी नाटकांतही एक प्रकारची वास्तवता असते, उपरोध व विडंबन असले तरी त्यात सूक्ष्मता असते, वाङमयीन मूल्य असते. याउलट फार्समध्ये अवास्तवताच अधिक! येथे शब्दांना फारसे महत्त्वच नसते. तर 'ॲक्शन'– कृती, हावभाव, अंगविक्षेप हेच खरे माध्यम ! म्हणून फार्स पाहताना प्रेक्षकांनी आपली विचारशक्ती, बुद्धी वाङमयीन अभिरुची वगैरे गुंडाळून ठेवावी. केवळ हसण्यासाठी म्हणून फार्स पहावा. तेवढेच त्याचे प्रयोजन व त्यातच त्याची सफलता.

मध्यंतरी आय. एन. टी. तर्फे सादर केलेले फार्स खूपच गाजले. परंतु आज फार्सचीही लोकप्रियता ओसरलेली दिसते. आम्हा तथाकथित बुद्धिवादी प्रेक्षकांना निर्भेळ व केवळ हास्य फारसे मानवत नाही, हे याचे कारण असावे काय ?

रहस्यात्मक नाटके

हल्ली रहस्यात्मक नाटकांचीही निर्मिती बऱ्याच प्रमाणात होत आहे. निदान नाटकाच्या कथानकात एखाद्या तरी रहस्याचा अंतर्भाव करण्याची प्रवृत्ती नाटककारांमध्ये वाढत आहे. 'एक रात्र अर्धा दिवस' (लीला चिटणीस) 'चार कथा एक व्यथा' (दारव्हेकर), 'कथा कुणाची व्यथा कुणा' (पारखी) 'खून पहावा करून' (सरिता पदकी) ही सर्वस्वी रहस्यावर आधारलेली नाटके. परंतु 'वर्तुळाचे दुसरे टोक', 'वऱ्हाडी मान्सं', 'देव्हारा' आदी नाटकांतही रहस्यांचा उपयोग लेखकांनी करून घेतला आहे. व याचा मुख्य उद्देश 'सस्पेन्स' निर्माण करून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता, कुतूहल निर्माण करणे. ज्या प्रमाणात 'सस्पेन्स' प्रभावी ठरेल त्या प्रमाणातही नाटकांचे प्रयोग अधिक प्रभावी ठरतात. त्यांचे बरेचसे यश हे प्रयोगनिर्मितीच्या कौशल्यावर अवलंबून असते.

संगीत नाटके

शेवटी, जुन्या अभिरुचीला खाद्य पुरविण्यासाठी संगीत नाटकांचे जे पुनरुज्जीवन आज रंगभूमीवर होत आहे, त्याचाही उल्लेख करणे अप्रस्तुत ठरणार नाही. या प्रवाहाचे निर्माते श्री. विद्याधर गोखले हे एकांड्या शिलेदाराप्रमाणे संगीत नाटकांची परंपरा चालवीत आहेत. 'पंडितराज जगन्नाथ', 'सुवर्णतुला', 'मंदारमाला', 'जय गंगे जय भागिरथी' ही त्यांनी लिहिलेली प्रमुख नाटके. संगीत नाटके मराठी प्रेक्षकांना अपरिचित नाहीत. तेव्हा या प्रवाहाची वैशिष्टये स्पष्ट करून सांगण्याचीही फारशी गरज नाही. संगीत नाटकांमध्ये कथानक, पात्रे, संघर्ष आदी सर्व गोष्टी असल्या तरी त्या दुय्यम ठरतात. संगीत हे त्यांचे प्रधान अंग बनते व लोकही संगीतासाठीच ही नाटके पाहायला जातात. अर्थात ज्या प्रमाणात हे संगीत नाटयवस्तूशी एकजीव होईल त्या प्रमाणात संगीत नाटके अधिकाधिक निर्दोष होत जातील.

येथवर आज रंगभूमीवर प्रचलित असलेल्या प्रमुख प्रकारांचे–प्रवाहांचे व त्याच्या प्रमुख वैशिष्टयांचे दर्शन घडविले. प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे हे स्थूल दर्शन आहे. प्रत्येक प्रकार व त्या प्रकारांतर्गत नाटके व त्यांचे लेखक यांचे सखोल व सविस्तर समीक्षण नव्हे. त्यामुळे विवेचनातून पुष्कळ नाटककार व नाटके यांचा उल्लेख गळला असेल; परंतु त्या नाटकांमधून कोणत्याही विशिष्ट प्रवाहाचे स्वरूप स्पष्ट होत नसल्यामुळे त्यांचा निर्देश केला नाही. त्याचप्रमाणे अगदी एवढ्यातच प्रसिद्ध झालेल्या वा रंगभूमीवर आलेल्याही नाटकांचा या लेखात विचार

(पुढील मजकूर पान २९८ वर)

गुलाम

—शशिकान्त नारायण केळकर

शेवटी तो तिच्या अंगावरचा हात काढून टाकतो. तरी तिचं वरखाली होणारं ऊर त्याच्या अंगाला स्पर्श करीतच असतं. झोपेतला तिचा श्वासोच्छ्वासही त्याला अस्वस्थ करीत असतो. मग तो ताडकन् उठून बेडवर बसतो. खिडकीबाहेर पहातो.

बाहेरच्या दाट काळ्याकुट्ट अंधारावर त्याची नजर आदळते. पोलादावर धारदार चाकू फिरावा तशी त्याची नजर अंधारावर फिरते व बोथट होऊन परतते.

खोलीत टेबलावर जळत असते एक मेणवत्ती. पिवळसर अशक्त प्रकाश. जसा काही बाहेरचा काळोख कडवट हसतोय...आणि मेणवत्ती जळत असते खिन्नपणे. एखाददुसरा थेंब ओघळतो तीवरून. अश्रूसारखा.

रिपरिप पावसाचा आवाज बाहेरून. कुणी तरी तो काळोख आतून पोखरतोय. तसाच मधून किर्र आवाज. दूरवर स्मशानातून ऐकू येणाऱ्या रडण्यासारखा. आणि एकदम अभद्र हसल्यासारखा आवाज. झाडांच्या पानांच्या सळसळण्याचा. हिरवी काळी पानं फिस्कारल्यासारखी करतात. आणि पाण्याचे थेंब जमिनीवर निसटतात टपाटपा.

कुणी तरी चिरडत असल्यासारखा तो जमिनीवर बसलेला विचित्र. आणि केविलवाणी जळत रहाणारी खिन्न मेणवत्ती.

आणि त्याच्या डोक्यात उडलेलं मधमाशांचं मोहोळ. त्याच्या मनाला, हृदयाला असंख्य चावे. मन रक्ताळून जातं.

पिळून काढल्यासारखा तो गलितगात्र होत जातो. तरी पण आयुष्यातून अर्थाचा एकही थेंब टिपकत नाही.

सिंदवादसारखं त्याच्याही मानेवर बसलेलं जाणीवेचं भूत, त्याचा जीव कासावीस करणारं, कणा दुमडणारं.

आणि म्हणून त्याला शक्य आहे केवळ चाचपणं. राखराख होणं. घुमसणं. पेटणं. पुन्हां विझणं.

त्याच्या तप्त मनावर त्याच्याच प्रश्नांचे घण पडतात एकावर एक. आणि त्याखाली मन काही आकार न घेता वितळतंच जातं. ओघळत रहातं. मेणवत्तीवर ओघळणाऱ्या थेंबासारखं.

तो उभा रहातो एकदम. मेणवत्तीच्या अश्रूत भिजलेली नजर उचलतो. मोठ्या कष्टाने. दार उघडून बाहेर अंगणात येतो.

काळोखाच्या समुद्राच्या तळाशी उभं राहिल्यासारखं वाटतं त्याला. अंगावर मधूनमधून थेंब गळतात पावसाचे. जणू काळोखच त्याचं अंग चाटतोय. काळोखाचा एक कण की काय तो ?...

ओला चिकट स्पर्श त्याच्या पायाला. त्याला किंचित सुखावल्यासारखं वाटतं. तो पुन्हा पुन्हा पाय चिखलावर घासतो. पायाचे तळवे, पावलं चिखलानं लडबडतात. तो पुन्हा पुन्हा पावलं चिखलावर फिरवतो. मध्येच एकदम थबकतो....कसली आठवण ? खूप जुनी. पुसट. पण ती झट्कन् त्याच्या मनात उमलते.

..स्पर्श. जुनेरं पातळ आईचं. तिचा अंगावर फिरणारा हात. आई लहानपणीच गेली. पण चिखलाच्या स्पर्शानं एकदम आठवली. गेली तेव्हा ढसा ढसा रडलो....तेव्हा रडून दुःख हलकं करता येत होतं !

तो छद्‌मी फाटल्यासारखं हसतो. मेणवत्तीच्या खोलीतल्या उजेडासारखा ...आता नाही तसं करता येत. आई गेली. मग दादा गेले. ताई गेली. पण आई-नंतर मात्र कुणाच्याही वेळी डोळ्यांत टिपूस आलं नाही. प्रत्येक माणस जाणार हे गृहितच धरू लागलो... त्यामुळं कुणावर प्रेम करता येत नाही. एखादं माणूस यावं, आपण त्यावर प्रेम करावं आणि ते जावं. मग जवळ उरतं ते दुःख. कुणी तरी फसवल्यासारखं. प्रेम करणं, राग करणं किंवा कोणतीही भावना दाखवणं म्हणजे मूर्खपणा. केवळ फसणं. जगणं म्हणजे जाणून-बुजून स्वतःला फसवून घेणं.

तो वेगाने अंगणात येरझारा घालू लागतो. मध्ये चिखलावर पाय घट्ट दावतो. झाडांच्या स्तब्ध ओल्या पानांना कुरवाळतो हाताने.

....कुठे तरी भिरकावून दिल्यासारखा जन्म. आणि कोपऱ्यात दावून जवरीने लादल्यासारखा मृत्यू. दोन्हींची सक्ती. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत धावणं फक्त उरतं ओंजळीत. त्यातल्या त्यात जमेल तसं वेगानं धावायचं. सगळे इजिप्शीयन गुलाम... आणि त्याच्यासारखा एखादा जागा गुलाम तडफडतो, हातपाय आपटतो ... तो निष्ठूर हलकट फॅरो कोण आहे ?

चेहेरा आकाशाकडे वळवतो. घुमटात घुमून परत येणाऱ्या आवाजासारखी त्याची नजर काळोख्या आभाळात घुमून परत येते.

पावसाचे दोनतीन थेंब त्याच्या चेहऱ्यावर पडतात व तो पुन्हा जोरजोराने येरझारा घालू लागतो. एकावर एक हात मळतो. नकळत त्याचा खालचा ओठ दाताखाली जास्त दावल्या जातो.

"मी कोण ? मी नक्की काय ? शून्य ? मरतानाही हात ओकेबोकेच रहातात. सारखं वाढत जायचं. थांवता येत नाही. थांवणं म्हणजे संपणं. आणि तेही स्वतःच्या हाती नाही. स्वतःच्या हातात आहे काय ? तर फक्त उतारावरून घरंगळत जाण्याला जीवन समजणं आणि त्यात रस घेणं. म्हणजे स्वतः-लाही फसवणं...व्हॉट नॉन्सेन्स व्हॉट अ हेल्...

तो एकावर एक हात मळत आणखी वेगानं येरझारा घालू लागतो. कुणी तरी सपशेल फसवल्या-सारखा त्याचा चेहरा झालेला असतो. त्यात पुन्हा असमर्थतेची, असहाय्यतेची भावना. त्याच्या चेहऱ्याचे त्या दाट मद्दड काळोखालाही चटके वसले असतील...

वेगानं चालताचालता तो पायाने वाटेतले दगड भिरकावतो. असाच एक छोटासा दगड भिरकावताच त्याच्या पायाला वळवळणारा गिच्च स्पर्श होतो. तो दचकून पाय मागे घेतो. पुन्हा वेगाने येरझारा घालू लागतो.

...पण त्याला कसंतरी अस्वस्थ वाटतं... पायाला झालेला तो घाणेरडा वळवळणारा स्पर्श... तो पाय धुतो. पुन्हा पुन्हा धुतो. बऱ्याच वेळा धुवून झाल्यावर तो पुन्हा येरझारा घालू लागतो. तरीही त्याला पायांना घाण लागल्यासारखी वाटते. धुवून न जाणारी. ते पाऊल कापून टाकलं तरच जाईल ती घाण. नाही तरी ती नेहमीसाठी कोडाच्या चट्ट्यासारखी मन ढवळत राहील...

.. तो ार अस्वस्थ होतो. आणि क्षणार्धात पुन्हा गळून जातो. शून्य होतो. अस्तित्व विसरू पहातो.

...हे पाऊल कापून काय होणार ? सगळ्या शरीराला व मनालासुद्धा असे किती घाणेरडे स्पर्श दर क्षणाला होत जातात ?...ओतल्यासारखा हजारो मानवी गुलामांचा प्रवाह अंगावरून वहातो. मी फक्त निश्चल. त्यांपैकी प्रत्येकाचा स्पर्श किती घाणेरडा, क्षुद्र असतो. प्रत्येकाचे छोटे छोटे विचार, छोटचा छोटचा भावना. मूर्ख. गलिच्छ. कुणी भळभळीत प्रेम करतो. तर कुणी अंगावर ओरखडे काढतो. पण तेवढचा-पुरतंच. प्रवाहातून तो पुढे वहात जातोच. ओरखडे काढणाऱ्याची सोवत सुद्धा मिळाली तर हवीच आहे. पण त्यापैकी प्रत्येकाला मागून ढुशा मिळतच असतात. व ते दुवळ्यासारखे पुढे ढकलल्या जात असतात. मी मात्र निश्चल उभा. या प्रवाहातूत नियळून निघणारा. पण असं उभं रहायची शक्ती माझ्यात आहे का ? मी तर ढासळतो आहे, कोल-मडतो आहे. वंड करायची, ताठ उभं रहायची ताकद नाही माझ्यात. तसं उभं रहाण्यात काही अर्थही नाही. तीही एक स्वतःचीच फसवणूक ! ....

तेवढ्यात त्याला मानवतेच्या अस्तित्वासाठी झुंजणाऱ्या कवींची आठवण होते व तो कडवटपणे हसतो.

हवेशिवाय पृथ्वीवर जर कसली रेलचेल असेल तर ती अस्तित्वाचीच! अस्तित्वासाठी झुंजावं वगैरे लागत नाही. जन्मभर झोपून राह्यलं तरी अस्तित्व हे असतंच! कारण येथे नाश कसलाच होत नाही. प्रत्येक गोष्ट वेगवेगळ्या स्वरूपात का होईना अस्तित्वात ही असतेच.

पण हे अस्तित्व निरर्थक असतं. लादलेलं असतं. स्वातंत्र्य जखडणारं असतं. व्यक्तिमत्वाचा चेंदामेंदा करणारं असतं. असलं अस्तित्व जाण येताच झुगारून देणं हेच प्रत्येकाचं कर्तव्य.

अस्तित्व हा त्या अज्ञात शक्तीचा खेळ आहे. सगळ्यांना कुणीतरी खेळवतंय. आणि शेवटी प्रत्येकाचा खून होतो. मरण म्हणजे अक्षरशः खून. ही अज्ञात शक्ती आपल्या इच्छेप्रमाणेच प्रत्येकाचा केव्हाना केव्हा खून करते. प्रत्येकाला केव्हाना केव्हा चिरडून टाकते.

या खुनाच्या छायेत प्रत्येकजण मजेत रहायचा प्रयत्न करतो. स्थितप्रज्ञ म्हणून नव्हे. मूर्ख, मद्ड म्हणून. रक्तात गुलामी वृत्ती मुरली आहे म्हणून. आणि कळस म्हणजे मरताना शेवटी प्रत्येकजण मारेकऱ्यालाच शरण जातो. अर्थात तरी त्याचा खून व्हायचा तो होतोच. किती औपरोधिक दुःख आहे हे जंगलेल्या लोखंडासारखं!

त्याचा चेहेरा जास्त जास्त काळवंडतो व त्या काळोखाचाच एक भाग बनून रहातो.

चर्चेमध्ये, मंदिरात आणि मशिदीत आर्त डोळे विस्फारून पाठीचा कणा मोडल्यासारखे वसलेले मानवी समूह त्याच्या डोळ्यांसमोरून हलत नाहीत. आणि अशावेळी त्या अज्ञात शक्तीच्या चेहऱ्यावर कडवट विजयी हास्य उमटत असेल. समोर गयावया करणाऱ्याकडे पहात असता मारेकऱ्याच्या चेहऱ्यावरच्या छद्मी हास्यासारखं!

त्याच्या मुठी वळतात. दातावर दात करकरतात. सगळ्या शरीराचा सुडाच्या वैफल्याच्या भावनेने स्फोट होईलसं त्याला वाटतं. तो खोलीत परततो. मेणवत्तीच्या खिन्न रोगट प्रकाशाने आणखी सुन्न होतो. तो मेणवत्ती उचलतो व टेबलावरच्या बुद्धाच्या मूर्तीजवळ नेतो. मेणवत्ती हातात धरली असता वितळल्या मेणाचे एक दोन थेंब त्याच्या हातावर ओघळतात. व त्याला एकदम थिजून स्वतःचा मेणाचा पुतळा बनत आहोत असं वाटलं. दचकून त्याने मेणवत्ती बुद्धाच्या मूर्तीजवळ ठेवली.

मेणवत्तीच्या अशक्त झिरझिरीत प्रकाशाचं आवरण बुद्धाच्या मूर्तीवर पडतं. तो डोळे विस्फारून त्या वुद्धमूर्तीकडे पाहू लागतो. निश्चल, अथांग वुद्ध. सुंदर उदात्त चेहेरा. आणि ते मोहक शुद्ध हास्य "मला सगळं माहीत आहे तरी मी अस्पर्शित आहे. शुद्ध—मोडतोड न झालेला आहे, अजिंक्य" असा भाव. नेहमी त्याला ते हास्य आधार देतं. तो कोलमडू लागला की त्याला सावरतं. पण आज....? आज तो त्या हास्याकडे क्षितिजावरच्या अस्पष्ट वस्तूकडे पहावं तसं पहातो. ते हास्य आपल्या आवाक्यावाहेर आहे. त्यासाठी हृदय भयंकर मजबूत हवे. माझं हृदय तर या मानवतेच्या गटारात बुचकळून निघालं आहे ...त्या अज्ञात शक्तीला असं शुद्ध स्मित करून हलवण्याची माझ्यात ताकद नाही."

त्याचा चेहेरा वैफल्याने माखून जातो. बुद्धाच्या हास्यावरून परावर्तित होणारा मेणवत्तीचा बावचळलेला प्रकाश त्याचा चेहेरा नुसता शोषतच जातो. पण तरी तो प्रकाशित कधीच होत नाही. उलट जास्त काळवंडत जातो.

तो मेणवत्ती टेवलवर ठेवतो व परत वेडवर येऊन वसतो. असहायतेने तो तिच्या वेडवर पहुडलेल्या शरीराकडे पाहू लागतो. किती स्वस्थ झोपली आहे? झोपेतही मधूनच हसते आहे. आणि त्याला मात्र अधांतरी घड्याळाच्या लंबकासारखं हेलकावित असल्यासारखं वाटतं. असं असहाय वाटत असता तो नेहमी तिच्या शरीरात स्वतःचं शरीर मिसळत असे व त्या धुंदीत स्वतःला थोडं विसरायचा प्रयत्न करीत असे.

...तो तिच्या शरीरावर किनाऱ्यावर लाट पसरावी तसा पसरतो. तिचे ओठ आपल्या ओठात

घेतो. तिच्या छातीवरून, पोटावरून खाली हात फिरवितो...

मग तो निराश होतो. खोटं खोटं का होईना त्याचं शरीर पेटत नाही. सगळ्या शरीराचा आधीच कोळसा झालेला असतो...

...ती झोपेतंच मधूनमधून हसत असते. शरीर चाळवत असते.

...त्याला मात्र हसणं विसरून किती तरी दिवस झाले. लहानपणी आईवरोवर, भावंडांवरोवर हसायचा तो. पण हळूहळू आपण गुलाम आहोत हे कळू लागल्यावर त्याचं हसणं नेहमीकरता मावळून गेलं. गुलामाने हसू नये. गुलामीची जाणीव झाल्यावर सगळी इन्द्रियंच मुळी निर्जीव होतात. उरतं फक्त सक्तीचं, आक्रसलेलं अस्तिवाचं सावट.

--तिच्याकडे पाहात असता त्याला वाटतं कशी ही हजारो माणसं उत्साहानी लुटूपुटूचं जीवन जगतात? एखाद्या लहान पोराच्या बालीशपणे मजेत मरेपर्यंत जगत रहातात? कशी आपापल्या शरीरात, वातावरणात स्वतःला गुरफटून घेतात?.

तो स्वतःला त्या मेणवत्तीच्या क्षीण प्रकाशातून स्वतःला सोडवून घेतो व खोलीवाहेर अंगणात काळोखाच्या तळाशी येतो, आणि वेगाने पिंजऱ्यात कोंडलेल्या श्वापदासारखा येरझारा घालू लागतो. त्याला वाटतं, शरीराचे तुकडे तुकडे होऊन त्या काळोखात मिसळतील तर बरं होईल ..फक्त चिखलातील पावलं थोडी शांत असतात, बाकी सगळ्या शरीराचा दाह दाह होत असतो.

न रहावून शेवटी तो त्या चिखलात निजतो. गडवडा लोळतो. आपलं सगळं शरीर त्या चिखलातून वरवटून काढतो.. चेहेऱ्यावर ओली माती लेपतो. त्या चिखलात एकजीव होण्याचा प्रयत्न करतो. चिखलात गडवडालोळताना कापऱ्या चिडक्या आवाजात पुटपुटतो--"आई, मला वाचव, मला आपल्यात घे. ह्या यातनेतून मला सोडव. गे आईऽऽ!"

—आणि रिपरिपणारा थंड गर्द काळोख खिन्न मेणवत्तीच्या क्षीण पिवळसर प्रकाशाचं कडवट हास्य करीतच असतो!

(पान २९४ वरून)

केला नाही. नाट्यरसिकांमध्ये, रंगभूमीच्या प्रेक्षकांमध्ये अनेक प्रकार असतात, अनेक पातळ्या असतात. प्रत्येक प्रेक्षक आपापल्या अभिरुचीनुसार नाटक निवडतो, त्यापासून आनंद प्राप्त करून घेतो. प्रत्येक प्रकारच्या प्रेक्षकवर्गाला रुचतील, भावतील, पेलतील अशी नाटके लिहिणे व सादर करणे हे नाट्यलेखक व नाट्यदिग्दर्शकांचे कर्तव्यच आहे. व त्या दृष्टीने उपरिनिर्दिष्ट प्रत्येक संप्रदाय आपापल्या परीने रंगभूमीची व प्रेक्षकांची सेवा करीत आहे व ते आवश्यक व इष्टही आहे. त्यातच रंगभूमीचा विकास आहे. प्रत्येक प्रकारच्या प्रवाहाचे मूल्यमापन हेही विकासाच्या दृष्टीने आवश्यक असले तरी एका संप्रदायाने दुसऱ्या संप्रदायावर आक्षेप घेणे, टीका करून चिखलफेक करणे हे अयोग्यच! प्रेक्षकांच्या नाट्याभिरुचीला विकासशील पातळीवर वळण लावणे, तिचे संवर्धन करणे, तिला नवी दिशा देणे हे मात्र फार आवश्यक आहे व त्यासाठी जेवढे विधायक प्रयत्न होतील तेवढे निःसंशय उपयुक्तच ठरतील.

"उद्रेक"

—प्रभाकर धोटे

चुरचुरत्या डोळयांनी बापूरावांनी बाहेर पाहिलं. ऊन चांगलच वर आलं होतं. झाडांच्या अस्पष्ट सावल्या ठळक अन् स्पष्ट होत होत्या. शेणानं सारवलेल्या अंगणात त्या मोठ्या लोभस दिसत होत्या. निदान साडेसात आठ तरी व्हायला आले असतील. त्यांनी भभुत्याला खुणावून निरा-विक्री बंद करायला सांगितली. आणि पुढयातल्या डब्यातली चिल्लर मोजायला सुरवात केली. चार साडेचार रुपयांची चिल्लर जमा झाली होती. मेहनतीला महाग.

आता थोडया वेळानं प्रार्थना. मग अर्धा तास सुतकताई, त्यानंतर बापूराव घरी गेले असते. वार्धक्यानं थकलेल्या शरीरावर चार तांबे ओतून पुढ्यात वाढलेलं घशांत रिचवून ते अर्धा तास लोळले असते. नंतर त्यागमूर्ती सुरजमल थापांच्या टालावर जावं लागलं असतं. तिथला हिशोब तेच पाहात.

बापूरावांना हे सारंच मोठं कंटाळवाणं वाटे. सवयीनं ते करीत पण त्यात त्यांचा जीव रमत नसे. पूर्वी त्यांनी दिवसा अठरा अठरा तास काम केलं. पण त्यांना ते कधी जाणवलं नाही. एक नशा, एक धुंद होती. एका अजस्र शक्तीशी झुंज घेत आहोत, एक आव्हान स्वीकारीत आहो, ह्यांची जाणीव होती. त्या बेहोशीत त्यांनी सर्वस्व पणाला लावलं. बेचाळिसच्या लढ्यांत लहानग्या विश्वासला शांताबाईच्या ओटीत टाकून त्यांनी तुरुंगवास पत्करला. त्यांना एवढीशी देखील काळजी नव्हती. लोक त्यांची काळजी घेतील याबद्दल त्यांना तिळमात्रही संशय नव्हता.

दिवस जसजसे उलटले तसं तसं त्यांना जग कळू लागलं. विश्वास बसू नये इतकं जग बदललं होतं. बदलत होतं. ह्या बदलांची त्यांना जाणीव होत होती. पण तसं वागणं त्यांना जमत नव्हतं. मागून आलेले पुढे गेले. पण बापूराव होते त्यापेक्षा मागे गेले. सांगितलेली कामं त्यांनी मन लावून केली. पण त्याकडे कुणाचं लक्ष गेलं नाही. कारण त्यांनी गाजावाजा केला नाही. स्पर्धा केली नाही. राजकारणाचा डाव रंगविला नाही. आणि बापूरावांना हळूहळू ह्या साऱ्यांचा उबग आला. दुसरे आपला उपयोग करतात, ही भावना मूळ धरू लागली. बापूरावांचा अलिप्तपणा लोकांना बोचू लागला. आणि मग त्यांना बापूराव अडगळ वाटू लागले.

बापूरावांना हे सारं स्वीकारणं भाग होतं. आयुष्यातला अपरिहार्य भाग म्हणून; पराभव म्हणून त्यांनी प्रसादासारखं ते सारं स्वीकारलं. मन आत कुठंतरी रक्तबंबाळ झालं. त्यांचं कुठं चुकलं. हे त्यांना समजेना. त्यांच्या नकळत ते कडवट झाले, काहीसे चिडखोर झाले.

बापूरावांनी चिल्लर पुन्हा मोजली. सुरजमलजींचा मुनीम अजून आला नव्हता. भभुत्या स्वस्थपणे विडी ओढत होता. त्यांना हेवा वाटला. सकाळपासून त्यांनी तंबाखू दाढेखाली सरकवला नव्हता. आश्रमाची शिस्त म्हणून. तेथले पावित्र्य टिकावे म्हणून. बापूरावांनी आश्रमात इकडे तिकडे चक्कर मारली. सारं व्यवस्थित होतं. जाजम अंथरला होता. चरखे ओळीनं ठेवले होते. पेळू जागच्या जागी होते. उदबत्त्या, हार, फुलं, सारं ठीक होतं. त्यांना मनोमन प्रसन्न वाटलं. काहीशा खुषीत; ते तक्तपोसावर येऊन बसले. त्यांची इच्छा असो वा नसो त्यांना ते सारं करणं भाग होतं. एकदा विश्वास बी. एस्सी. झाला की हे सारं संपणार होतं. ते मग प्रपंचात लक्ष घालणार होते. ज्या वयात लक्ष

द्यायला हवं होतं त्या वयात त्यांनी देशाची चिंता वाहिली. आणि आता आयुष्याच्या उतरणीवर ते नवा संसार थाटणार होते. नातवंडापतवंडात रमणार होते.

बापूराव शेठ —

' हा बेटा रमणिकभाई मोठा साखरेच्या जिभेचा आहे. बापूरावसारख्या वैराग्याला ' शेठ ' म्हणतो.

' बोलो भाई—ये लो गल्ला — '

' त्यांनी चिल्लर त्याच्या पुढ्यात ओतली.

' बस्. इतनाहि ? '

' बापूराव त्याच्या त्या उद्गारानं दचकले.'

' मैने पैसा खाया नही—'

' नहीं जी वैसा नहीं. लेकिन—बिक्री बंद होगई. '

' हां—'

' चालु रहेने दो. बारा बजे तक—'

' पण— '

' ते आपल्याला ठाऊक नाही. खर्च निघायला हवा. किमान दहा रुपये तरी जमा व्हायला हवे—'

' त्यासाठी मी दारोदार हिंडू —

' ते मला माहित नाही— तुमच्याकडून होत नसलं तर मला सांगा. मिनिटांत २० रुपये उभे करतो. तो इसाक भाई घ्यायला तयार आहे— '

' तो त्याची ताडी करील— '

' करेना का आपल्याला पैसा हवाय— '

' पण रमणीकभाई—आश्रम पैसा मिळवायला काढला नाही—अरे काही तत्व— '

' गेली खड्डयात. बोलायला सोपं असतं. आश्रम तत्वांवर नाही चालत. बापूराव— '

तो निघून गेला. बापूराव सुन्न झाले. हेच वाक्य ते आयुष्यभर ऐकत आले. अनेक संदर्भात. त्यांनी त्याकडे लक्ष दिलं नव्हतं. पण हा भाई धमकी देऊन गेला. कदाचित नोकरी जाईल. पण त्यासाठी तत्वाचा बळी. अरे असंच वागायचं असतं, तर ह्या चक्रात कशाला गुरफटलो असतो. आनंदानं नोकरी केली असती. एखादं ' पितृछाया ', ' मातृछाया ', ' विश्राम ' नावाचं घर बांधलं असतं. इतक्या मोठमोठ्यांच्या ओळखी आहेत. पैसा खोऱ्यानं कमवला असता.

बापूराव मोठमोठ्यानं पुटपुटत होते. पण त्यांचंच त्यांच्या लक्षात आलं की त्यात दम नाही, उत्साह नाही. पाय दुबळे झाले आहेत. त्यांच्या आयुष्यातलं सारं समाधान ओरबाडून टाकल्यासारखं झालं. भांडण्यात अर्थ नाही, त्यांचं कुणी ऐकणार नाही ह्याची जाणीव असूनही त्यांनी भांडायचं ठरवलं. त्यांना त्या जिद्दीनं झपाटलं. आणि ते त्याच तंद्रीत सुरजमल थापांच्या घराकडे, उन्हातान्हात अनवाणी निघाले—

त्यांनी आयुष्यभर ज्या ज्या गोष्टीवर श्रद्धा ठेवली होती त्या साऱ्यांचं विभत्स रूप त्यांना पाहावं लागलं. सहन होऊ नयें इतकं भयानक. त्यांनी त्याही बाबतीत तडजोड केली आणि स्वतःला अलिप्त ठेवलं. हा आश्रम मुलं पाळावी तसा त्यांनी पाळला. कुठलीही अभिलाषा मनात न बाळगता. पोटापुरता पैसा घेऊन ते खपले. बापूंचे, विनोबांचे पवित्र पाय लागून इथला कण न् कण पवित्र झालाय. त्या समाधानावर ते आजपर्यंत जगले. आणि आता सुरजमल म्हणतो निरा विकायची. दारूसाठी. मग आश्रमाला काडी लावलेली काय वाईट ?

उन्हामुळे त्यांच्या घशाला शोष पडत होता आणि त्यांच्या मनातली चीड उसळत होती. ह्या क्षणी जर सुरजमल समोर असता तर जन्मभर अहिंसक राहिलेल्या बापूरावानं त्याच्या गालांवर प्रहार केला असता.

बापूराव बंगल्यावर पोहोचले अन् थबकले. ते अनेक वेळ या आधी आले होते. पण त्यांना परकेपणा वाटला नाही. पण आता ऐसपैस आवार; छोटासा बगीचा; आणि समोर उभ्या असलेल्या रंगीबेरंगी मोटारी पाहून ते दचकले. सुरजमल फार मोठा होता. त्यांच्या खांद्याला खांदा लाऊन तुरुंगात आलेला सूरजमल हा नव्हता. हे सारं हवं म्हणून तो त्यांना निरा विकायला सांगत होता. दहा वीस रुपड्यांची मदत तो सहज करू शकला असता. पण मग अधिक पैसा कुठून आला असता ?

एकदा परत जावं असं बापूरावांना वाटलं संध्याकाळी बोलता येईल. पण मग एवढ्या उन्हात पुन्हा परत जाणंही त्यांच्या जिवावर आलं. ते तसेच आत शिरले.

हिरवट रंगाचा हॉल. आजुबाजुला बिछायत, लोड. मधे तक्क, भिंतीवर तसबिरी. गांधी, नेहरू

आदिंच्या. त्यांना सुतांचे हार. आणि खादीच्या कपड्यातली शुभ्र मंडळी. बापूरावांनी आपल्या कपड्यांकडे पाहिलं. धोतर मांडीवर फाटलं होतं. कॉलर उसवली होती. दाढी वाढलेली, आत शिरता शिरता त्यांचा विचार पुन्हा पुन्हा बदलत होता.

पण सुरजमलनं त्यांना स्वतः हाताला धरून आत आणलं. मानानं बसवलं. बापूराव क्षणभर गांगरले. पण सुरजमलच्या ह्या वागण्यात साऱ्यांना त्यांच्याबद्दल आदर वाटला. त्यांना जवळ बसवून त्यांची साऱ्यांची ओळख करून दिली. बापूराव त्यांना ओळखत नव्हते. नवीन पिढीच्या पिढी राजकारणात आली होती.

बापूराव भांडायला आले होते. पण त्यांचे शब्दच सरबतावरोबर थंड झाले. त्यांना तिथं बसणं भयंकर कंटाळवाणं होत होतं. तिथं ज्या गप्पा चालल्या होत्या त्या त्यांना कळत नव्हत्या. थोडयाशा त्यागाच्या भांडवलावर व्यवस्थित धंदा उभा होता. आणि अख्खे आयुष्य उधळूनही, त्यांना पोटापुरतं मिळत नव्हतं.

" देखिये राजेंद्रसिंहजी आप दिल्ली जायेंगे तो बापूरावजीकी केस देखना. स्वातंत्र्य सैनिक हैं. इनका पेन्शन मिलनेको होना. अरे भाई. झुटमुठ वताके लोक पैसे लेते. ये तो सच्छे हैं. मैं था इनके साथ. "

राजेंद्रसिंहजीचं तिकडे लक्ष नव्हतं. ते शेजारच्या. पी. रामय्या बरोबर दिल्लीच्या राजकारणाच्या गोष्टी करत होते. बापूरावांना खूप भूक लागल्याची जाणीव आली. ते सुरजमलला म्हणाले.

' मैं चलता हूं; खाना होने का है. '

' कैसे आये थे. '

' शामको मिलूंगा. '

' बैठिये खाना खाके जाईये. '

' नहीं नहीं. '

' आपभी बहुत शरमिले है. खाना खाईये. मुझे आपसे कुछ बात करना है. '

बापूरावांचा भिडस्त स्वभाव पुन्हा आडवा आला. वास्तविक सुरजमलच्या पंगतीला असणं हा इतरांच्या दृष्टीनं बहुमान होता. पण बापूराव थांबले ते त्यांना नाही म्हणणं जमलं नाही म्हणून.

त्यादिवशी बापूराव जेवले. मन लाऊन जेवले. बऱ्याच दिवसात त्यांना असं चविष्ट जेवण मिळालं नव्हतं. जेवणानंतर ते लवंडले. त्यांचा डोळा लागला. थकलेल्या शरिरानं त्यांना अनोखा आनंद मिळवून दिला. एक तृप्त झोप. कुठल्याही तत्त्वापेक्षा अधिक सुखदायी.

बापूराव उठले. ते मनावरचं ओझं झटकीत. आज काय तो सोक्षमोक्ष लावायचा. आज निरा विकल्या गेली तर मग त्याला पुढं आळा घालणं कठीण जाईल.

सुरजमल देखील ताजातवाना दिसत होता.

' मला काही बोलायचं आहे — '

' बोलो. फिर हम भी बोलता हैं — '

' ती निरा विक्री — '

' अरे तुमची इच्छा नसेल तर बंद करू... आम्हाला काय ? आश्रम तोटयात चालू नये ही इच्छा. '

' मी आपला अतिशय ऋणी — '

' अरे छोडो. अब तुम हमारा काम करो.

' होण्यासारखं असेल तर — '

' आहे आहे. आम्ही न होण्यासारखं काम कधी सांगतच नाही — तुम्हारा छोकरा — क्या नाम. '

' विश्वास. '

' हं. तर त्याला आमच्या फर्ममधे नोकरीला लावायचं आहे — '

' पण त्याचं शिक्षण — '

' शिकून तरी काय करणार ? शेवटी पैसाच मिळवेल नं. '

' अं हो. पण मी विचारतो त्याला — '

' विचारायचं काय ? तो आधीच धंदा करतो आहे. '

' नाही — '

' हां. हां. विचार हवं तर. हजारीमल पंजाब्याकडे तेच काम माझ्याकडे कर म्हणावं. डबल पगार देईन. '

' नाही नाही. त्यानं शिकायला हवं. '

' त्याची इच्छा असली तरी तो शिकणार नाही आता — '

' कारण — '

' केव्हाही जेलमधे जाईल. '

'मला नाही समजलं.'

'पोराला विचार.'

बापूराव सुन्न मनानं निघाले 'विश्वास चोरी करतो. नाही. नाही. माझं रक्त त्याच्या नसांत आहे. तो असं करणार नाही. मी कधी हरामाच्या पैशाला शिवलो नाही.'

रात्री खूप उशीरा विश्वास आला. बापूराव जागेच होते. पण त्यांना त्याला काहीच विचारायची हिंमत झाली नाही. स्वतः छडा लावल्याशिवाय त्याला काही बोलायचं नाही. बिथरायचा. कोवळं वय आहे. संतापी स्वभाव.

एरवी भल्या पहाटे निघून जाणारे बापूराव आज थांबले. त्यांनी विश्वासबरोबर चहा घेतला.

काय विश्वास काय म्हणतं कॉलेज—

'अं. चाललंय्. पुढच्या महिन्यात टर्मिनल आहे. रात्री मित्रांकडे जाईन म्हणतो काका अभ्यासाला.'

बापूरावांनी त्याच्या डोळ्यांकडे रोखून पाहिलं. एवढीशी देखील चलबिचल दिसली नाही. सुरजमल खोटं बोलला असावा. असते एकाएकाची विनोद करायची तऱ्हा.

त्यांना खूप समाधान झालं. खूप आनंद. इथे तरी दैवानं धोका दिला नव्हता. त्यांना धैर्य आलं. शेवट-पर्यंत निरा ताडी म्हणून विकल्या जाणार नाही. ह्यासाठी भांडायचा त्यांनी निश्चय केला. विश्वास असल्यावर काय फिकीर.

पहिला आवेग ओसरल्यावर मात्र त्यांना वाटलं. खात्री करावी. त्यांनी हजारीमलच्या दुकानावर जायचं ठरवलं.

त्याच्या कॉलेजच्या वेळी ते निघाले. आधी कॉलेजात गेले. गेले चार महिने तो कॉलेजात आलाच नव्हता. त्यांना पोटात दुखल्यासारखं झालं. डोकं गरगरलं. ते तडक पायी दुकानाकडे निघाले. खिशात फक्त चार आणे उरले होते.

त्यांची विश्वासची भेट रस्त्यावरच झाली.

'काका तुम्ही?'

'हां कसे काय आलात—'

'आधी तू बोल. हजारीमलकडे कशाला आलास? चोरटी घड्याळं ट्रँझिस्टर्स विकायला, की दारूच्या बाटल्या पोचवायला."

'तुम्ही म्हणता ते सारं करायला.'

'लाज नाही वाटत. उद्या जेलमधे जाशील.'

'जाईन. त्यात काय वाईट—तुम्ही नाही गेले.'

'बेशरम.'

'तुम्ही खोटया तत्त्वाला बळी पडून गेलात. मींही तसाच जाईन. मार्ग वेगळे असले तरी परिणाम एकच आहे. तुम्ही जेलमधे गेला मी भोगलं. मी जाईन तुम्ही भोगा.'

विश्वास थंडपणे बोलत होता. बापूराव शहारत होते.

त्यांच्या निर्लोभ, त्यागी, आयुष्याला अशी फळं आली होती. त्यांनी काय केलं होतं, काहीच नाही. जोपासला फक्त स्वतःचा अहंकार. तत्त्व आणि समाधान.

त्यालाही आज तडे गेलेत.

बापूरावांनी त्याला तसाच सोडला. एक शब्दही न बोलता घरी आले.

शांताबाईंना आवडे म्हणून त्यांनी वेणी आणली. अगदी आयुष्यात पहिल्यांदा.

शांताबाईंना कळेना—हे असं अघटित कसं घडलं. त्या म्हणाल्या—

कशाला केलेत चार आणे खर्च. त्यापेक्षा बसनी यायला हवं. आता पायी चालणं सोसवणार नाही.

'अग बसनंच आलो. फक्त तिकिट काढणं चुकवलं. हळूच उतरलो. जगासारखं बदलायला हवं आता.'

बापूरावांच्या चेहऱ्यावरचे भयानक भाव पाहून शांताबाई घाबरल्या. गेल्या ३० वर्षांत त्यांनी त्यांना असे त्रस्त, गोंधळलेले पाहिले नव्हते.

निरागस पूर्तता

—दिनकर नीलकंठ देशपांडे

'टॉलस्टॉय'

आपणा सर्वांना सुपरिचित आहे—जगाच्या एका गहन प्रश्नाचं त्यानं उत्तर दिलं आहे—

"माणसाला किती जमीन लागते?"

चार हात!

पाश्च्यात्यांना इतकी जमीन लागते पण आम्हा हिन्दूंना जमीनच लागत नाही!

आमच्या धर्माचा, संस्कृतीचा त्याला मागोवा घेता आला नसावा—

सुईच्या अग्रावर मावेल एवढी जमीन सुद्धा पांडवांना देणार देणार नाही अशी दुर्योधनी किमया तुम्ही आम्ही आत्मसात केली आहे—

आजन्म व्रतस्थ असलेल्या धर्माला युद्धासाठी प्रवृत्त व्हावं लागलं.

हे युद्ध जमिनीचं होतं की नीतीचं?

'नी ती चं!'

—नीतीच्या युद्धात शस्त्रहीनांचा वध कां होतो? एक शंका.

मांगल्याची विटंबना का होते? शंका दुसरी.

आत्म–स्वजन–गुरु–बंधु यांचा वध कां होतो?···

मानवाच्या अंगातील आसुरी शक्ती नीतीच्या बुरख्याखाली थैमान घालते म्हणून की ··

—माणसाचा 'अहं' दुखावल्या जातो म्हणून, 'नीतीचा शिखंडी समोर उभी करून माणूस भीष्म—मूल्यांचा कां नाश करतो?'

सुखाची कुठली लालसा त्याला असं करायला उद्युक्त करते. भाग पाडते.

एवढा संहार करून पांडवांनी काय मिळविलं? जमीन, नीती की राज्य!!!

या प्रश्नांच्या मेरुपुढे आज आपण उभे आहोत—

प्रत्येकाच्या मनःकोपांत याची नानाविध उत्तरं आहेत—असू शकतात!

गीता म्हणते—

'शठं···शाठ्यम्'

शस्त्रानेच शस्त्राचा प्रतिकार होतो काय?

बुद्ध, गांधी, येशु यांनी काय केलं···

मलाही माहित नाही···पण एक कहाणी आठवली ती सांगतो···लिहितो···कदाचित त्या कहाणीच्या अंतरंगात···या प्रश्नांची पाखरं झोपली असतील···

एक काळसर्प असतो···होता. त्याचा मुख्य धंदा दंश करण्याचा. फार चांगला जम बसला होता धंद्यात त्याचा! अनेकांना त्याने यमसदनाची वाट दाखविली. पण त्याला ठार करण्याची कल्पना कुणालाच रास्त वाटत नव्हती.

कारण···तो ईश्वराचा प्रेषित असा समज साऱ्यांनी 'गैर' करून घेतला होता.

त्याला मारणे म्हणजे प्रत्यक्ष ईशाची हत्या! म्हणून लोक त्याला दूध घालीत··· नैवेद्याच्या रूपानं! सर्पराज समजदार होता. तो पिणाऱ्या गोरसाचं विष बनवीत होता!

एकदा हा साप भक्ष्यशोधार्थ फिरत असता एका घरात आला. एक तान्हुला समोर पडलेल्या खेळाशी खेळत होता. सापाला वाटलं,

भक्ष छान आहे. तो त्या बालकाच्या दिशेनं झेपावला.

निरागस बालकानं खेळातील वस्तू समजून त्या सापाचं तोंड धरलं. तो गार स्पर्श त्या मुलाला मोठा सुखद वाटला. अवचित गवसलेली इतकी सुन्दर वस्तू आपल्या हातून निसटून जाऊ नये म्हणून त्याने ती घट्ट धरून ठेवली. सारी ताकद आपल्या चिमुकल्या मुठीत एकवटली.

साप सुटण्यासाठी धडपडू लागला. मुलाची पकड घट्ट होत होती. वस्तू हरवू नये म्हणून ! सापाचा मृत्यू होईतो हा खेळ चालला. मुलालाही काही वेळानं या अचेतन वस्तूशी खेळण्याचा कंटाळा आला. खेळून खेळून श्रमलेला तो मुलगा आपल्या आईकडे हसत हसत निघून गेला.

निर्विकार···निरागसता !

सापाचा मृत्यू यातूनच झाला···

माणसाची ही निरागसता पुढे कां टिकत नाही ?

"बाह्य जगाचं अधिक ज्ञान झाल्यामुळे असं होतं की, माणसातील ही निरागसता गळून पडलेली असते ? पतझडीत वृक्षासारखी !"

···मला वाटतं ही निरागसता आपल्यातच असते.

माझ्या जवळ खूप–पुष्कळ अशा जुन्या वस्तूंचा संचय आहे. त्यांतील बहुतांश निरोपयोगी आहेत··· पण त्यांतील निरुपयोगी वस्तूची गरज केव्हा केव्हा मला फार भासायला लागते. फुरसतीच्या वेळी मी अशा वस्तू शोधीत बसतो. एखादी अत्यावश्यक वस्तूही मला अशा वेळी सापडते. इतके दिवस मी तिची कां उपेक्षा केली याचा मला उलगडा होत नाही. साफसुफ करून मी ती उपयोगात घेतो––

या अनुभवातून एखादी युक्ती तुम्हाला सुचते का ते पहा···थोडा बुद्धीला ताण द्या···

कल्पना करा···फक्त कल्पना···!

आपलं शरीर अनेक अनावश्यक वाटलेल्या गोष्टींच्या साठ्यांचं कोठार आहे––

चला···सहज चाळा म्हणून यातील काही वस्तू आपण शोधू या.

बदामी खुणेचं कपाट उघडा !

सारं चित्त एकाग्र करून गरुडनजरेनं वेध घ्या–

ती पहा एक वस्तू. कोपऱ्याच्या कडेला पडलेली आहे. मुटकुळं मारून···उचला. साफ करा. काय दिसलं ? काय सापडलं ? काय हाती आलं ? एक अणुवस्तू ! असू द्या···तेवढीच···बाकी अनावश्यक वस्तू–दुर्लक्षा !

आता हा अणू मोठा आकार घेईल. त्याला खतपाणी घाला. जोपासा प्रचंड वृक्षाचं सामर्थ्य त्यात उत्पन्न करा.

बुद्ध–येशूला मी पाहिलं नाही––
गांधीजींना मी पाहिलं दोनदा !
तुम्ही पाहिलं ? आठवतं ?
नसेल तर त्यांचे चित्र पहा––
–गंभीर मुद्रेच्या चित्रातील गांधी मला दाखवा.
इतकी चित्रं––पण एकही गंभीर नाही––
नसू द्या !
निर्व्याज हास्याचं ते चित्र पहा––
पाहिलं––
बस्स अगदी असेच हसायचे बापू––
केवढं सामर्थ्य होतं त्या हास्यात––
आणि या हास्यसामर्थ्याचा उगम कशात होता ?
खोल शिरा. पहा––
तोच अणू···
निरागसतेचा !
बापूंनी तो जोपासला, वाढवला.
––कृतांत काळाला हास्य हरवितं.

पण ते हास्य निरागस असावं. भावना पवित्र असावी. सापाचा जीव घेणाऱ्या त्या मुलाइतकी निष्पाप !

द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा प्रसंग पहा––

सारी सभ्यता जिथे रडायला लागली होती ती अवस्था आठवा––

तो नीतिमानांचा, सुजनांचा, सभ्यांचा कौरव दरबार डोळ्यांपुढे आणा––

एकवस्त्रा स्त्रीची दारुण विटंबना तिचे पती डोळयांनी पहात होते. दुर्योधनानं भर सभेत आपली मांडी उघडी केली. किती अधःपात···होता मानवी बुद्धीचा !

शौर्याला आव्हान होतं—

पांडवांच्या पायाची आग मस्तकात भिणभिणली होती.

—भीम हाताच्या मुठी आवळत होता.

—अर्जुनाचा हात धनुष्याकडे गेला.

—नकुल–सहदेव रागानं थरारत होते.

आणि धर्मराज ?

एखाद्या निरागस बालकासारखा भासत होता. साप पकडणाऱ्या बालकाप्रमाणे. हुबेहुब तोच !

धर्माच्या या स्थितीचा कौरवांवर काही परिणाम झाला काय ?

नाही !

धर्माला युद्ध टाळता आलं नाही.

उपप्रश्न मनात येतो, धर्माची निरागसता संशयास्पद तर नव्हती ना ?

आपल्या पत्नीची विटंबना प्रत्यक्ष डोळयाने पाहणारा धर्मराज युद्ध टाळू शकला नाही···अनेक आप्तांचा संहार··हाच संहार भर दरबारात केला असता तर···'संयमा'ला काही आधार उरला नसता···!

—पण या संयमातून एक तत्त्व जन्मले.

पांडव जमिनीसाठी भांडले नाहीत.

'राज्य', 'जमीन' हा त्यांचा हेतू नव्हता.

'नीती' त्यांना जोपासायची होती. पण त्या यज्ञात अनेक नीतिमानांना मातीमोल व्हावं लागलं ! जगात चांगलं सिद्ध करायला ते सांगणाऱ्याला मरावं लागतं—

गांधी, येशू, कृष्ण, सॉक्रेटिस———???

शेवट कारुण्यपूर्ण···ओथंबलेला...

पण जगाच्या हाती केवढा अमृतकुंभ दिला. हे अमृत असूनही पचायला कठीण···कारण पचलं नाही तर त्याचं रूपांतर विषात होतं—

अमृतात विष असतं.

अन्

विषात अमृत असतं—

—फक्त ते पारखण्याची नि पचवण्याची ताकद हवी ! आपण त्याच्या वाटेस जाऊ नये. नाही तर आपणास मरण निश्चित येईल. तसं ते प्रत्येकाला निश्चित आहेच—

—कुणा चार खांद्याला आपलं ओझं वाहून न्यावं लागेल ?

ते कलेवर ठेवायला जमीन लागेल.

टॉलस्टॉयने सांगितल्याप्रमाणे चार हात—

पण मला तीही नको.

कारण ?

मला माझ्या मृत्यूबरोबर 'मी' 'मी' म्हणणारं माझं शरीर नष्ट करून टाकायचं आहे.

अचेतन प्राणहीन मांसल देहाची राख !

ती पाण्यात टाकून नदीचं पाणी खराब करू नका.

ती अशीच वाऱ्यावर उडवून टाका !

पण थांबा. तसं करू नका. वातावरण दूषित होईल.

—एखाद्या झाडाखाली ती गाडून टाका. बिचाऱ्या उपाशी झाडाला तेवढंच खत मिळेल.

आणि मलाही माझ्या जीवनाचं सार्थक झाल्याचं समाधान लाभेल.

टॉलस्टॉय म्हणतो—तेवढी जमीन मला नको—मला हवाय एखाद्या झाडाखालील वीतभर खळगा—

इच्छा माझी.

पूर्तता तुमच्या हाती···

शुभास्ते पंथानम्···!!!

श कू

(एकांकिका)

—प्रभाकर पुराणिक

[एका सर्वसामान्य माणसाच्या घरातील खोली. तिथं आलमारी. घडी करून आडवा ठेवलेला पलंग. एक तिपाई. त्यावर गाद्या व्यवस्थित रचून ठेवलेल्या. एक दोन मोडक्या खुर्च्या आणि इतर सामान आवश्यकतेप्रमाणे मांडलेले.

पडदा वर जातो तेव्हा बावीस तेवीस वर्षे वयाची, खुरटलेल्या बांध्याची एक मुलगी ती भली मोठी आलमारी हलविण्याचा प्रयत्न करीत असते. तिच्या डाव्या अंगावरून वारे गेल्यामुळे डावा पाय आणि डावा हात किंचित अधू असतो. तिच्या चेहऱ्याकडे अगदी बारकाईने बघितल्यास डावा डोळा किंचित बारीक असल्याचे दिसते. घरकाम करताना तिच्या अंगात अधिक बळ येतं. विशेषत: घरात काही प्रसंग असला तर तिचा उत्साह अधिक दुणावतो. स्वभावाने आक्रमक.

सध्या ती काम करीत असते आणि डाव्या हाताचा तळवा सरळ होण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने एक कृत्रिम लाकडी पंजा बांधलेला असतो. त्यामुळे तिला कामे करणं जमत नाही. तेव्हा आता ती तो पंजा काढून ठेवते. पुन्हा आलमारी ढकलू लगाते. तितक्यात तिचा भाऊ तिथं येतो.]

नाना० : शकू, अग काय करतेस हे ?

शकू० : तूं बोलू नकोस नाना. वाटलं तर इथं उभा रहा. आणि बघ मी काय करते ते.

नाना० : घरात माणसं नाहीत का असली कामं करायला ?

शकू० : आहेत.

नाना० : मग.

शकू० मी पण त्यांतलीच आहे. घरातली. माणसांतली.

नाना० माझं ऐकत जा जरा. (तिथं काढून ठेवलेला पंजा हातात घेऊन) हे घे. हाताला बांधून ठेवत जा. डॉक्टरांनी सांगितलं तुला. बांध वरं. आणि असली कामं तू नको करीत जाऊ.

शकू० कां नको करीत जाऊ ?

नाना० : एकट्याचं काम आहे का हे. एवढी उचलसाचल कशाला करायची ? कुणाला बोलवायचं तर खरं.

शकू० घरातले सगळे लोक कामात गुंतले आहेत. आणि मला वाटतं मी करणार.

नाना० : पण एवढा खटाटोप कशाला हवाय. जे आहे ते ठीक आहे.

शकू० : तसं नाही वरं. मुळीच नाही. मी मुळीच ऐकणार नाही. परकी माणसं घरात यायची म्हणजे घर चांगलं नको दिसायला ?

नाना० शकू—मी आता रागावेन वरं तुला.

शकू० : रागाव नं काही हरकत नाही.

नाना० (एकदम भडकून) शकू—शकू तू आणखी घंटाभर (शान्त होत) शकूबाई आता आपल्याला लवकर नको का आवरायंला हे सगळं.

शकू० : किती लवकर आवरून देऊ. बोल.

नाना० : अहो—अहो, ऐका. इकडे या वरं जरा. राहू द्या तुमचं सगळं. अहो, आता फक्त पाऊण तास उरलाय.

[बाहेरच्या खोलीतून एक सतरा अठरा वर्षांचा मुलगा येतो. शरद त्याचं नाव.]

शरद० : नाना, शेजारचे गांगोली बाबू लवकर आलेत ऑफिसातून. त्यांची सायकल मागून घेऊन जातो.

नाना० : कुठे ?

शरद० : देऊस्करांकडे.

नाना० : अं–हूं. थांब. अगं इकडे येते का–

[घरातून २७-२८ वर्षांची बाई येते.]

–शरदला पाठवू का देऊस्करांच्याकडे ?

विमल वहिनी० पाठवा.

नाना० : अरे पाठवा काय. मला वाटतं त्यांना उद्या या म्हणून निरोप सांगायला हवा.

विमल० : शरद भावजी, आणखी दहा मिनिटानं जा बोलवायला.

[शरद जातो.]

नाना० दहा मिनिटानं काय. दहा तासानं जरी. गेला तरी जे व्हायचं तेच होईल अखेर.

विमल० असं चिडायला काय झालं एवढं.

नाना० : काय झालं म्हणजे ? ही काय व्यवस्था तुमची ? त्यांना बोलावून काय इथं वसवायचं. या उकीरडयात.

शकू०: त्या बाबतीत तू बोलू नकोस नाना. मी करतेय सगळी व्यवस्था. ती एकदा माझ्यावर सोपवली आहे नं. मग काळजी नको करू. बिलकूल काळजी करायची नाही. आता फक्त एकच खुर्ची कमी पडतेय. शरद–ए–शरद–शर ऽऽद. (शरद येतो.) शऱ्या, शेजारच्या नेरकरांकडून एक खुर्ची घेऊन ये. आणि हे बघ, खालच्या दिवाणांकडे एक नक्षीचा स्टूल आहे. तो पण घेऊन ये. आधी खुर्ची घेऊन ये. नंतर स्टूल. दोन्ही एकदम नको आणू. पडशील जिन्यातून. तू माझं ऐक नाना. या आलमारी-समोरच्या बसकणावर तू बैस.

नाना० आणि आलमारीतून कपबशा काढाव्या लागल्या तर ?

शकू० : त्या मी आधीच काढून ठेवल्या आहेत.

नाना० (विमलला) अग तू काय उभी. चल आत जा. तू आत जा. लवकर आटप. (ती जाते.) शकू, काय करायचं ते लवकर कर बरं. (नाना जाऊ लागतो.)

शकू० : थांब नाना. पूर्ण ऐकून घे. हे बघ. नेरकरां-कडून आणलेल्या खुर्चीवर पाहुणे बसतील. इथं ते बसतील–इथं या स्टुलावर आपली हेमा बसेल.

नाना० : नाही. ही खुर्ची स्टुलाच्या अगदी समोर पाहिजे.

शकू० : पण मी म्हणते.

नाना० : मी सांगतो तसं ऐक बरं आता.

शकू० : अरे पण खुर्ची इथं असली म्हणून—

नाना० (जास्त चिडून) जास्त चर्चा नको. (सौम्य-पणे) शकू ऽऽ. किती कमी वेळ उरलाय बरं आता.

शकू० : आता आले पाहुणे तरी हरकत नाही.

नाना० (आत डोकावून) का ग दूध आणलंय काय ?

[आतून होकार येतो.]

शकू० : मीच आणलं मघा. अन्तू गवळ्याकडून.

नाना० (आत) हे बघ. जास्त काही करावयाच्या भानगडीत पडू नकोस. (शकूला) शकू–जरा आणखी एकदा कुंचा फिरवून घे.

शकू० : थांब. मला इथं फोटो लावायचे आहेत.

नाना० : कुणाचे ?

शकू० : आईबाबांचे.

नाना० : अग पण..

शकू० : त्यांना बघायला मिळाला पाहिजे त्यांचा होणारा जावई —

नाना० : अं – हूं – ओ एस. शके; शहाण्यासारखं बोललीस.

शकू० : मग मी वेडीबिडी आहे की काय ?

नाना० : नाही. नाही. माझी बहीण वेडी कशी असेल ? शके, बरं झालं तू मला आपल्या बाबांची आठवण करून दिलीस.

शकू० (अगदी फटकळपणे) श्राद्ध करीत जा त्यांचं, म्हणजे आठवण राहात जाईल.

नाना० (अनपेक्षित उत्तरानं गोंधळून) शके, लहान तोंडी मोठा घास शोभत नाही. काम कर आपलं. चल आटप.

शकू० : पण माझ्या मनाप्रमाणे झालं पाहिजे बरं का सगळं.

नाना० : असं कर. तू तुझ्याच मनानं कर. पण लवकर.

शकू० : हा शऱ्या मेला तिकडे. नेरकरांच्या विशाशी क्रिकेट खेळत बसला असेल; मीच जाऊन येते. (जाऊ लागते.) खुर्ची आणते मी.

नाना० : थांब शके, तू जाऊ नकोस. तू आपलं स्वतः-चच कर. साडी बिडी बदल. ती वहिनीची साडी नेस.

शकू० : वारे वा. वहिनीची साडी मी कशाला नेसू ? मला काय साड्या नाहीत ? मी काय भिकारी आहे दुसऱ्यांच्या साड्या नेसायला, की माझा भाऊ मला आणून देत नाही. की त्याला ऐपत नाही मला साडी घेऊन द्यायची ?

नाना० : शके, तुझ्यापुढे अगदी हात जोडतो. आता–काय—म्हणजे—काय—

शकू० : काही नाही. गोंधळायचं मुळीच काम नाही. तू चांगले कपडे घालून तयार हो. मी या कपा-टातल्या वरच्या खणात कपडे काढून ठेवले आहेत. काढ वघू.

[नाना कपाटातून कपडे काढतो.]

नाना० : हा कोट घालू मी ? अग किती उकडतंय. घामाच्या धारा वाहतील हा कोट घातला तर.

शकू० : अरे पण चांगला दिसतो की नाही तुला.

नाना० : अग हो पण—उकडून अंगाची सालं निघायची (आत) ए ऽ अग ए ऽऽऽ (विमल आतूनच.—-काय गोंधळ लावलाय मघापासून).

नाना० : जरा बाहेर येते का ?

[विमल आतून—मला सध्या वेळ नाही.]

शकू० : वहिनी ऽ. इकडे ये जरा. (विमल येते.)

विमल० : अहो काय चालवलंय मघापासून. नुस्ती चर्चा चाललीय. नुस्ता बोलवडा. अशानं काम नाही होत.

नाना० : हे बघ. देउस्करांबरोबर कुणी बाया माणसं आली तर त्यांना आत बसायला व्यवस्था करून ठेव.

शकू० : वहिनी तू ही चटणी कलरची साडी नेस.

नाना० : हेमाला म्हणा. तू चहा वगैरे करायच्या भानगडीत पडू नकोस. तू आपली तयारीला लाग.

शकू० : तुझ्यासाठी वॅकवटनचं ब्लाउज मघा मी इस्तरी करून ठेवलं आहे.

नाना० मी नेरकरकाकाला सुद्धा बोलावलं आहे. आजच्या प्रसंगाला. नाही तर आपल्याला काय ते प्रोसिजर ठाउक नाही.

शकू० : वहिनी, एक वेणी घालणार की चक्कर ?

नाना० : हेमा कुठे आहे ?

विमल० : तिकडे.

शकू० : चक्कर घालणार असलीस तर डोनेट काढून देते.

[हे सगळे विसंवादी संवाद चाललेले असतात आणि विमल कशीतरी उत्तरे देत असते. आपण काय बोलतो हे तिचं तिलाच समजत नाही.]

शकू० (पुन्हा मूळपदावर) काय मग चटणी कलरची साडी नेसणार नं ?

विमल० : अहो एवढी चांगली साडी नेसून का चुली-जवळ बसू ?

शकू० : नेसणार की नाही ?

विमल० (त्राग्यानं.) नाही.

[शकूचा संताप अनावर होतो. झालेल्या संभाषणकाळात तिने कपाटातून काढलेली एक कपबशी तिच्या हातात असते. ती कपबशी जमिनीवर धाडकन आपटते.]

शकू० : जा मेलं. जन्मात कुणी माझं ऐकू नका. ऐकलं तर एखाद्याला पाप लागेल. नानाला म्हटलं हे कपडे घाल तर त्याला उकडायला लागलं. तुला म्हटलं तर फटकारून दिलं मला. आम्ही एवढं मर मर मरा. पण आमच्या हौसेप्रमाणं काहीच नाही. आम्हाला काही किंमतच नाही.

[मुळमुळू रडू लागते.]

नाना० : जाऊ दे ग. काय एवढी पत्रास ठेवायची, तिला सवयच आहे असा तमाशा करायची.

विमल० : तुम्ही तरी चुप बसा आता.

शकू० (उसळून) सगळेच मला मारायला उठलेत. घ्या, घेऊन टाका जीव माझा.

विमल० : नाही. नाही. असं रागवायचं नाही, आता हेमा वन्संच लग्न होणार, त्या सासरी जाणार, मग झडझडून काम करायचं की असं रागावून बसायचं वरं ? काय ? असं रागवायचं नाही गडे. नाही, असं नाही करायचं. ऐकलं का, असं नाही करायचं.

शकू० (एकदम बालिशपणे) मग तू नाव घे नानाचं.

विमल० : आता पुरे झाला वात्रटपणा.

शकू० : नाही तुला घेतलंच पाहिजे. नाव घ्यायलाच हवं तुला.

विमल० : इश्श ! तुम्ही का लहान आहात ?

[शकू रागानं उठते आणि कपबशांचे तुकडे गोळा करू लागते ?]

विमल० : शकू वन्सं वसा. वसा वरं इथं. हं ऐका — (नानाकडे वघून) तुम्ही जरा वाहेर जा वरं. (नानाचं याकडे मुळीच लक्ष नाही. तो आपल्याच विचारात आहे. मग विमल कसंबसं नाव घेते. शेवटी शकू हसते, विमल हसते आणि वातावरण एकदम मोकळं होतं.)

शकू० (एकदम स्फुरल्यासारखं) शन्या, ए ऽऽ शन्या ऽऽऽ

विमल० : अहो ते बोलवायला गेले असतील देऊस्करांकडे.

शकू० : अखेर मेल्यानं खुर्ची आणलीच नाही. मीच जाते.

नाना० तू नको जाऊ. मीच आणतो खुर्ची.

शकू० (दारावाहेर गेल्यावर) नको नको. हे वघ मी आणलीच.

[निघून जाते.]

विमल० आणि हे वघा, तुम्ही जरा आपलं डोकं शान्त ठेवा वरं.

नाना० : म्हणजे सगळा दोष माझाच. मीच चिडतो. रागावतो. अरे हे चाललंय काय ? सगळा तमाशा.

विमल० : अं ऽऽऽ. आता तुमच्याही अंगात यायला लागलं.

नाना० (शान्त होत.) अग पण मी काय राक्षस आहे का ?

विमल० : तसं नाही हो. पण आता विनाकारण कुणाला टाकून बोलू नका वरे.

नाना० विनाकारण कुणाला कशाला मी टाकून बोलू ?

विमल० पण शब्दांनी शब्द कशाला वाढवायचा.

नाना० : हे वघ, शकुचं मन मोडेल असं मी बोलतो तरी का कधी ? आजपर्यंत बोलतो आहे का ?

विमल० : घरातलं कुणीच बोलत नाही. आणि बोलू नये.

नाना० : अग हो–पण काही वेळप्रसंग—

विमल० हे वघा जे आहे ते असं आहे आणि ते खरं आहे. लपवून काय ठेवायचं त्यात.

नाना० : लपवून ठेवायचं नसतं तरी आपणच आपलं सोंग दाखवत सुटायचं का ? हे वघ, मी तर अगदी गोंधळून गेलो आहे. का ग, हेमा कुठं दिसली नाही.

विमल० : असतील मागच्या गॅलरीत.

नाना० : हेमा ऽऽ ए हेमा. (उत्तर नाही)

विमल० : आत्ता तर होत्या. (ती आत जाते. पुन्हा दाराशी येऊन) अहो इकडे या.

नाना० : आं, काय झालंय ?

विमल० : हेमा वन्सं रडतायत.

नाना० : का ? घेऊन ये तिला इकडे.

[आतून समाजवणीच्या सुरात विमलचा आवाज—चला, इकडे या. वाहेर चला असं काय वरं करावं. असं नाही करू हे बोलावतायत तुम्हाला. चला]

नाना० : इकडे ये बेटा हेमा.

[पुन्हा विमल आतून— असा हट्टीपणा नाही गडे करायचा.]

नाना० (त्राग्यानं) जाऊं दे ग. नसेल येत तर पडू दे तिथेच.

[असं म्हणत असतानाच विमल हेमाला घेऊन येते. हेमा रडत असते]

नाना : (रागानं) आता काय झालं तुला रडायला ?

विमल : (सौम्य पण करारीपणे) अहो तुम्ही सध्या बोलू नका.

नाना० : अरे म्हणजे मी काय बोलतो याला किमतच नाही. म्हणजे जणू काय किमतच नाही मला या घरात.

विमल० : आपण आपल्या किमती नंतर ठरवू.

नाना० : घाला तुम्ही दोघीही गोंधळ. मी बाहेरच जातो. हरकरेकडे बसतो. देऊसकरांकडचे आले आणि तुम्हाला माझी गरज भासली तर बोलावून घ्या.

[बाहेर जातो.]

विमल० : अहो, अहो—म्हणजे—हे बघा तुम्ही आता बाहेर जाऊ नका—तुम्ही समोरच बसा··· (हेमाला) बघा तुमचे भाऊ रागावलेत. तुम्ही रडू नका गडे अशा. सांगा बरे तुम्हाला काय झालंय. (स्तब्धता) तुम्हाला कुणी बोललं का ? (स्तब्धता) तुम्हाला आईची आठवण होतेय होय ? (स्तब्धता) मग आता खरं सांगा. अगदी खरं. माझ्यापासून लपवायचं नाही. मुळीच नाही. माझ्यावर विश्वास आहे न. मग आता खरं सांगा—तुम्हाला देऊसकरांचं स्थळ पसंत नाही का ? नसेल तर अगदी स्पष्ट सांगा. (मघाशी शकूनं काढून ठेवलेल्या हाताचा लाकडी पंजा हातात घेते आणि हेमाला एकदम रडूं कोसळतं. विमलच्याही पापण्या भिजतात) —हेमा वन्सं आता तुम्ही ते विचारसुद्धा तुमच्या मनात आणू नका. तुम्ही आज सकाळपासून तेच मनावर घेतलंय. हे बघा शकू वन्संचं जसं व्हायचं तसं होईल. आपण काय करणार त्याला. काही आहे का आपल्या हातात. देवानं याच घरात अन्नपाणी लिहलंय त्यांचं त्याला काय करावं. मी तर असं समजते की मला दोन दीर आहेत. त्या माझे दीरच आहेत.

—आता खरं तर आम्हा दोघांना कोण आहे त्यांच्याशिवाय ? गीता वन्सं लग्न होऊन निघून गेल्या. तुम्ही जाल, शरदभावजी पोटामागं निघून जातील कुठं तरी. मग राहणार कोण ? आम्हाला न मूल न बाळ.

[शकू आतून बोलत येत असते.—नुस्ता सगळा पोरकटपणा. शऱ्याला काडीची अक्कल नाही. मी म्हटलं नव्हतं नाना, शऱ्या क्रिकेट खेळत बसला असेल म्हणून. तो आत्तापर्यंत खेळत होता. मीच त्याला दवडवला देऊस्करांच्याकडे.) ती प्रवेश करते तेव्हा तिच्या हातात खुर्ची असते. हेमा आणि विमल आपापली आसवं आवरायच्या घाईत असतात.]

शकू० (हेमाकडे बघून) अरे ऽऽऽ माझी सोनचिडिया, कुठं गेली होती इतका वेळ अं ? अन् हे काय, रडायला काय झालं ? काय झालं ग वहिनी ? आईबाबांची आठवण झाली का तिला ? अग हेमे ऽऽ, नाही आईबाबा तर नसू देत. वहिनी, मी एक नवीन म्हण तयार केली आहे. तुला ऐकायची आहे का. हेमे ऐक. नीट ऐक. लक्षात ठेव.

आईबाबा मरो
अन भाऊवहिनी जगो.

[स्वतःच खूप हसते. पण इतर कुणीच हसायच्या मनःस्थितीत नसतात.]

जा मेलं, आम्ही काही कधी गमतीचं बोललो तर कुणाला गम्मतच वाटत नाही.

विमल० असं नाही. सकू वन्सं, आपण सगळेच नंतर हसू. थोडया वेळानं.

शकू० : म्हणजे आताच्या गमतीवर थोडया वेळानं हसणार ? ठीक आहे, मग मी थोडया वेळानंच गंमत करीन.

विमल० (तिला मात्र आता खरंच हसू येतं.)

शकू० : आता का हसलीस तू ?

विमल० : बरं मग थोडया वेळानं आणखी हसेन मी बरं.

शकू० (हेमाकडे बघून) अन् हे काय हेमेऽ, अग अजून तू वेणी घातली नाहीस. कम्माल झाली तुझी.

विमल० : मघाच झाली वेणी त्यांची.

शकू० : ही अशी. अग ही काय वेणी ? हेमे चल आण कंगवा. मी घालून देते. (ती स्वतःच आत जाऊन तेलाची बाटली कंगवा वगैरे घेऊन येते.)

शकू० हं बस इथं.

[हेमाची वेणी घालता घालता शकू तिच्याशी बोलत असते. हेमा फक्त मानेनेच होकार किंवा नकार देते.]

शकू० : हेमे—तुझ्यासाठी वरच्या खणात मी डेक्रॉनची साडी काढून ठेवली आहे. ती नेस. चांगली नेस. गवाळ्यासारखी नेसू नको. आणि गवाळ्यासारखी लाजू नको. चांगली धीटपणे वाग. काही विचारलं की अगदी ठणकावून उत्तरं दे. घाबरायचं नाही. मुळीच घाबरायचं नाही. मी म्हणते कशाला घाबरायचं ? काय वाघ बिघ आहे की काय तो ? अं ?

—अगऽ मी तर उलट असं म्हणते की, तूच त्याला काही प्रश्न वगैरे विचार. हल्ली विचारतात म्हणे बाई असं. परवा दामल्यांची मालू सांगत होती की, प्रधानांच्या सुनितानं विचारले होते तसले प्रश्न. तुम्हाला काय आवडतं ? तुम्ही कोणते सिनिमे बघता. अमका नट आवडतो का ? ते फलाणं पुस्तक तुम्ही वाचलं का ? असं काहीसं विचारतात म्हणे बाई.

—मग तू सुद्धा विचार. काय बिघडलं. आणि अगदी स्पष्ट सांगायचं, म्हणा मला पुढं खूप शिकायचं आहे. म्हणावं माझ्या वडिलांची इच्छा होती मी चांगली डॉक्टरीण किंवा प्रोफेसरीण व्हावं म्हणून. विचारशील ना ? का ग ढमाले. (तिच्या पाठीत एक लाडिक धपाटा घालते.)

आणि त्यांना सांगायचं. लग्न झाल्यावर मी चांगली शिकेन. नोकरी करेन. आपण दोघंही नोकरी करू. खूप पैसा जमवू आणि चांगलं लहानसं घर बांधू. का ग कारटेऽ बांधशील न घर ? (पुन्हा तसाच धपाटा.) आम्हाला बोलावशील ना ग ? बोलावशील की नाही ? काय ? का ग ? मग मी येईन तुमचं घर लावून द्यायला. बोलाव बरं का मला. नाही तर आम्हाला कोण बाई विचारतं गरिबाला—

[वेणी घालणं पूर्ण होत आलेलं आहे. ती रिबिना बांधत असतानाच बाहेरच्या खोलीतून नानाचा हुऱ्याशी चाललेला संवाद ऐकू येतो. पण त्या संवादाची प्रतिक्रिया शकूच्या वागणुकीत स्पष्ट दिसते.]

नाना० : खाली नको बसू. असा इथं उभा रहा. कशाला आलास हुऱ्या तू ?

हुऱ्या० (बावळटपणे) मी आलो होतो.

नाना० : कशाला ?

हुऱ्या० मला बोलावलं होतं,

नाना० : कुणी ?

हुऱ्या० : शकू म्हणे तिला पहायला येणार आहेत.

नाना० (रागावून) तुला कोणी सांगितलं ?

हुऱ्या० : शकूच म्हणे. तिनंच सांगितलं. चौकातल्या नळावर.

नाना० नळावर ?

हुऱ्या० : हो नळावर. मी पाणी भरत असताना भेटते ना ती मला रोज.

नाना० : कुणाला पहायला बिहायला येणार नाही.

हुऱ्या० : ती तर मला म्हणे.

नाना० : काही म्हणे बिणे काही नाही. चल निघ. अन् खबरदार संध्याकाळपर्यंत आला तर साल्या. हाकलून देईन. आणि आज सात वाजता ये पाणी भरायला.

हुऱ्या० : बरं. मी येईन. सातच वाजता. शकू कुठं आहे ?

नाना० : तुला काय पंचाईत. घरी नाही ती. बाहेर गेली आहे.

हुऱ्या० : बाहेर गेली ?

[शकू हेमाच्या हातात तेलाची बाटली, कंगवा आणि कपाटातून तिनं नेसायची साडी काढून देते व हेमाला अक्षरशः घरात हाकलते.]

हुऱ्या० (पुन्हा) बाहेर गेली ? मघा तर ती घरीच होती. खालून वर मीच तर खुर्ची आणून दिली तिला. मग ती घेऊन आली घरात. शकू बाहेर गेली ?

नाना० एकदा सांगितलं न. चल निघ इथून.

हऱ्या० : पण ती तर मला म्हणाली---
नाना० आता मात्र.
हऱ्या० : ती मला खायला देणार होती.

[हे ऐकल्यावर शकू चटकन घरात निघून जाते. रंगमंच काही वेळ मोकळा असतो. संवाद चाललेलेच असतात.]

नाना० : फुकटचं आलं साल्या खायला. इथं कष्ट करावे लागतात. चल जा आता.

हऱ्या० : पण. . . .

नाना० : आता जातो की. . . .साले नसते ऐन वेळी उपटतात. शके ऽऽऽ

[शकू घरातून कळशी घेऊन येते आणि हातात आणलेल्या भाजी पोळीची घडी कळशीत टाकून धावत जाऊ लागते. तितक्यात दारातून नाना आत येतो.]

नाना० : कुठे निघालीस शके ?
शकू० : पाणी आणायला.
नाना० : का, घरातलं पाणी संपलं ?

शकू० : संपल्याशिवायच चालले का मी ? मला काही वेडवीड नाही लागलं.

नाना० : शके, तू हऱ्याला काय सांगितलंस ?

शकू० : म्हटलं हेमाला बघायाला येणार आहे.

नाना० : पण तो काय म्हणत होता—तुला बघायला येणार असं तू त्याला सांगितलं? खरं असं सांगितलं का ?

शकू० : वेडा आहे तो.
नाना० : पण तू त्याला का सांगितलं ?

शकू० : का सांगितलं म्हणजे. कुणाची चोरी आहे का ? तुझं आपलं भलतचं. सांगितलं म्हणून काय झालं ? मी म्हणते काय झालं सांगितलं म्हणून ?

नाना० : म्हणून तू काय घरातल्या गोष्टी वाटेल त्याला सांगत सुटणार. घरच्या गोष्टी अशा फालतु लोकांना सांगितलेल्या मला नाही आवडणार.

शकू० मी जाऊन येते.
नाना० : पाणी आणायला नको जाऊ.

शकू० : पाणी आणायला नाही जात.

नाना० : मग कुठे जाते ?

शकू० : हऱ्याला भाजी पोळी नेऊन देते. सकाळपासून कोणी खायला सुद्धा घातलं नाही त्याला. सगळे त्याच्याकडून काम करून घेतात. खायला मात्र कुणी घालत नाही. (रडकुंडीस येऊन) मर मर मरतो मेला नुसता. मरेल तो अशानं. कुणी कुण्णीच त्याला खायला घालत नाही तर मरेलच तो.

नाना० : हे बघ शकू तू जा. त्याला दे भाजी पोळी. खाऊ घाल त्याला आणि चांगली दीड दोन तासानं ये. वाटल्यास कोपऱ्यावरच्या हरकऱ्यांकडे बस. मी तुला नंतर हाक मारेन.

शकू० : का म्हणून बसू मी हरकऱ्यांच्याकडे ? मला काय स्वतःचं घर नाही ? मी नाही बसणार. घरात किती कामं पडली आहेत. तावडतोब येईन मी.

नाना० : बरं तू आधी जा तर—

[आतून विमल हाक मारते०—शकूवन्सं अहो शकूवन्सं]

शकू० : मी चालले.

विमल० (बाहेर येऊन) अहो अशा ऐन वेळी कुठं चालतात ?

शकू० : बाहेर चालले.

नाना० : अग जाऊ दे तिला. (ती जाते.)

विमल० : तुम्ही तरी भलतेच आहात. कशाला जाऊ दिलं ? आता कितीसा वेळ उरलाय पाहुणे यायला.

नाना० : अग जाऊ दे तिला. रमू दे बाहेर.

विमल० : अहो पाहुणे येतील पंधरा-वीस मिनिटात.

नाना० : म्हणूनच तिला बाहेर जाऊ दिलं.

विमल० : अहो त्या घरी असायला हव्या.

नाना० घरी राहिली तर आणखी काही खुळचटपणा करील. कुणी पाहुणे येणार असले की तिच्या खुळचटपणाला आणखी उधाण येतं.

विमल० : सकाळपासून किती काम करतायत त्या.

नाना० : अग हो, पण नेमक्या वेळेला.

विमल० (गंभीर होऊन) किती काळ लपवणार आपण.

नाना० : म्हणून काय लोकांसमोर प्रदर्शन करायचं ?

विमल० : तुम्ही त्यांना चक्क घालवून दिलं घराबाहेर.

नाना० : वेळ प्रसंग बघून वागावं लागतं.

विमल० : पण तुम्ही त्यांना घालवून द्यायला नको होतं.

नाना० (उसळून) अरे, म्हणजे काय निर्दय आहे मी ? की उलटया काळजाचा ? तुला काय वाटतं, मला काहीच वाटत नाही ? मला काय feelच होत नसेल ? माझी धाकटी बहीण आहे ती.

विमल० : ते वाटणं वगैरे घटकाभर बाजूला राहू द्यात. त्यांना परत बोलावून आणा आधी.

नाना० : राहू देत तिला बाहेर.

विमल० : अहो त्यांच्या अपरोक्ष पाहुणे येऊन गेले तर अकान्डतांडव करतील त्या आल्यावर.

नाना० : पाहुणे येऊन गेल्यावर करेल ना, करू देत. खुशाल करू देत. पण पाहुणे असताना नको.

विमल० : त्या तसं भलतं सलतं वागणार नाहीत.

नाना० : तू हमी देऊ नकोस तिची. मला कल्पना आहे.

विमल० : माझं ऐका. त्यांना समज आली आहे आता.

नाना० : ठाऊक आहे मला किती समज आली आहे ती. पाहुण्यांसमोर पटकन् बोहोचकासारखी काही तरी बोलून बसेल आणि आपली शोभा होईल.

विमल० : त्यापूर्वीच आवरेन मी त्यांना. तसं नाही होऊ देणार.

नाना० : अग तिला हर्ष भरल्यासारखं झालं तर वेडे-वाकडे हातवारे करून नाचायला सुद्धा लागेल ती. तुला ठाऊक नाही विमल–अग···नको–नको–खूप मोठं प्रेशर आल्यासारखं वाटतंय. ती आयडिया म्हणजेच भयानक.

विमल० : मी कल्पना दिली आहे देऊस्करांना.

नाना० : अग, कल्पना देणं, कबूल करणं आणि प्रत्यक्ष तसं बघणं यात फरक आहे. आता आपली हेमी चांगली म्हणून...

विमल : म्हणूनच म्हणते, ते आले असताना शकू वन्संना असू द्यात इथं. बघितलं तर बघू द्या.

नाना : नो नो ! मी रिस्क घ्यायला तयार नाही. स्थळ चांगलं आहे आणि हेमीच्या आयुष्याचा प्रश्न आहे. बाबांच्या पश्चात होणार असणारं हे पहिलंच कार्य. नो नो...अगदी काडीइतकी सुद्धा रिस्क घ्यायला आपण तयार नाही.

[काही तरी वस्तु घेण्यासाठी हेमा बाहेर येते. नाना तिला बोलावतो.]

—हेमा (तिच्या पाठीवरून हात फिरवतो. ती गहिवरून जाते.)

—जा बेटा, लाग तयारीला. तुला ठाऊक नाही विमल–फार मोठ्ठं प्रेशर दूर होईल. मोकळा होईन मी. अग शकी काय आपलीच आहे. चला, भलत्या वेळेला इमोशनल होणं चांगलं नाही. हं–कम ऑन, बी क्विक. (बाहेरच्या खोलीत जातो.)

[शकू बाहेरूनच ओरडत येते.—"मेला हऱ्या कुठं गेला कुणास ठाऊक—जपून ये रे किशुऽऽऽ. आता चांगला पाच वर्षांचा झाला अन् तुला पायऱ्या नाही चढता येत जिन्याच्या ? हा–अस्सं–जरा हळू." शकू प्रवेश करते तेव्हा तिच्या कमरेवर कळशी असते. आणि तिच्या मागोमाग पाच वर्षे वयाचा किशु येतो. नाना समोरच्या खोलीतूनच प्रश्न विचारतो.]

नाना० : इतक्या लवकर कशाला आलीस तू शके ?

शकू० : बारे वा. हे बरं विचारणं. घरी पाहुणे येणार आणि मी नको ? का बरं ? म्हणजे विचित्रच सगळं.

[आतून नाना०—किशुला कशाला आणलं ?]

शकू० : ती आमची गंमत आहे. आणि बरं का वहिनी, एऽऽ वहिनी, मला आता चाळीच्या टोकाला ढमढेऱ्यांच्या मावशी भेटल्या. त्यांना मी सांगि-

तलं. म्हटलं थोडचा वेळानं डोकावून जा आमच्या कडे.

[नाना बाहेरून ताडकन येतो.]

नाना० (रागानं) शके—(त्याला पुढचं काहीच सुचत नाही. तो समोर उभी असलेल्या विमल-वर खेकसतो.) अहो तुम्ही का इथं उभ्या अशा ? पटापट कामं करा. जा. आत जा.

[विमल काही न सुचून आत जाते. नाना सुद्धा ताडकन बाहेर जातो. शकूला या सगळ्या प्रकाराची दखल घेण्याचं काहीच कारण नसतं. किंबहुना ती त्या मनःस्थितीतच नसते.]

शकू० (आपल्याच नादात चूर आहे.) तू इथं बस बरं कारे किशु. इथं या स्टूलवर. मी आत्ता येते. (ती आता जाते आणि साखरेचा डबा घेऊन येते.) हं ऽऽऽ शाब्बास. नको नको. तू इथं नको बसू स्टूलावर. इथं बस या खुर्चीत. इथं ते बसणार आहेत. हं ऽऽऽ अस्सं.

—हं– किशु आता एक काम कर. तू डोळे मिट. वा, शहाणा आहे आमचा किशु. आता हात पुढे कर. मी तुला किनई आब्बा देते. हात पुढे कर. हात पुढे कर. डोळे नको उघडू. (तो डोळे मिटून हात पुढे करतो. ती त्याच्या हातावर चमचाभर साखर ठेवते.) हं– आता डोळे उघड. (तो डोळे उघडतो.) खाऊन टाक, खाऊन टाक. (तो खातो.) वा वा ! शाब्बास. कसा आहे रे अब्बा. गो गो आहे की नाई ऽऽऽ.

—किशु आता मी एक जम्मत सांगते ती करायची आँ ऽऽ. अगदी खर्र. खर्र ऽऽऽ गम्मत करायची. मी सांगते तसं करायचं.

[ती मधलं बोट आणि तर्जनी दोन्ही एकत्र जुळवून. ओठाला लावते. डोळे मिटते आणि नंतर त्यांपैकी एखादं बोट धरायला सांगते. तो धरतो आणि मग शकू अगदी मनस्वी आनंदानं ओरडते.]

—नाना ऽऽ वहिनी ऽऽ हेमे ऽऽ, इकडे या, लवकर या, या या, धावत या. बघा बघा तर खरं. अहो एक गंमत झाली आहे.

[नाना आणि वहिनी येतात.]

—नाना अरे आपल्या हेमीचं लग्न अगदी नक्की होणार, हेमीचं लग्न होणार बरं का वहिनी — हे बघ, या किशूनी माझ्या मनातलं बोट धरलं. ओ हो हो ऽऽऽऽ. शहाणा आहे आमचा किशु. कित्ती शहाणा आहे.

[ती त्याला कडेवर उचलते आणि गोलगोल फिरते. ओरडते.]

नाना० (तिच्यापेक्षा अधिक जोरानं ओरडून) शके ! ओरडू नकोस. बंद कर हा तमाशा. ही काय खिदळायची वेळ आहे ? अन् त्या काटर्चाला कशाला आणलंस फालतू. चल हाकल त्याला.

शकू० : नाही हाकलणार. त्यानं एवढी आनंदाची गोष्ट सांगितली अन् त्याला हाकला म्हणे. नाही हाक-लणार मी. बस रे इथं किशु.

नाना० आता मात्र मी काही एक ऐकणार नाही.

[नाना त्या मुलाचं बखोटं धरून बाहेर ओढत नेतो. शकू नानाला झोंबते.]

शकू० : नाही नाही नाही !

नाना० : चल हो बाजूला.

[नाना तिला बाजूला सारतो. मुलाला दाराबाहेर घालवून देतो. शकू जोरजोरानं कपा-ळावर बुक्क्या मारून घेते. नाना परत येतो.]

नाना० (सुरुवातीला थंडपणे तिच्याकडे बघत तिला बोचेल असे शब्द अगदी स्पष्टपणे बोलतो.) मूर्ख, बेअक्कल, नालायक, लंगडी. अक्कल तर काडीची नाही आणि दुसऱ्यानं सांगितलेलं ऐकायचं नाही. स्वतःचाच शहाणपणा करायचा. नुसता छळवाद मांडला आहे कार्टीनं. जन्माला आली तेव्हापासून छळ. आईचा छळ, बापाचा छळ आणि आता आमच्या नशिबी आली. बाबाला हिनं छळून छळून मारलं, शेवटशेवट पर्यंत छळ केला. हलकट. (नानाच्या बोलण्यानं शकू आतल्या आत संतापत असते, धुमसत असते.)—या सटवीला बघवत नाही आपल्या धाकटचा वहिणीचं सुख. तिच्या जिवावर उठली

अनुक्रमणिका

आहे. असा तमाशा करून सत्यानाश करायला निघाली आहे तिचा. आता ही टवळी आणखी काय वाढून ठेवणार आहे आमच्या समोर आणखी कुणास ठाऊक.

शकू० (शकूचा संताप आता मात्र खूपच अनावर झाला आहे. ती जोरानं ओरडते.) हो—हो—हो. मी मारलं आईला. मी मारलं बाबाला. मी छळ छळ करून मारलं. आता तुम्ही माझा छळ करा. मारून टाका मला. घ्या, जीव घ्या माझा. अरे असे उभे का ? घ्या, घ्या जीव.

[भरकन घरात जाते आणि घरातून विळी घेऊन तात्काळ बाहेर येते. नानाच्या समोर आदळते.]

—अरे असे उभे का सगळे ? घेऊन टाका जीव माझा. तुम्ही सुटाल मी मोकळी होईन. मी आईला मारलंय न ? मी बाबाला मारलंय न ? मी हेमीच्या जिवावर उठले. हेमेऽऽ मी तुझ्या जिवावर उठलेय ग बाई. (ढसढसा रडते.) मी डाकीण आहे, मी कैदाशिण आहे. मला दगड मारा सगळे मिळून. दगडानं चेचून चेचून माझा प्राण घ्या. ही मी इथं बसते.

[आतल्या खोलीच्या दाराजवळ पालखट मारून बसते.]

—हाणा, मारा मला. हे एवढाले दगड घ्या. घाला माझ्या टाळक्यात. मी बेअक्कल आहे, मूर्ख, नालायक आहे. लंगडी आहे— आईऽऽ तुझा जीव मी घेतला. बाबा हो ऽऽ तुम्हाला मी मारलं. घ्या, जीव घ्या माझा. (जोरानं किंचाळते.) घ्या ऽऽऽऽऽ. आई ग ऽऽ मला कसं तरी होतंय, मला काही तरी होतंय ···मी—मी—मी···

[स्वर मंद मंद होतो. ती डोळे मिटते. शांत होते आणि उंबरठ्याजवळच झोपून जाते. घटकाभर वातावरण अगदी सुन्न होतं. विमल तिच्याजवळ जाऊन तिला उठवण्याचा प्रयत्न करते.]

नाना० : विमल, झोपू देत तिला, झोपू देत. ती अशीच तास दोन तास झोपेल. तिची सवय ठाऊक आहे मला. (झोपलेल्या शकूजवळ जातो.) शके— (तिच्या केसावरून हात फिरवितो आणि त्याला एकदम हुंदका येतो. उठून आईवडिलांच्या तसविरीकडे तोंड करून भिंतीजवळ उभा राहतो.) अखेर हे असं व्हावंच लागतं. आणि दुर्दैव शके—माझ्याच हातून घडलं.

[तितक्यात शरद धावत येतो.]

शरद०—नाना, ते पाहुणे आलेत.

नाना० : अं—, पाहुणे आलेत ? असं कर, या खुर्च्या बाहेरच घेऊन जा. त्यांना बाहेर बसवू. हं चला सगळे आपापल्या कामाला लागा बरं. तिला निजू द्या तिथंच.

[बाहेरच्या खोलीत 'या बसा' वगैरे आतिथ्य चाललं असतं. शकू निपचित पडलेली असते. काही क्षण अगदी सुन्न उदासवाणे जातात. बाहेर आतिथ्य, हसणे बोलणे चालले असते. काही वेळानं सजलेली हेमा हातात चहाचा ट्रे घेऊन दारापाशी येऊन थांबते. परंतु तिला निजलेल्या शकूला ओलांडून जावं लागतं.]

अनुक्रमणिका

एक होती बुढी

—वासुदेव चोरघडे

('आण्याजो नागपूरला येतात'—ह्या एकपात्री विवेचनाचा काही भाग.)

एक होती बुढी. तिच्याजवळ होती एक सोन्याची बुगडी. ती बुढी मोठ्या वजेनं ठेवत असे. बुढीजवळ एक लहानसं लाकडाचं डावलं होतं. त्यात ठेवत असे ती बुगडी. कारण त्या बुगडीशी निगडित होत्या तिच्या जीवनाच्या साऱ्या स्मृती.

बुढीजवळ सारं काही होतं. सामान्याच्या वाट्याला येणारं सुखदुःख बुढीनं भोगलं होतं. तिच्याजवळ गोठ–पाटल्या, कुड्या–बुगड्या, रुईफुली–तन्मणी तांदळी–जोंधळी पोत, हे सारं होतं. पण घरच्या कर्त्याच्या देहाचं सोनं झालं आणि बुढीनं सारं सोनं निकालात काढलं. पाठच्यांच्या आणि पोटच्यांच्या भल्यासाठी. एक बुगडी तेवढी ठेवली होती. तिच्याकडे पाहिलं म्हणजे बुढीला सारं काही आठवत असे. गतकालच्या साऱ्या गोष्टी जणू ती बुगडी बुढीच्या कानांत सांगत असे. कोणाला ऐकू येणार नाही या बेतानं. ते ऐकून ती कधी आपल्याच मनाशी हसायची. कधी पापणींच्या कडा पदरानं पुसून टाकायची .....

पुढे काय झालं ? काय होणार...ती बुढी गेली. तिची बुगडीही गेली. 'किडूक–मिडूकात' जमा झाली. संपलं त्या बुगडीच महात्म्य—त्याचं महत्त्व इतरांना नव्हतं—नसणारच...

आपल्या स्मृतीचं कमी अधिक महत्त्व आपल्याला. आपणही मोठ्या जपणुकीनं ठेवतो काही स्मृती. अंतःकरणाच्या खोल तिजोरीत चंदनाच्या नक्षीदार पेटीत.—

काही वर्षांपूर्वी साधारण मध्यमवर्गीयांच्या वाट्याला आलेलं संगीतमय सुखी जीवन आज विस्मृतीत जमा झालेलं आहे. त्या जीवनाच्या काहीं आठवणी आपल्यापैकी अनेकांनी बुढीच्या बुगडी–सारख्या जपून ठेवल्या असतील.

अगदी आता–आतापर्यंत आमच्या आयुष्यात होणारी प्रत्येक पहाट चैतन्यमय असे..."देवा बापा नारायणा–पोराईस सुखी ठेवा" अशी आम्हा मध्यमवर्गीयांच्या एखाद्या आजीची आर्त प्रार्थना ऐकून "राणाईचा नारायण" आमच्या दारात चंदनाचा सडा शिंपडीत असे आमचा दिवसच मुळी सुखी आणि संगीतमय निघत असे – त्यामुळे कर्तृत्वाच्या निशिगंधानं आसमंत दरवळून टाकण्याची महत्वाकांक्षा मनात मूळ धरू लागे.

आपल्याला आठवत असेल जात्यावरच्या ओव्यांनी आपण सारे जागे होत असू.

पहाटेच्या प्रहरी सडा टाके चंदनाचा
उगवला नारायण आनंदाचा.

× ×

उगवला नारायण झाडाझुडावरी
तेज तुझ्या चुड्यावरी राणादेवी.

× ×

भाऊ माझा महादेव भावजई ही गौर
पुढे नंदीचं देऊळ देवा माझ्या.

पहाटेच्या प्रहरी आसमंत पावन करणाऱ्या ओव्यांत आणखी एक जादू असे—पऱ्यांची स्वप्नं पाहून त्याच

आनंदात अर्धवट जागृतावस्थेतील पर्करी चिमण्यांना भावी आयुष्याची शिकवण मिळत असे.

भोळा भ्रतार उशाचा होय नाग
त्याच्या मनाजोगी वाग मालनबाई—

सासूचा सासूरवास सोसला ऐकीनं
कुळवंताच्या लेकीनं मालनबाई—

माझं सुख दुःख सांगू नका अडावरी
डोई गुंड होई जड मायबाई—

माझं सुख दुःख सांगू नका ग बाजारी.
जाऊं देजा घरवरी भाऊराया—

शंभर माझं गोत मजला नाही गोडी.
एक माझी शालजोडी मालनबाई.

तोपर्यंत अंथरुणातील राजसबाळ आईच्या मांडीवर आलं आणि जात्यात टाकायच्या वैरणाचा हात थबकला. 'राजस बाळ्या'च्या रेशमी जावळात फिरू लागला.

दळण घातलं अंगुठ्याचं वळ—.
घुठीत जायफळं राजसाच्या—.

तोंडामध्ये घाली तोंड चिमणीच्या वाणी.
रागाचं केलं पाणी बाळ माझं—.

सरलं दळण सरलं सुपकानी
गाविलं रत्नमणी बाळ माझं—.

दळण संपलं—गृहिणी उठली. तुळशीवृन्दावनासमोर सडा शिंपला. सारवण झालं—आरशासारख्या चक्क अंगणात चार चौकाची रांगोळी झाली—तुळशीला हळद वाहिली. आपण लावली—तुळशीला कुंकू वाहिलं आपण लावलं—.

देवालयातून स्वर ऐकू येऊ लागले—

नाम संकीर्तन वैष्णवाची जोडी।
पाप अनंत कोडी केली त्याची ।।

अनंत जन्माचे तप एक नाम ।
सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।

योग–यागक्रिया धर्माधर्म मात्रा ।
गेले ते विलया हरिपाठी ।।

ज्ञानदेवी यज्ञ योग क्रिया धर्म ।
हरिविण नेम नाही दुजा ।।—

केवळ देवालयातच नव्हे तर साऱ्यांच्या ओसरीवर भगवंत नाचत होता—एकटा जनाबाईसाठी येणारा साऱ्यांसाठी आला होता—

कालचा एखादा बटू मग्न होता आजोबांनी लिहून दिलेलं पाठ करण्यात—

हरिः ॐ। सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्
प्रभूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्टद्दशांगुलम्

एखादा पुराणिक मुलांना वाचन शिकवत असे मोठ्या पुस्तकातील —

"आता अहिंसेची स्थिती। ऐके राया चक्रवर्ती।
भवई उचलणे नाही भूती। स्वप्न सुषुप्ती जागता ।।

'सुषुप्ती' हा शब्द पुन्हा उच्चारायला सांगून पुढे सांगत असे.

पावो आदळतां देख। झणों पृथ्वी पावेल कंप।
या काकुळती आवश्यक। पाउले अलौकिक
हळुवार ठेवी ।।

शब्दन् शब्द काळजीपूर्वक उच्चारला जात होता.

जळामाजी घालिता उडी। झणी उदक दडपे बुडी।
तरंग न्यायें देणी बुडी। जीवनाची दुथडी न
हेलावता ।।

जीवनाची दुथडी अशी समृद्ध होत असे. विडयाची कोवळी पानं साऱ्या घरी अशी परतविल्या जात होती.

—जशी सकाळ—तशीच दुपार...

घरात निसण, कांडण–शेवया–मालत्या,...त्या वेळी मुलं मुली गाणं म्हणायच्या...खाऊच्या गोडीनं का होईना पण आषाढीपासून सुरू होणारे सण म्हणजे गोडाधडाची चंगळ...

आली आखाडी। सारे सण हाकारी
आजली पुजली जिवती। नागोबा लिहल्या भिंती।
नागोबाची केली पूजा। पोवती आली दुजा।
पोवतीचं पोवतं बांधलं गळा। कान्होबा देखला
डोळा ।।

कान्होबाचा केला मान मोठा।
लागतीचं आला पोळा

पोळयाची केली तजवीज ।
सहज आली काजळतीज ।।
काजळतीजीचं दिलं वाण ।
गणेश मागे आपला मान ।।
गणेशाची ऐकली कहाणी ।
जेष्ठा आल्या पाव्हणी ।।
जेष्ठेचं केलं आंबील फळ ।
अनंत आले खेळत माळत ।।
अनंत पुजून बांधला गळा
आडचावर पितर देखलं डोळा ।।
पितरास घातलं जेवूं । चालत राजगुरु पाहूं ।।
राजगुरू—वसले आसनी । केल्या नवमीच्या
सासनी ।।
नवमीच्या सासनी केल्या । सहज दसरा आला ।।
दसऱ्यास मारले वेशी । आसनी आली सोयरी ।।
आसनी भुलाई वसली पाटी । आठवीसाठी गेले
हाटी ।।
आठवीचा चंद्रमा ओवाळी । सहज आली
दिवाळी ।।
भावास बहिण भेटली । तुळसावाई नेटली ।।
तुळशीचं केलं वऱ्हाड । पांडीनं मागितलं
विऱ्हाड ।।
पांडिनच केलं पाण पीठ । मग मी झाली
घीटमीट ।।
घीटमीट झाली । धनुर्मास न्हाली ।।
धनुर्मास न्हाली । तर देव वसले रथी ।।
देवाचा पुजला जोडा । शिवरात्री आली घोडा ।।
अशीच वल्यांडया येंगली ।
तर पोरं बोंवलू लागले ।।

'वल्यांडा येंगून' पोरांचं होळीचं ओरडणं ऐकू आलं — सण संपले अशी तिची खात्री झाली —

या जीवनातील संध्याकळ सुद्धा उद्याच्या आशेनं मोहरलेली असे. ही सारी माणसं आहे त्या स्थितीत समाधान मानून राहत होती. पण त्यांना महत्वाकांक्षा नव्हती असं नाही. आपल्याला न पेलणारी, सामान्य मगदूराच्या बाहेरची त्यांची महत्वाकांक्षा कधी कधी सायंकाळच्या भजनात नामदेवाच्या शब्दांतून व्यक्त होत असे.

मनुष्य करिसी तरी भक्तिचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
श्वान करिसी तरी उच्छिटाचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
झाड करिसी तरी तुळशीचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
वृक्ष करिसी तरी मंडप मेखाचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
पाषाण करिसी तरी रंगशिळेचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
उदक करिसी तरी सडियाचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।
नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषे ।
तुझे द्वारी वसे ऐसे करी ।

ही महत्वाकांक्षा व्यक्त करून सारे जीव झोपी जात—

ही आहे वुढीची बुगडी—संगीतमय सुखी जीवन ज्यांच्या वाटचाला आलं त्यांना ह्या स्मृतीचं विशेष महत्त्व--

---

चि रू ट !

—" Y. B. "

वृक्षाच्या छायेखाली असलेल्या दगडांच्या एका चट्टाणीवर ते दोघे बसले होते. त्यांपैकी एकजण काहीसा तरुण इसम होता आणि त्याने खाकी रंगाचा पोषाख अंगावर चढविला होता. पोषाखात टापटीप मात्र नव्हती. तो तेथे बसला असला तरी त्याला ते ठिकाण प्रशस्त वाटत नसावे. वरवर न दिसणारा मनात दडलेला दुबळेपणा त्याच्या प्रत्येक हाल-चालीतून प्रत्ययास येत होता. एकामागून दुसरी सिगरेट ओढण्याचा त्याचा उपक्रम सारखा चालू होता. प्रत्येक सिगारेट अगदी शेवटपर्यंत ओढावी आणि हाताच्या बोटास आच लागेपर्यंत ओढावी आणि नंतर फेकून द्यावी असे सारखे चालू होते. त्यामुळे त्याची बोटे पिवळी नि फिक्कट लाल झाली होती. त्याच्याच शेजारी बसलेला दुसरा गृहस्थ काहीसा वयस्क आणि पन्नाशी उलटलेला होता. त्याच्या चेहेऱ्यावर विलक्षण कणखरपणा झळकत होता. त्या कणखरपणात जीवनाविषयीचा एकप्रकारचा उन्मादही त्याच्या डोळ्यावाटे ओसंडत असताना दिसत होता. वयोमानानुसार त्याची पाठ किंचित वाकलेली होती. त्याच्या डोक्यावरील सर्व केस अद्याप पांढरे झालेले नव्हते. ओठावरील सुडाळ मिशा मात्र पांढऱ्या झाल्या होत्या. तीच स्थिती त्याच्या डोळ्यावर असलेल्या दाट भुवयांची झालेली होती.

आकाश निरभ्र होते. उन्हामुळे आकाशाला फिक्कट पिवळा रंग चढला होता. ते बसले होते तेथून काही अंतरावरच आगगाडीचे रूळ दिसत होते आणि तेथून काही अंतरावरच पलीकडे त्या गावचे छोटेसे रेल्वे स्टेशन होते. एक लांबच लांब आगगाडी स्टेशनच्या आवारात शिरली आणि पाण्याच्या टाकीच्या शेजारी तिचे एंजिन येताच ती उभी झाली. काही उतारू खाली उतरले. काही आत चढले. हमालांची थोडीशी धावपळ झाली. नेहमीचेच दृश्य. त्या छोट्याशा गावाभोवती बरेच मोठे वाळवंट पसरले होते. त्या वाळवंटातून, त्याच सुमारास, हळूच वाऱ्याचा एक झोत आला आणि प्रवाशांना स्पर्शून गेला.

ते दोघे बसले होते ती जागा, गाडी उभी असलेल्या ठिकाणाहून फारशी लांब नव्हती. गाडीच्या खिडकीशेजारी बसलेल्या आणि गाडीखाली उतरून फलाटावर फिरत असलेल्या काही प्रवाशांचे लक्ष त्या दोघांकडे वेधल्याशिवाय राहिले नाही.

"तो त्या चट्टाणीवर बसलेला म्हातारा इसम मोठा रुबाबदार दिसतो" एक प्रवासी दुसऱ्याला सांगत होता. "मला वाटते, त्याच्यासारखा रुबाबदार चेहरा मी पूर्वी कधीतरी खात्रीने पाहिला असावा."

चट्टाणीवर बसलेला वयस्क इसम आपल्या हाता-तील चिरूटाकडे न्याहाळीत होता.

"हे बघ, सिगारेट सोडून चिरूट ओढायची तू आता सवय करावयास हवी" वृद्ध इसम शेजारच्या तरुणाला सांगू लागला. "चिरूट ओढणे हा जीवना-तील एक महान् आनंद आहे !" नंतर तो किंचित थांबला. समाधानाचा एक लांब निःश्वास सोडून पुन: म्हणाला, "होय, तो जीवनातील महान् आनंद आहे, याबद्दल तिळमात्र शंका नाही !"

तरण्या इसमाने मान हलविली. वृद्ध इसमाने आपल्या कणखर नि भारदस्त आवाजात हळू हळू सांगण्यास सुरुवात केली, "माझ्या मते, चिरूट ओढण्याच्या सवयीस संस्कारशास्त्रात अंतर्भूत करा-वयास हवे. खरे सांगतो, विनंती आहे तुला, प्रयोगा-साठी का होईना, माणसाप्रमाणे सिगारेट सोडून तू चिरूटाची सवय करावयास हवी. चिरूटातील उत्कट आनंद सिगारेटमुळे कधीच कुणाला लाभू शकत नाही. तंबाखू ही निसर्गाने माणसाला दिलेली सर्वात मोठी

देणगी आहे; आणि त्या देणगीचा आदर तितक्याच इतमामाने करावयास हवा. तंबाखू ओढणे हे काही देशात निषिद्ध मानतात. अशा देशात राहणाऱ्या लोकांइतके दुर्दैवी लोक दुनियेत दुसरे नसतील अशी माझी खात्री आहे!······आणि दोस्ता, हे बघ, माणसाने ज्या ज्या गोष्टी आजपर्यंत केलेल्या आहेत, त्या सर्वांत अत्यंत महत्त्वाची आणि महान् अशी चीज म्हणजे चिरूट ! चिरूट ओढायला सुरुवात करण्यापूर्वी त्याचे मागचे टोक तोडून टाकायला शिकलं पाहिजे. अर्थात् ही गोष्ट मी 'हॅवाना' किंवा 'लाकरोना' जातीच्या चिरूटाबद्दल सांगतो. तंबाखू ओढण्याच्या या कलेतील हा धडा तू नेहमी स्मरणात ठेवला पाहिजे. ही शिकवण एकामागून दुसऱ्याला देण्यात मला अभिमान वाटतो—धन्यता वाटते! माझ्या या शिकवणीचा लाभ घेता आला याबद्दल तू स्वतःला नशीबवान समजले पाहिजे."

"मी···मी···खरोखरीच स्वतःला नशीबवान समजतो" तरुण अडखळत म्हणाला.

त्यानंतर चिरूटाचे शेवटचे टोक तोडण्याऐवजी चिरूट कसा ओढायचा यासंबंधीचे एक जोरदार प्रवचन वृद्धाने तरुणाला ऐकविले.

मान हलवीत तरुण मुकाट्याने ऐकत होता.

या वृद्ध इसमाने खिशातून नवा चिरूट काढला आणि तो कसा पेटवावयाचा या संबंधीचे प्रवचन सुरू केले, "चिरूट हा मानवी देहाप्रमाणे आहे. त्याचीही विभागणी मानवी देहाप्रमाणे तीन विभागात करावयाची असते. आगपेटीतील पहिली काडी उजळल्यानंतर तिची ऊब साऱ्या चिरूटाला दिली पाहिजे. अर्थात् ही क्रिया आगकाडीच्या झोताचा चिरूटाला स्पर्श न होता झाली पाहिजे. नंतर दुसरी काडी उजळावयाची व चिरूटाचे समोरचे टोक शिलगावण्यास सुरुवात करावयाची. त्या वेळी ते टोक नीटसे शिलगणार नाही. नंतर तिसरी काडी उजळावयाची आणि दुसऱ्या टोकाने हळू हळू तोंडाने धूर ओढावयाचा. अशा रीतीने धुराचा जो पहिला लोट तुमच्या तोंडून बाहेर पडेल त्याकडे पहात असताना, आपल्या प्रियकराच्या बाहुपाशात जाण्यासाठी घराच्या खिडकीतून उडी घेणाऱ्या प्रेमातुर सुंदरीची तुम्हाला आठवण झाली नाही तरच नवल!···आणि दोस्त, चिरूट शिलगवण्याची हीच एक सुसंस्कृत रीत जगात आहे!

हे सर्व प्रवचन चालू असताना त्या वृद्ध इसमाचे चिरूट शिलगावणे चालूच होते. त्यानंतर त्याने झाडाच्या बुंध्याला पाठ टेकली. तोंडावाटे धुराचा एक लोळ बाहेर सोडला आणि आनंदाने उद्गारला, "प्रत्येक गोष्टीची माणसाने एकावर लज्जत घेतलीच पाहिजे. पण सर्व गोष्टींत चिरूटाचा नंबर पहिला लागेल. चिरूटासारखी चीज दुनियेत नाही! ..."

तरुणाने आपल्या खिशातील एक सिगारेट काढली आणि अगदी शेवटपर्यंत ओढली.

वृद्ध इसमाचे धूम्रपान चालूच होते. पलीकडच्या स्टेशनावर वाजणारी घंटा ऐकू आली. मघापासून स्टेशनवर उभी असलेली गाडी सुटण्याची वेळ झाली होती. एंजिनाने शिट्टी फुंकली. गाडी चालू झाली. काही वेळाने एंजिनच्या धुराचा एक मोठा लोळ मागे राहिला आणि गाडी दिसेनाशी झाली. सर्वत्र शांत झाले. वृद्ध इसमाने शिलगवलेला चिरूटही संपत आला होता.

त्याने त्या संपत आलेल्या चिरूटाकडे खेदपूर्ण नजरेने पाहिले आणि नंतर तो म्हणाला. "चिरूट संपत आला की तो एकादा इंच तसाच राहू द्यावा. शेवटचा तितका तुकडा तोडून टाकू नये. मनुष्याच्या आयुष्यातला शेवटचा काळ जसा कटुतर असतो, तसाच कडवटपणा चिरूटाच्या या शेवटी राहिलेल्या इंचभर थोटकात असतो. आयुष्याची मजा जशी सुरुवातीस असते, तशीच चिरूटाची मजाही सुरुवातीस अनुभवावयास मिळते."

तरुणाने मान हलविली. त्याने दुसरी सिगारेट शिलगवली.

"आणि आत्तापर्यंत तू किती सिगारेट्स ओढल्या?" वृद्धाने विचारले.

"बारा" उत्तर मिळाले.

"बारा सिगारेट्स!" तो म्हणाला, "कृत्रिम आनंदाच्या त्या बारा झुळकी होत्या. त्यामुळे तुला पूर्ण समाधान मिळणार नाही हे मी पाहतो आहे. मी केवळ एक चिरूट ओढून संपविला व मला पूर्ण समाधानही लाभले!"

त्याने हातातील चिरूट तोंडाशी लावला. धूर तोंडात घेतला आणि तो धूर हळू हळू नाकातून सोडीत त्याने राहिलेले इंचभर थोटूक पूर भिरकावून दिले.

तरुण चट्टाणीवरून उठून उभा राहिला. त्याने आपल्या हातातील सिगारेटही दूर भिरकावून दिली.

" तुमची हरकत नसल्यास आपण आता जाऊ या. " तरुण म्हणाला.

" माझी मुळीच हरकत नाही " म्हातारा उभा राहात म्हणाला.

स्टेशनजवळ असलेल्या एका पांढऱ्या इमारतीच्या रोखाने ते जाऊ लागले.

लष्करी अधिकाऱ्यांच्या राहण्याचे ते ठिकाण ठिकाण होते. सरहद्दीचे रक्षण करण्यासाठी त्या ठिकाणी एक खास लष्करी तळ होता. त्या लष्करातील तो वृद्ध प्रमुख होता व तरुण त्याच्या हाताखालचा अधिकारी होता.

चालता चालता त्या तरुणाने पृच्छा केली, " आज आपल्यासाठी काही करावयाचे राहिले आहे काय ?"

" राहिले आहे; पण परवा झालेल्या जखमेवर आज मलमपट्टी करण्याची माझी इच्छा नाही. " म्हातारा उत्तरला.

" आपली इच्छा नसल्यास माझी काही हरकत नाही " तरुण अदबीने म्हणाला;

" वरिष्ठावरोबर अदवीने वागण्याची तुझी तऱ्हा पाहून मला अभिमान वाटतो ! " म्हातारा तरुणाची पाठ थोपटीत म्हणाला.

" मी आपला अत्यंत आभारी आहे. " तरुण काहीसे खाकरत अदवीने म्हणाला, " पण तेथे वसलो होतो तेव्हाच लष्कराच्या हालचालीसंबंधीची पुढील योजना निश्चित करण्याचे आपण बोलला होता ?..."

" हू . . . " म्हातारा उद्गारला.

म्हाताऱ्याच्या डोळ्यासमोर लष्कराच्या हालचालींची योजना जणू काय उभी होती आणि तो म्हणाला, " नाही. शिल्लक राहिलेल्या थोटकाबद्दल खेद करीत बसणे जितके मूर्खपणाचे तितकेच अपमानास्पद आहे ! "

ते दोघे पांढऱ्या इमारतीच्या प्रवेशद्वारासमोर येऊन उभे राहिले.

काही वेळाने त्या तरुणाने शेजारी उभ्या असलेल्या फलटणीला खड्या आवाजात हुकूम दिला बंदुकींचा गडगडाट झाला. त्या गडगडाटाने थोडा वेळ ते छोटेसे गाव खडबडून जागे झाले ?

रात्र संपून सकाळ झाली होती. त्या छोटयाशा सरहद्दीवरील गावच्या स्टेशनवरून पुढे गेलेली आगगाडी, दोन-अडीचशे मैल अंतरावरील एका गावी जाऊन उभी राहिली. त्या विभागात बोलल्या जाणाऱ्या भाषेत छापलेली ताजी वृत्तपत्रे उताशंच्या हाती पडली. ती गाडी ज्या सरहद्दीवरील प्रदेशातून आली होती, तेथील एक बंडखोर सेनापती मारला गेल्याचे वृत्त ठळक मथळयात प्रसिद्ध झाले होते. सोबत एक छायाचित्रही प्रसिद्ध करण्यात आले होते. ते छायाचित्र पाहून एक प्रवासी दुसऱ्याला म्हणाला, " आपली गाडी काल सायंकाळी सरहद्दीवरील त्या छोटयाशा शहरातून येत असताना, काही अंतरावर, झाडाखालील चट्टाणीवर वसलेला एक वयस्क इसम पाहिला होता. तो इसम खात्रीने कोणीतरी मोठा माणूस असावा आणि त्याचा या वृत्ताशी संबंध असावा, अशी माझी अटकळ आहे. "

त्याने आपल्या वरच्या खिशातून गंभीरपणे एक चिरूट बाहेर काढला. त्याचे एक टोक तोंडाने तोडले व थुंकून टाकले. चिरूट पेटवीत तो तितक्याच गांभीर्याने म्हणाला—

" मला वाटते, ते लोक कधीही सुसंस्कृत होणार नाहीत ! "

विंजन

—वामन प्रभू

हो ना करता करता गावात चक्की लावून पोटापाण्याची नवी सोय करायचा विचार बवन टेंभेकरनं शेवटी एकदाचा नक्की केला.

पावसाच्या ऐन झडीच्या मोसमात धानाच्या दंडाकडे चिखल तुडवीत जाण्याचा त्याला अतिशय कंटाळा. अलीकडे तर तो उबगून गेला होता. फारसे कष्ट न करता चार पैसे जोडावे, निदान पोटापाण्याची तरतूद करायला कमीत कमी मेहनत पडावी ही त्याची एकमेव इच्छा. अशात दंडाला चांगल्या किमतीची मागणी आली आणि बवननं एकदिवस तालुक्याच्या गावी जावून दंडाची विक्री करून देऊन पैसे आणले.

चक्की लावायचा विचार मनात होताच. अशात लक्ष्मण बारयाच्या रिठाची जागा भाड्यानं मिळाली. मग बवनने त्यावर झट्दिशी एक कच्चा गोठा उभारून टाकला.

एवढे झाल्यावर मग कुठे 'विंजना'ची समस्या निर्माण झाली. 'विंजन' आणून गोठ्यात 'फिट' केल्याखेरीज चक्की सुरू होणार नाही, हा विचार तीव्रतेने डोक्यात येण्यासाठी दंड विकल्यानंतर त्याला प्रथमच फुरसत मिळाली होती.

"हूं आता म्हणत नव्हतो मी. का विंजन आनल्या शिवाय चक्की सुरू होनार कशी ?" समवयस्क मित्रांच्या मैफिलीत बवनने सूतोवाच केलं.

"हौ नं त" गोविंदा टिंगऱ्यानं जणु आपल्याला हे सारं आधीच माहिती असल्याच्या आविर्भावात त्याची री ओढली. आणि पाहता पाहता बवन टेंभेकराच्या विंजनाची बातमी गावभर पसरली. बवनच्या ह्या महान धाडसाबद्दल प्रत्येक जणाची कुठली ना कुठली प्रतिक्रिया असणं रास्तच होतं. त्यामुळं भेटणारा प्रत्येकजण त्याला ह्या विषयावरील आपले विचार ऐकवू लागला.

आता हे एवढे मोठे इंजिन आणायचे म्हणजे किती तरी प्रश्न ! एक तर ते नागपूरला 'भेटते' की मुंबईला. बरं जवळच्या चार हजारात भेटते का अजून पैसे लागत. अन् समजा भेटलं एकदाचं तर आणायचं कसं ? आणि ह्या सौद्यात कोणी फसवलं समजा तर, आपण फसवल्या गेलो हे ओळखायचं कसं ? बवनचं डोकं तर अगदी चकरावून गेलं.

"बवनराव, अरे डरते काह्यको जी...मले सांगा लागत होतं. .आधीच...अरे ऽ हे काम त आपन असं चुटकी वाजवल्यावानी करतो...का ? अरे आपला गफ्फूर न्हाई का...अरे तो मोठ्या मोठ्या विंजनरच्या मुस्काडात मारून त्याइले म्हनते बसा बावू उगेमुगे...नवरगावचं विंजन कोनाच्या हातचं हाये ?..याच बोवाच्या हातचं..नेरीची चक्की कोनं फिट केली, ह्याच बोवानं...ते तमकं विंजन कोनं आणलं...ह्याच पठ्ठ्यानं.. का ?" जनार्दन हिंग्यानं गफ्फूर फिटरची तारीफ सुरू केली.

..अता मानूस एक लहरी आहे, अन् त्याच्या कलाकलानं साऱ्या गोष्टी घ्याव्या लागतात, ही गोष्ट वेगळी..पण त्याला दुखावून भागणार नाही. साऱ्याच कारागिरांत असणारा उर्मटपणा त्याच्यातही आहे, व तो खपवून घेणं आवश्यक आहे" इत्यादी गोष्टी बवनच्या मनावर ठसवण्यात आल्या.

आजवर गफ्फूरशी अर्थाअर्थी कुठलाही संबंध आलेला नसला, तरी एकाच गावातला म्हणून बवन त्याला ओळखत होता. खरं म्हणजे, हे काम त्याच्याच मदतीनं करायचं आपण पूर्वीपासूनच ठरविलं असल्याचं बवननं साऱ्या मित्रांना सांगून टाकलं.

मग गफ्फूर फिटरकडे पहिलं बोलावणं गेलं. त्यावेळी गफ्फूर झोपला होता. दुसरं बोलावणं गेलं

तेव्हा त्याची झोपमोड झाल्यानं तो चिडला. तिसरं बोलावणं गेलं तेव्हा दुपारची उन्हं कलल्यावर आपण येऊ असा त्याचा निरोप आला. चौथ्यांदा बोलावणं गेलं तेव्हा तो संध्याकाळचं जेवण घेत असल्यानं त्याला फुरसत नव्हती. मग पाचवं बोलावणं, सहावं बोलावणं •••सातवं•••

बबनला वाटलं, माणूस भयंकर कामात असणार. पंचक्रोशीतला एकमेव विजनर काही झालं तरी•••आता विजनाचं काम म्हंजे केवढं वारिकीचं. ह्या मानसाला वेळ मिळावा तरी कसा•••आपल्यासारख्या क्षुल्लक माणसाच्या विजन खरेदीसारख्या लहानशा गोष्टीत लक्ष घालण्याची त्यानं मेहरवानी केली तर त्याचे उपकार आयुष्यभर फेडून फिटणार नाहीत.

शेवटी निरोप पाठवून थकल्यावर बबन दोन साथिदार घेऊन स्वतःच गफ्फूरमियाँच्या घरी गेला.

ओसरीत, खाटेवर पाय ताणून व हाताची उशी करून आढ्याकडे टक लावून पाहात, गफ्फूर नुस्ताच पडलेला होता. पलीकडे गोणपाटाच्या पडद्यामागे, त्याच्या दिवसच्या दिवस घरात ऐदीपणे पसरून राहण्यावद्दल त्याची विवी खडे फोडीत होती. "ये ऐसाही चला तो बच्चों को कल रोटी कहाँसे खिलाऊंगी •••अरे, सुनते भी हो•••ओ कौन दिनमें दसवार बुलाने आता है, उसका काम तो भी करो•• चार पैसे मिलेंगे ••"

"तुम चुप रहो जी. खुदको अक्कल नहीं और बकवास करती साली•••"

"देखोजी"

पैशाची गरज असूनही आपल्याकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या ह्या महान कारागिराचं नवल करीत, बबन बाहेरच थबकून सारं ऐकत होता. मग त्यानं दबकतच हाक मारली, "भै...ओ गफ्फूरमियां."

"कौन है बे." त्यांच्याकडे न पाहताच गफ्फूर डाफरला.

"आम्ही नोहेका..."

"तो क्या है...खटखट फजुलकी साली...जरा आरामभी नहीं करने देते लोग...अरे आम्ही बी मानसं हाओ...आम्हाले घरदार, बायकापोरं काही हाये का नाही! साला सवेरे देखो तो किसका विजन फेल... दुपेरको किसका गॅस पॅप भसंट...शामको किसका..."

ह्या महान माणसाच्या अनमोल झोपेचा आपण विचका केल्यानं बबनला अपराध्यासारखं वाटलं. मग गफ्फूरमियाँशी टिंगऱ्यानं बोलणं काढलं. बरेच आढे-वेढे...अडचणी...सबबी इत्यादीनंतर नागपूरपर्यंत जाऊन बबनला विजन घेऊन देणे व ते त्याच्या नव्या गोठ्यात 'फिट्ट' करून बबनची चक्की सुरू करून देणे ह्या कामासाठी गफ्फूर शेवटी राजी झाला. गावातलं एक चांगलं काम...शिवाय चक्की सुरू झाल्यानं होणारी गावातल्या समस्त बाया-बापड्यांची सोय इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन, कामाचा प्रचंड व्याप असूनही वेळात वेळ काढून बबनचं काम करून द्यावयास गफ्फूर तयार झाला होता.

बबनला आपल्या मस्तकावरील भार कमी झाल्यासारखं वाटलं. आता काय, गफ्फूर म्हणाला त्याप्रमाणे 'एक दिनमे विजन फिट्...और चक्की चालू...इधरसे जवारी डालो तो उधरसे आटा निक-लेगा!' आणि एकदा चक्की सुरू झाली की, पाहता पाहता धंदा बरकतीला येईल. पैसा हाती खेळू लागेल. फारसे बूड न हालवता, नदीपारच्या दंडाकडे चिखल तुडवीत न जाता देखील पोटापाण्याची सोय होईल.

त्यानं विचकत विचकतच गफ्फूरला आपल्याकडे नोकरीला राहण्याची विनंती केली. आपला लोकांची विजने सुधारण्याचा धंदा सांभाळून त्यानं ह्या चक्कीचा स्वतःची चक्की समजून सांभाळ करावा आणि भावा-प्रमाणे हक्काने पैसे उचलावे•••गफ्फूरनं बरेच आढेवेढे घेऊन शेवटी ह्या योजनेला केवळ बबनच्या मोहब्बती-खातर मान झुकवून होकार दिला. सहाजिकच एव्हढा मोठा विजनर माणुस आपल्याला जवळचा समजतो ह्या कल्पनेनं बबन आणखीनच भारावून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या बसगाडीनं विजन खरेदीच्या मोहिमेवर निघायचं निश्चित झालं. मग एकानं शंका काढली. 'बबनने आणखी कुणाला तरी बरोबर न्यावं•••वेळ आहे वखत आहे. चार हजाराची रोकड जवळ••शिवाय एव्हढा मोठा सवदा आणि नागपूर सारखं एवढं मोठं शहर. आता समजा कोणी

खिसाच कापला···कोणी मोहिनी विद्येनं भुरळ घालून पैसे नेले···कोणी चाकू दाखवून आड गल्लीत अडवलं.'

मित्रकर्तव्य म्हणून गोविंदा टिंगरे नागपूर पर्यंतच्या प्रवासासाठी सांवतीला तयार झाला. अर्थात बदल्यात बबननं, टिंगरेला विहीर बांधण्यासाठी आणावयाच्या लोखंडी सळाखी आपल्या बिजनाच्या ठेल्यावर फुकटात आणू देण्याची सोय कबूल केली. लक्ष्मण बारयानं यायचं कबूल केलं. पण परत येताना तो आपल्या इवाह्याकडे उनरेडास उतरणार होता आणि ह्या साऱ्यांच्या तैनातीसाठी वेळ–वखत करायला पाहिजे म्हणून काशीरामजीला रोजदारीनं बरोबर घेण्यात आलं···

वेळीच काळजी घेण्यासाठी, बबननं वरखर्चाचे पैसे टिंगऱ्याजवळ ठेवायला दिले. बाकीचे पैसे 'बनियानीच्या' आतल्या खिशात ठेऊन त्यावर आणखी एक बनियान घातली; व तिच्यावर शर्ट चढ़वलं.

उमरेड बसस्टँडवर बबन आणि त्याचा फौजफाटा नास्त्यासाठी हॉटेलात शिरला, त्यावेळी उणापुरा चाळीस मैलाचा प्रवास संपला होता. आपण नागपूरपर्यंतचे अर्ध्याहून जास्त अंतर अगदी सुरक्षीतपणे आलो, ह्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बबननं कलाकंद, जिल्लबी, आलुपोहा आणि आलुबोंडयाची ऑर्डर दिली. बिल जरी अकरा रुपये नव्वद पैसे आलं तरी बबनला त्याचं विशेष वाटलं नाही. उभ्या आयुष्यात तो प्रथमच हॉटेलात इतके पैसे खर्च करीत होता; पण चक्की सुरू होताच हे सारे पैसे दामचौपटीनं वसुल होणार असल्यानं चिंता करायचं कारणच नव्हतं...आता एक, पुढयातले पदार्थ पाहून लक्ष्मण बारई अन् टिंगरे, नाही म्हटलं तरी गोंधळलेच होते. पण, मग स्वतःचा गोंधळ संपविण्यासाठी, बबनरावाच्या मोठेपणाच्या गोष्टी बोलत अवघडल्या अवस्थेतच त्यांनी खाणे सुरू केले. काशीरामजीच्या म्हाताऱ्या चेहऱ्यावर आपल्याला खाऊन पिऊन वर दोन रुपये रोज ह्या दरानं नोकरीस ठेवणाऱ्या तात्पुरत्या मालकाबद्दल अत्यंत कृतज्ञता होती. गफ्फूर मियाँ मात्र मस्ख. चेहऱ्यावर कुठलेच विशेष भाव नव्हते. नाही म्हणायला, तो, पाणी वगैरे बोलवून हॉटेलातील पोऱ्यावर अधुनमधुन खेकसत होता, इतकेच!

●

नागपुरात पोचताच बबनचा जीव कावराबावरा होऊ लागला. केव्हा एकदा आपण बिजन घेतो आणि ही बंडीजवळ लगटून असलेली रोकड हातावेगळी करतो ह्याची त्याला घाई झाली.

"हां! उचला पाय लवकर न्हाई त दुकानं बंद होतीन."

"अरे जलदी काह्यकी है बबनशेठ दुकान रातके आठ बजेतक खुले रहते और पैदल कोन जाएगा . रिक्षा करो रिक्षा."

गफ्फूर मियाँनं टर्रावत रिक्षा बोलावला. सामुदायिक सुरक्षिततेच्या दृष्टीनं पाचही जणांनी एकाच रिक्षात बसणं आवश्यक असल्याचं बहुमत पडल्यानं, पाच सवाऱ्या एकाच वेळी बसवून नेणारा रिक्षा शोधल्या जावू लागला. ह्या लोकांना धंदेवाईक सरावानं रिक्षावाल्यांनी एव्हाना हेरलेलं होतं, त्यामुळं कोणीही लकडीपुलापासून तो गांधीबाग फवाऱ्यापर्यंतचं उणपुरं मैलभर अंतर जाण्यासाठी दहा रुपयाच्या खाली एक पैसा घ्यायला तयार नव्हता. शेवटी टिंगऱ्याच्यानी गफ्फूरच्या मध्यस्थीनं एका रिक्षावाल्यानं सात रुपयात भाव पक्का करून टाकला. ह्या पाचही जणांना रिक्षात कोंबून, रहदारीच्या पोलीसाला चुकविण्यासाठी अनेक गल्लीबोळ धुंडाळत त्यानं शेवटी त्यांना फव्वारा चौकात आणून सोडलं

"हूं! भाऊ, कोणची दुकान हाये···बोला?"

"बबनशेठ नाग्पूर शेहर पाह्यलं! बंबई झालं लेक पाह्यता पाह्यता." लक्ष्मणच्या डोळ्यात कौतुक कसं दुथडीभरून. त्यानं अर्थात बंबई कधीच पाहिली नव्हती एक गोष्ट अलाहिदा.

"पंधरा वरसं झाली मी आलो होतो त्या साली न अशा बिल्डींगा होत्या का असे रस्ते होते " काशीरामजी पुटपुटला.

"हूं, त मग बिजन " बबन

"खाना खाये सिवाच?" गफ्फूरनं मोडता घातला. बबनचा खरं म्हणजे एकदमच पारा चढला. 'लेका तुले खानं किती खातो तं···पन आधी माहं बिजन तं घेऊन देसीन···' पण त्यानं आपले रागाचे शब्द गिळले अन् खुणेनंच म्हटलं, 'चला..'.

"तो मियाँ, बोलो क्या खानेका है:"

" अपन तो जिलेबी और दही और पुडी भाजी इसके सिवा कभी नास्ता करते नहीं· और मटन मुर्गीके सिवा खाना खाते नहीं ··" गफ्फूर खंबीरपणे म्हणाला. अंगावर फाटके कपडे असलेत तरी त्याच्या बोलण्यावरून त्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल वेगळाच निष्कर्ष निघत होता. बबनला कालचे त्याच्या घरचे दृश्य आठवले. त्याच्या घरची फाकाकशी. संध्याकाळी त्यानं बबनजवळून नेलेली चार पायली ज्वारी···आणि ह्या संदर्भात अगदीच विसंगत वाटणारा त्याच्या आताच्या बोलण्याचा ढंग. बबनला वाटलं 'साला आपली बिन पान्यानं भादरतो आहे. पण अडला हरी म्हणून···लेका एकदा माझं विजन सुरू तर होऊ दे···चार दिवस काम पाहिलं की मलेच येऊन जाईल सारं·· मंग कोन पुसते तुले· पन आता त तुह्या तालानं चाललंच पाहिजे !'

मग 'पंजाब ग्रँड हिंदू मराठा मटन हॉटेल' सारख्या लांबलचक नावाच्या हॉटेलात साऱ्यांनी जेवणे उरकली. पैसे बबनचे असून देखील बिल देताना टिंगऱ्याचा हात थरथरलाच. पंचेवीस रुपये ब्याण्णव पैसे जेवणाचे म्हणजे टिंगऱ्याच्या कल्पनाशक्तीपलीकडची गोष्ट. अर्थात बबनच्या आतल्या आत धुमसण्याची कुठलीच चिन्हे त्याच्या चेहऱ्यावर व्यक्त झालेली नव्हती. गफ्फूर आरामात 'कॅप्टन' सिग्रेट फुंकत आपल्याच तारेत दुकान ओळीकडे सरकत होता.

●

एका मोठ्या दुकानात गफ्फूरच्या मागून दबकत दबकत सारे शिरलेत, तशी दुकान–मालकानं पुढं येऊन गफ्फूरचा हात दाबला, नी म्हटलं, 'आईये उस्ताद··· तशरीफ रखिये···अरे लडका पाटील साहबोंके लिये खुर्चिया लगाव···क्यूं पटेल, चाय की कॉफी. शर्माव नहीं···गफ्फूर मियाँके पटेल तो हमारे पटेल.··हूं काय, यंदा पिकपानी···पंप बसवायचा विहिरीवर ? चक्की पाहिजे ? इंजीन पाहिजे···बोला क्या हुकूम है ? "

दुकानदाराच्या हमल्यानं साऱ्यांची एका क्षणात दाणादाण झाली. बबनच्या मनातील गफ्फूरविषयीच्या कडवटपणाची जागा एकदम आदरानं घेतली. दुकानदारानं केलेल्या स्वागतानं तो सुखावला.

चहापानानंतर गफ्फूरनंच सामानाची यादी दिली · भराभर सामान निघू लागलं. बबननं दोन–चारदा भावाची चौकशी केली; बोलण्याचा प्रयत्न केला: पण व्यर्थ ! " अरे पटेल हम तुमसे क्या जादा लेंगे ? भरोसा करो. विश्वास करो·· लागलं न एक मानुस बरोबर देनो आमचा···बाजार पाहून या मगच घ्या··· "

मधेच एक फोन आला. त्यावरचं बोलणं संपवून दुकानदार म्हणाला, "पहा, आत्ताच फोन आला. पाच हॉर्स पॉवरच्या इंजनाची किंमत शंभर रुपयानं वाढली.·· पण तुम्हाला जुनीच किंमत लावणार··· इथून उठून दुसऱ्या दुकानात जा किंमत वाढलेली असेल. आता घ्याल जुनीच किंमत···संध्याकाळी फिरून आले तर शंभर रुपये जास्त···हमारे बंदे मे ऐसा है पटेल दुकानदार उगीच हसला, आणि आणि ह्यावेळी त्याच्या वरच्या दोन दातांवर मढवलेले सोन्याचे पत्रे चमकलेत.

सारं कसं अगद सुरळीतपणे पार पडलं. फारशी 'झिग झिग' करावी न लागता. .आता एक, पदोपदी गफ्फूरची मिजास सांभाळावी लागली आणि टिंगऱ्याच्या लोखंडी सळाखींना इंजिनासाठी भाड्याने घेतलेल्या ट्रकमध्ये फुकटात जागा द्यावी लागली व खाणेपिणे-प्रवास खर्च ह्यांच्या पायी शंभर एक रुपये बसले एवढेच. पण नेमक्या वेळी, इंजिनाचे भाव वाढण्यापूर्वीच नागपुरात पोहचल्यामुळे शंभर रुपयांचा फायदा आला होता; आणि अशा तऱ्हेने हा जास्तीचा खर्च वरच्यावरच निघाला होता.

टिंगऱ्यानं आपल्या लोखंडी सळाखी ट्रकमध्ये टाकून आणल्यात, तेव्हापासून बबनशी खाजगीत बोलण्याची सारखी चुळबुळ चालवली होती. शेवटी लक्ष्मण बारई उमरेडला आपल्या इवाह्याकडे पाहुणपणासाठी उतरला, तशी ड्रायव्हरजवळ बसलेल्या बबनच्या बाजूच्या रिकाम्या झालेल्या जागेवर येऊन बसत टिंगऱ्या त्याच्या कानाला लागला, "भौ. . आपली चांगली भादरली त्या दुकानदारानं. .मी सळाखी घ्यायले गेलो तवा तिकडे भाव पाहूचले दुसऱ्या दुकानात. लेकानं कोपभर चाय पाजला अन् परतेक वस्तु महाग. विजनात तिनशे. चक्कीत पन्नास. .

पट्ट्यात पंधरा..भौ, पाचशे रुपयानं भादरली, बिना पान्यानं. हा हरामी मियाँ, विजन ठेल्यात भराच्या वक्ती मागं गेल्ता दुकानाच्या; तवा ह्यानं आपली दलाली मारली. म्ही सांगतो, त्याचे खिसे तपासा; त्याहिच्यात निदान शंभर रुपये निघन. "

बबननं मान डोलावली. खरं म्हणजे अंगार अंगार झाली त्याची. पण हा गफ्फूरचा वच्चा. त्याला काही म्हणायची सोय नव्हती. समजा तो रुसला तर चक्की अन् विजन फिट करणार कोण ? सारी रोकड आता ह्या विजनाच्या सामानात गुंतली होती; आणि त्या रकमेला लागलेल्या कुलुपाची किल्ली खिशात असलेला गफ्फूर इंजिनाच्या पेटीवर मस्त झोपला होता. बबन महत्प्रयासानं गप्प बसला..वाट पाहणे याखेरीज आता दुसरा इलाजच नसल्यानं !

शेवटी एकदाचं, दोन दिवसांच्या झटापटीनंतर इंजिन आपल्या पायावर उभं झालं. एवढी गुंतागुंतीची रचना असलेल्या त्या यंत्राचे भाग कुशलतेने जोडणाऱ्या गफ्फूरच्या बोटांच्या चपळ हालचालींकडे पाहण्यात बबनचे तासचे तास निघून गेलेत. गफ्फूर विजन फिट करीत होता, आणि बाकीचे लोक ते कधी सुरू होणार ह्याची वाट पाहत होते. गावातील झाडून साऱ्यांनी बबनच्या ह्या चक्कीत एव्हाना पायधूळ झाडली होती.

शेवटी पिठाची चक्की आणि इंजिन–दोनही पूर्णपणे उभे झाल्यावर गफ्फूर आपल्याच तंद्रीत ओरडला, " मुर्गी कहाँ है ?"

" अरेच्या ! आता इथं कोम्बडी लागते हे कोणाले ठाऊक होतं ?"

" कोम्बडी कापल्या शिवाय विजन नस्ते सुरू होत बबनसेठ " एकानं खुलासा केला.

मग विजनाची यथासांग पूजा झाली. एका कोम्बडीचा बळी गेला. आणि पराक्रमी राजपुत्राच्या आविर्भावात हातात हँडल घेऊन गफ्फूर विजनापाशी गेला. मग त्यानं ते विजनाच्या चाकाला बसवलं आणि आत्मविश्वासानं हँडल घुमवलं...एकदा...दोनदा... पुन्हा पुन्हा...

मधेच एकदा इंजिनातून 'फक्क ऽ फस्स' असा धापा टाकल्याचा आवाज निघाला; आणि थोडा धूर...तशी साऱ्यांनी आनंदाने टाळ्या वाजविल्या. पण इंजिन पुन्हा गप्प ! गफ्फूरची उघडीबंब छाती पुन्हा पुन्हा हँडल घुमवून घामानं थबथबली; पण त्या कठोरहृदयी इंजिनाला पाझर म्हणून फुटेना

आजुबाजूच्या दोघा–चौघांवर खेकसून गफ्फूरनं पुन्हा पान्हे हातात घेतले. काही बुलुट ढिली करून परत कसलीत...कमरेवर हात ठेवून तो विचारात गढून उभा राहिला...अगदी स्तब्ध

शेवटी सारं काही असह्य होऊन बबनने पुढं येत विचारलं, " क्युं...क्या बात है मिया ?"

" सकसन पाईप कहाँ है ? "

" सकसन पाईप ? "

" हाँ, सकसन पाईप···उसके सिवा विंजन चालू कैसा होगा ? "

" मंग ? "

" मंग क्या ? मंग ? नाप्पूर जाना पडेगा··· कल सवेरे की मोटरसे··· "

बबन जळजळत्या नजरेनं गफ्फूरच्या डोळ्यात पाहू लागला. 'नाप्पूर जाना पडेगा··म्हंजे उमरेडला हॉटेलात बारा रुपयांचा खर्च,···नागपुरात गेलेले पन्नास रुपये जाण्यायेण्याचे चाळीस रुपये···जिल्लवी-शिवाय नास्ता न करणारा नी मटन मुर्गीशिवाय न जेवणारा हा दरिद्री भिकारचोट मेकॅनिक··· '

बाजूला उभ्या असलेल्या टिंगऱ्याला वाटलं, बबन आता ते इंजिनच्या बाजूला सुस्तपणे पडलेलं हँडल उचलून गफ्फूरच्या टकुऱ्यात घालेल. पण पाच मिनिटांच्या स्तब्धतेनंतर बबननं धोतर झटकलं अन् तो निर्विकारपणे गफ्फूरला म्हणाला, " हूं ऽ ! ठिक है···आता विजन आनलंच आहे एकदा, त हे आलंच. तुम सवेरेकी गाडीपर आव··देर करना नहीं··"

[नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने]

आधुनिक मराठी कवितेसंबंधी थोडेसे

—सौ. शकुंतला खोत

आधुनिक कवितेची व्याख्या करण्याआधी व तिला आधुनिक ठरविण्याआधी कवितेचे जे स्वरूप होते ते पाहणे आवश्यक ठरते.

पद्याची परंपरा फार प्राचीन काळापासून अखंड चालत आलेली दिसते व कालानुसार तिच्यात बदल होत गेलेला दिसतो. ज्ञानेश्वरादी संतांच्या काळी जे पद्य निर्माण झाले ते ओवी–अभंगांच्या रूपात व अगदी साध्या, सोज्वळ, गोंडस, निरागस, मृदू मराठी भाषेत. ते मराठी कवितेचे बालपणीचे स्वरूप. जसजसे तिने बाळसे धरले तसतसे तिचे रूप पुढेपुढे खुलत गेले व बालपणीची चिमुकली कवितावाला, पंडित कवींच्या काळात एखाद्या नययौवनेप्रमाणं सुन्दर, सुवक, अलंकारांनी नटलेली सजलेली दिसते. पंडित कवींमधे कविताकामिनीला अलंकारांवर अलंकार चढवून अधिकाधिक सुन्दर दाखवण्याची जाणीवपूर्वक स्पर्धाच दिसते—मग त्या अलंकारांच्या ओझ्याने तिचे स्वरूप खुलण्याऐवजी ती कृत्रिम सजविलेली ठोकळेवजा पुतळी वाटली तरी त्यांनी तिला सजविण्याचा सपाटा कमी केलेला नाही.

पंडित कवींच्या नंतरच्या काळात म्हणजेच शाहीरांच्या काळात कवितेच्या स्वरूपात, आशयात, अविष्कारपद्धतीतही बदल दिसतो. तिचे भारदस्त, अलंकारवजा स्वरूप थोडेफार बदलून ती काहीशी वास्तव स्वरूपात—पण अस्सल मराठमोळा सुंदरी बनलेली दिसते. आणि त्यानंतर इंग्रजी राज्याच्या आमदानीच्या सुरवातीच्या काळात तिचे स्वरूप पुन्हा बदललेले दिसते.

इंग्रजीच्या अभ्यासाने विद्वानांच्या रचनेमध्ये दोन वेगळे प्रवाह दिसतात. त्यावेळची काही विद्वान पंडित शास्त्रीमंडळी आपल्या जुन्या संस्कृतीला चिकटून रहाणारी होती. त्यांनी संस्कृत साहित्यातील साज मराठी कवितेवर चढवला व तिचे मराठी स्वरूप काळाला शोभेसे, बरेचसे वास्तव वाटणारे असे ठेवले. तर काहींनी इंग्रजी साहित्यातील नावीन्याने दिपून सरसहा अनुकरण करुन मराठी स्वरूपातल्या सुंदरीला इंग्रजी वेष चढविल्याप्रमाणे वाटणारे असे अनुवादात्मक चमत्कारिक काव्य केले—पण कालानुसार कविता परंपरेच्या पौराणिक, धार्मिक, आध्यात्मिक, पारलौकिक मंदिराच्या पायऱ्या हळुहळु उतरून लौकिक समाजाच्या वस्तीला येत होती. तिच्या ह्या वास्तवाप्रत आगमनाची, लौकिकाप्रत झुकणाऱ्या आगमनाची चाहूल आंग्लशिक्षित पंडितांच्या काव्यांतून भाषान्तराच्या रूपाने लागते.

त्यानंतर १८७४ च्या सुमारास विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या तोफा डागण्याने व निबंधमालेच्या सामर्थ्यशील आवाज उठविण्याने मराठी भाषा डौलात बोलू चालू लागली होती. तिने १८८५ च्या सुमारास केशवसुतांच्या रूपाने लौकिकाच्या पायरीवर प्रवेश केला व उंबरठ्यावरचे अलंकारांचे माप उलटून ती कवितावधु आपल्या हक्काच्या घरी मालकिणीच्या रुबाबात अवतरली व बघता बघता गृहिणी बनली. तिने आपल्या हक्काच्या घरी नाव घेतले. 'आधुनिक मराठी कविता' जी समकालिनांना आवडली, पटली, रुचली व आपल्यातलीच जवळची वाटली, तिने तात्का-

लीन पिढीला भारून टाकले, आपलेसे केले. अशी ही आधुनिक मराठी कविता केशवसुतांच्या काळापासून सर्वार्थाने मराठी मनात, मराठी घरात नांदू लागली.

तिने आपला वेषही साजेसा केला. आपले विचारही सर्वांना हवेहवे ते ऐकवण्याचा प्रयत्न केला व बघता बघता सर्वांची मने तिने जिंकली व सर्वांना तिने मुग्ध केले—वेड लावले.

हे आधुनिक मराठी कवितेच्या विकासासंबंधी झाले. अता तिच्यात विकास कोणता झाला हे पाहायचे म्हणजेच तिला आधुनिक ठरविणारी तिची व्यवच्छेदक लक्षणे तपासली पाहिजेत. प्रथमदर्शनी तिचे बाह्यस्वरूप बदललेले दिसते. पूर्वीच्या प्राचीन कवितेप्रमाणे ती दीर्घ, लांबच लांब न राहता त्रुटित स्वरूपात दिसते. याचे कारण कुठल्या तरी एकाद्या अनुभवाचा – कविमनाचा उत्कट अविष्कार आधुनिक कवितेत असल्याने व उत्कटता ही क्षणैक, अल्पजीवी असल्याने साहजिकच कवितेचे स्वरूप त्रुटित असणे स्वाभाविक ठरते. तसेच तिच्या बहिरंगातील तिची चाल अक्षरगणवृत्ताकडून मात्रावृत्ताकडे झालेली. मात्रावृत्त, जाती, नवे पद्यबंध, मुक्तछंद असे तिचे बदलते अंगविक्षेप आहेत.

जीवनाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोण हा ऐहिक, लौकिक बनला. तिचा आशय वास्तव जीवनातले विषय घेऊन अभिव्यक्त झाला. प्राचीन मराठी कवितेप्रमाणे निव्वळ धार्मिक, केवळ पारलौकिक मूल्ये धरून न राहता व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, मनुष्यतेचे ऐहिक सुखसंवर्धन हे तिचे मुख्य ध्येय राहिले व ती एक प्रखर सामाजिक शक्ती, मानवी मनाचे उन्नयन करणारी, सामाजिक जाणिवेचा साक्षात्कार करणारी शक्ती ठरली, ती प्रथम केशवसुतांच्या काळापासूनच. अध्यात्माच्या चौकटीतून ती ऐहिकाच्या भूमीवर उभी झाली. असा आधुनिक मराठी कवितेत अंतर्बाह्य परिवर्तन दाखवणारा कालानुरूप बदलत गेलेला विकास दिसतो. आत्माविष्कार हे तर तिचे प्रधान व्यवच्छेदक लक्षण ठरले. मग ते गूढगुंजन असो वा आणखी कोणत्या वेगळ्या स्वरूपात दिसो. नव छंद—नव प्रतिमा, नव जीवनविश्लेषणाची दृष्टी घेऊन ही नव-कविता अवतरली.

हो दिवाळी युगवाणीच्या लेखकवर्गास आणि
विदर्भ साहित्य संघाच्या सर्व हितचिंतकांना,
कार्यकर्त्यांना व सभासदांना
सुखसमृद्धीची जावो !

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

कविवर्य कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिन

कविवर्य कै. श्रीनिवास रामचंद्र ऊर्फ अण्णाजी बोबडे यांच्या ३३ व्या स्मृतिदिन समारंभा-निमित्त दि. १ ऑक्टोबर १९६७ रोजी सायं. ६–३० वा. श्री. त्र्यं. खं. गंधे यांचे व्याख्यान झाले.

प्रा. प्र. नी. खर्डेनवीस यांचा सत्कार

स्वरमंडळातर्फे दि. १९–१०–१९६७ रोजी रात्रौ ८–३० वा. गडकरी सभागृहात, नागपूर महाविद्यालयाचे संगीतविभागप्रमुख व प्रा. प्र. नी. खर्डेनवीस यांचा 'तरुण भारता'चे ज्येष्ठ संपादक श्री. ग. त्र्यं. ऊर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी संयोजक डॉ. बाळासाहेब पुरोहित यांनी प्रास्ताविक भाषण केले व नंतर पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे भाषण झाले.

नंतर श्री. रघुवीर राव यांचे बासरी–वादन व जव्हारकर यांचे गायन झाले.

भेट

गुरुवार दि. ५ ऑक्टोबर ६७ रोजी रात्रौ ८–३० वा. दिल्ली विश्वविद्यालयातील हिन्दी विभागाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध हिन्दी साहित्यिक डॉ. नगेन्द्रजी ह्यांनी संस्थेला भेट दिली.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या वतीने— मराठी टीकावाङ्मयाचे धावते प्रदर्शन

समृद्ध अशा मराठी टीकावाङ्मयाचे धावते दर्शन अभ्यासकांना देण्याच्या दृष्टीने वि. सा. संघ अभ्यासमंडळाच्या वतीने ग्रंथालयसप्ताहाच्या निमित्ताने एक प्रदर्शन, श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात दि. ७ ते १० ऑक्टोबर ६७ पर्यंत आयोजित करण्यात आले.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ : नागपूर

२७ वे साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य सघाचे २७ वे साहित्य संमेलन सुप्रसिद्ध कथा-लेखक, कादंबरीकार–नाटककार श्री. **पुरुषोत्तम भास्कर भावे** यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर १९६७ रोजी होणार आहे.

आपण संमेलनास यावे, ही विनंती.

सर्व सभासदांना साधारण सभेची सूचना—

वरील समेलनाचे जागी रविवार दि. २६ नोव्हेंबर १९६७ रोजी दुपारी २–३० वाजता वि. सा. संघाची साधारण सभा भरेल. ह्या सभेत पुढील विषय राहतील.

(१) मागील सभेचा अहवाल.

(२) लवादाची नेमणूक.

(३) अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल.

संमेलनापुढील ठराव—

समेलनापुढे मांडावयाचे ठराव घटना १८ (इ) प्रमाणे १४ दिवस अगोदर सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर १ या पत्त्यावर पाठवावेत.

नागपूर
दि. १ नोव्हेंबर १९६७

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

कविवर्य कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिन

कविवर्य कै. श्रीनिवास रामचंद्र ऊर्फ अण्णाजी बोबडे यांच्या ३३ व्या स्मृतिदिन समारंभा-निमित्त दि. १ ऑक्टोबर १९६७ रोजी सायं. ६–३० वा. श्री. त्र्यं. खं. गंधे यांचे व्याख्यान झाले.

प्रा. प्र. नी. खर्डेनवीस यांचा सत्कार

स्वरमंडळातर्फे दि. १९–१०–१९६७ रोजी रात्रौ ८–३० वा. गडकरी सभागृहात, नागपूर महाविद्यालयाचे संगीतविभागप्रमुख व प्रा. प्र. नी. खर्डेनवीस यांचा 'तरुण भारता'चे ज्येष्ठ संपादक श्री. ग. त्र्यं. ऊर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी संयोजक डॉ. बाळासाहेब पुरोहित यांनी प्रास्ताविक भाषण केले व नंतर पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे भाषण झाले.

नंतर श्री. रघुवीर राव यांचे बासरी–वादन व जव्हारकर यांचे गायन झाले.

भेट

गुरुवार दि. ५ ऑक्टोबर ६७ रोजी रात्रौ ८–३० वा. दिल्ली विश्वविद्यालयातील हिन्दी विभागाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध हिन्दी साहित्यिक डॉ. नगेन्द्रजी ह्यांनी संस्थेला भेट दिली.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या वतीने— मराठी टीकावाङ्मयाचे धावते प्रदर्शन

समृद्ध अशा मराठी टीकावाङ्मयाचे धावते दर्शन अभ्यासकांना देण्याच्या दृष्टीने वि. सा. संघ अभ्यासमंडळाच्या वतीने ग्रंथालयसप्ताहाच्या निमित्ताने एक प्रदर्शन, श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात दि. ७ ते १० ऑक्टोबर ६७ पर्यंत आयोजित करण्यात आले.

विदर्भ साहित्य संघ : नागपूर

२७ वे साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य सघाचे २७ वे साहित्य संमेलन सुप्रसिद्ध **कथा-लेखक,** कादंबरीकार–नाटककार श्री. **पुरुषोत्तम भास्कर भावे** यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर १९६७ रोजी होणार आहे.

आपण संमेलनास यावे, ही विनंती.

सर्व सभासदांना साधारण सभेची सूचना—

वरील समेलनाचे जागी रविवार दि. २६ नोव्हेंबर १९६७ रोजी दुपारी २–३० वाजता वि. सा. संघाची साधारण सभा भरेल. ह्या सभेत पुढील विषय राहतील.

(१) मागील सभेचा अहवाल.

(२) लवादाची नेमणूक.

(३) अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल.

संमेलनापुढील ठराव—

समेलनापुढे मांडावयाचे ठराव घटना १८ (इ) प्रमाणे १४ दिवस अगोदर सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर १ या पत्त्यावर पाठवावेत.

नागपूर
दि. १ ~~नोव्हें.~~ १९६७

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस
वि. सा. संघ, नागपूर

" युगवाणी " (Yugwani) Regd. No. MH 1174

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपू

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, ... गपूर १.

अनुक्रमणिका